सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्रातील रूढीगत व वंशपरंपरागत अधिकार नष्ट करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल


समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ००३२

[ किंमत रु. १.०० ]

# महाराष्ट्रातील रुढीगत व वंशपरंपरागत अधिकार नष्ट करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| प्रकरण एक : प्रास्ताविक .. .. .. | १ |
| प्रकरण दोन : साक्षीपुरावे व लेखी उत्तरे .. .. .. | ४ |
| प्रकरण तीन : हक्कांची जंत्री व त्यांचे वर्गीकरण .. .. | २४ |
| प्रकरण चार : निष्कर्ष आणि शिफारशी .. .. .. | २९ |


## परिशिष्टे


| | |
|---|---|
| परिशिष्ट 'अ' : प्रश्नावली .. .. .. | ३७ |
| परिशिष्ट 'ब' : समितीने भेट दिलेली ठिकाणे .. .. | ३८ |
| परिशिष्ट 'क' : श्री. टी. एस. भारदे यांची भिन्न मतपत्रिका .. | ३९ |
| परिशिष्ट 'ड' : श्री. के. शं. धोंडगे यांचे १९७३ चे अशासकीय विधेयक क्रमांक एल. ए. ३ची प्रत. .. | ४० |
| परिशिष्ट 'ई' : महाराष्ट्र विधानसभेमधील चर्चेतील उतारे .. | ४५ |

## प्रकरण एक

# प्रास्ताविक

ही समिती ज्या परिस्थितीत नेमावी लागली ती परिस्थिती काहीशी विलक्षणच आहे. आपल्याकडे, विशेष-करून हिंदू समाजात, प्रचलित असलेल्या रूढीगत व वंशपरंपरागत अधिकारांचे मूळ आपल्याला जवळजवळ मध्य-युगीन काळापर्यंच्या किंवा कदाचित त्याच्याही पलिकडच्या आपल्या इतिहासात आढळेल. तथापि, एका प्रदीर्घ-काळापासून अंमलात असलेल्या या अधिकारांमुळे कोणतेही विशेष गंभीर सामाजिक वैमनस्य किंवा कायदा व सुव्यवस्थाविषयक प्रश्न निर्माण झाले व त्यातून मोठ्या प्रमाणावर हिंसाचार घडला असे म्हणता येत नाही. या अधिकारांच्या वापरामुळे विशेषकरून ग्रामीण क्षेत्रात अधूनमधून सामाजिक संबंध गढूळ झाले असतील व त्यामुळे क्वचितप्रसंगी लहानसहान हिंसाचाराच्या घटनाही घडल्या असतील. परंतु त्यामुळे कायम गंभीर स्वरूपाची सामाजिक विकृती किंवा नुकसान झाले आहे असे म्हणण्यास वाव नाही. असे असले तरी अशा प्रकारचे अधिकार चालू राहू दिल्यास समाजावर किंवा सामाजिक वातावरणावर त्याचा परिणाम कितीही अल्प प्रमाणात होत असला तरी त्यामुळे उद्वेगजनक परिस्थिती निर्माण होते आणि सामान्य माणसाला आपले लोकशाहीतील हक्क बजावण्यात त्यामुळे अडसर निर्माण होतो आणि म्हणून आपल्या संविधानात अभिप्रेत असलेली आधुनिक आणि समानतेवर आधारलेली समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या आपल्या उद्दिष्टांमध्ये निश्चितच अडथळा निर्माण होतो.

२. नेमक्या याच कारणासाठी एक कायदा करून सर्व रूढीगत व वंशपरंपरागत अधिकार नष्ट करण्याचा प्रश्न गेली कित्येक वर्षे आमच्या विधायकांच्या मनात घोळत आहे. एकेकाळी महाराष्ट्र विधानमंडळाचे अनेक वर्षे आमदार असलेले श्री. केशवराव धोंडगे यांनी हा प्रश्न विशेषकरून उचलून धरला आणि याबाबत विधान-सभागृहात काही काही वेळा त्यांनी अत्यंत आवेशाने व तत्परतेने चळवळीची धुरा सांभाळली. हे अधिकार नष्ट करण्याचा प्रश्न १९६३ सालापासून आपल्या विधानमंडळात वेळोवेळी एक चर्चेचा महत्त्वाचा विषय ठरला आहे. परिशिष्ट "क" मध्ये या चर्चांमधील काही महत्त्वाचे उतारे दिले आहेत. म्हणजे, त्यापासून योग्य तो निष्कर्ष काढता येईल आणि एका परीने महाराष्ट्र विधानसभेत या विषयावरून जी आस्था व संघर्ष उद्भवेल त्यांचीही कल्पना येईल.

३. १९७३ मध्ये हा प्रश्न पुन्हा विधानपरिषदेत सविस्तर चर्चेसाठी आला. आणि अनेक सदस्यांनी त्या चर्चेत भाग घेतला. प्रस्तुत प्रसंगी कै. श्री. व्ही. पी. नाईक हे मुख्य मंत्री होते आणि श्रीमती प्रतिभा पाटील या समाजकल्याण मंत्री होत्या. त्या चर्चेच्या अखेरीस श्री. नाईक आणि श्रीमती प्रतिभा पाटील विधानसभेत व्यक्त झालेल्या मतैक्याशी सहमत झाले परंतु त्यांनी असे सुचवले की, या संपूर्ण प्रकरणाचा सखोल अभ्यास करणे आवश्यक असल्यामुळे विधानमंडळाचे काही सदस्य आणि इतर काही बिनसरकारी व्यक्ती यांची एक छोटेखानी समिती स्थापन करावी. तद्नुसार, ऑक्टोबर १९७३ मध्ये खालील सदस्यांची सध्याची एक समिती स्थापन करण्यात आली :—

(१) श्रीमती प्रतिभा डी. पाटील, समाजकल्याण मंत्री .. .. .. अध्यक्ष
(२) श्री. डी. टी. रुपवते, समाजकल्याण राज्यमंत्री .. .. .. उपाध्यक्ष
(३) श्री. के. एस. धोंडगे, वि.स.स. .. .. .. .. सदस्य
(४) श्री. व्ही. जी. प्रभुगावकर, वि.स.स. .. .. .. .. सदस्य
(५) श्री. एन. आर. व्हटकर, वि.स.स. .. .. .. .. सदस्य
(६) श्री. के. बी. म्हस्के, वि.स.स. .. .. .. .. सदस्य
(७) श्री. शिवाजीराव बाबुराव पाटील, वि.स.स. .. .. .. सदस्य
(८) श्री. आर. के. मेघे, वि.प.स. .. .. .. .. सदस्य
(९) श्री. एम. यू. लहाने, वि.प.स. .. .. .. .. सदस्य
(१०) श्री. डब्ल्यू. एम. शेख, उप सचिव, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, सदस्य सचिव.

४. या समितीपुढे खालील विषय विचारार्थ मांडण्यात आले होते :—

(१) लोकांना सरकारी नोकर म्हणून किंवा समाजसेवक म्हणून वंशपरंपरेने मिळालेल्या पदांच्या आधारे (महारवतन वगैरे) प्राप्त झालेल्या सर्व रूढीगत किंवा वंशपरंपरागत अधिकारांची छाननी करणे.

(२) राज्याच्या नागरी व ग्रामीण भागात वापरल्या जाणाऱ्या वरील (१) येथे उल्लेखिलेले सर्व अधिकारांची जंत्री करणे आणि स्थूलमानाने त्यांच्या ऐतिहासिक मुळाचा तपास करून सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकासावर सध्या कसा हानिकारक परिणाम होतो ते ठरविणे.

(३) भारताच्या संविधानाने हमी दिलेल्या मूलभूत अधिकारांशी असे अधिकार विसंगत आहेत काय ? आणि असल्यास ते कोणत्या प्रकारे हे ठरवणे. तसेच असे अधिकार कालविसंगत आणि राष्ट्राने ज्या मुक्त, खुल्या समताधिष्ठित व लोकशाही समाजाची निर्मिती करण्याची प्रतिज्ञा केली आहे त्यामध्ये निश्चित स्वरूपाचा अडथळा म्हणून मानावेत काय ?

(४) हे अधिकार नष्ट करण्याचे काम, शिक्षणाचा झपाट्याने प्रसार, औद्योगिक विकास, तंत्रज्ञानाची प्रगती इत्यादी सारख्या देशात सध्या चालू असलेल्या सामाजिक व आर्थिक घडामोडीवर सोपवावे की असे अधिकार नष्ट करण्यासाठी निश्चित स्वरूपाचा कायदाच करणे आवश्यक आहे यावर विचार करणे.

(५) जर कायदा करणे आवश्यक वाटत असेल तर त्यासाठी प्रस्तुत कायद्याच्या उल्लंघनामुळे होणारे अपराध हे दखली अपराध समजण्यात यावेत किंवा कसे तसेच, अशा अपराधांसाठी द्यावयाची शिक्षा अपील करण्याची पद्धत, नुकसान भरपाई द्यावी की न द्यावी, द्यावयाची झाल्यास नुकसानभरपाईचे प्रमाण इत्यादी गोष्टींसाठी योग्य व सविस्तर चौकट सुचविणे.

५. १९७३ मध्ये समितीची नेमणूक झाल्यानंतर, जी काही राजकीय स्थित्यंतरे झाली त्यामुळे त्या त्या वेळीचे समाजकल्याण मंत्री किंवा समाजकल्याण राज्यमंत्री, अध्यक्ष आणि उपाध्यक्ष म्हणून नेमून किंवा काही नवीन सदस्यांची भर घालून समितीच्या रचनेत वेळोवेळी बदल करण्यात आले. समितीची सध्याची सदस्यसंख्या खाली दर्शविल्याप्रमाणे आहे :—

(१) श्री. अर्जुनराव कस्तुरे, समाजकल्याण मंत्री (राजीनामा दिला) .. .. अध्यक्ष
(२) श्रीमती शांति नाईक, समाजकल्याण राज्यमंत्री (राजीनामा दिला) .. .. उपाध्यक्ष
(३) श्री. केशवराव धोंडगे,
(४) श्री. उद्धवराव पाटील,
(५) श्री. नामदेवराव व्हटकर,
(६) श्री. व्ही. जी. प्रभुगावकर,
(७) श्री. टी. पी. कांबळे,
(८) श्री. टी. एस. भारदे,
(९) श्री. नानासाहेब माने,
(१०) श्री. एम. वी. काकडे,
(११) श्री. एस. एच. औचर,
(१२) श्री. अनंतराव पाटील,
(१३) श्री. महेश्वर ठाकूर,
(१४) श्री. डब्ल्यू. एम. शेख, उप सचिव व सदस्य सचिव.

६. समितीच्या स्थापनेनंतर सुरुवातीला शासनाने समितीला जे विचारार्थ विषय नेमून दिले होते ते लक्षात घेऊन समितीने एक सविस्तर प्रश्नावली तयार केली. ही प्रश्नावली सुमारे २३०० व्यक्तींकडे पाठविण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील वि.स.स., वि.प.स. आणि संसद-सदस्य, प्रमुख समाज कार्यकर्ते, शिक्षणतज्ज, वरिष्ठ सरकारी अधिकारी, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महानगरपालिका, नगरपालिका इत्यादींचा समावेश आहे.

७. वर उल्लेखिलेल्या प्रश्नावलीची प्रत या अहवालासोबत परिशिष्ट "अ" म्हणून जोडली आहे. ज्या २३०० व्यक्तींकडे प्रश्नावली पाठवण्यात आली होती त्यापैकी सुमारे २००० व्यक्तींनी उत्तरे पाठविली.

८. प्रश्नावलीच्या परंपरागत पद्धतीने या प्रश्नाचे मूल्यमापन करण्याव्यतिरिक्त समितीने, शासनाचे जबाबदार वरिष्ठ अधिकारी तसेच ख्यातनाम राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ञ, विधायक जिल्हा परिषदांचे सदस्य, पंचायत समित्यांचे सदस्य इत्यादींच्या तोंडी साक्षीही नोंदून घेतल्या.

९. तोंडी साक्षी नोंदून घेण्यासाठी आणि प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्यासाठी समितीने राज्यामधील बऱ्याच ठिकाणांना तसेच राज्याबाहेरील देखील परंतु सीमेलगतच्या काही ठिकाणांना भेटी दिल्या. भेटी दिलेल्या अशा सर्व ठिकाणांची यादी परिशिष्ट "ब" मध्ये दिलेली आहे.

१०. या समितीने केलेला अभ्यास व तपास, हा प्रामुख्याने हिन्दू समाजात प्रचलित असलेले रुढीगत व परंपरागत अधिकार यांच्या पुरतेच मर्यादित होते. मुसलमान, ख्रिस्ती, पार्शी, जैन यांसारख्या अल्पसंख्य समाजात ही अशाच स्वरुपाचे काही अधिकार असतील तर त्यांचाही तशाच पद्धतीने अभ्यास करण्याची सदर समितीस काहीच जरुरी नव्हती याची दोन कारणे आहेत, पहिले म्हणजे अशा अभ्यासाचे स्वरूप व व्याप्ती एवढी प्रचंड झाली असती की त्यासाठी स्वतंत्ररित्या परामर्ष घेणे आवश्यक झाले असते. दुसरे म्हणजे अल्पसंख्य समाजांवर त्यांच्याच समाजाच्या वैयक्तिक कायद्यांचे किंवा न्यायव्यवस्थेचे नियंत्रण असते, अशा प्रकारे या समाजामधील रुढी व परंपरागत अधिकारांचा शोध घेणे ही नाजूक व वादग्रस्त बाब आहे. आणि म्हणून, या समाजात प्रचलित असलेल्या रुढींच्या प्रश्नात लक्ष घालणे अनिष्ट ठरेल असे समितीला वाटले. तथापि, वर्तमान काळातील आधुनिक व सुसभ्यतेच्या प्रभावामुळे काही सुधारणांचे वारे वाहू लागल्याचे दिसते आणि या समाजात एखादी सुधारणा घडवून आणावयाची असेल तर ती समाजातील नेतृत्वानेच घडवून आणणे चांगले. उदा. नाथानी आयोगाने, बोहरा जमातीसाठी अनेक सुधारणा सुचवल्या आहेत.

११. हा अहवाल तयार करून तो सादर करण्यास खूपच विलंब लागल्याबद्दल समितीला फार खेद वाटतो. याची दोन किंवा तीन मुख्य कारणे आहेत. या समितीचे बहुतेक सदस्य हे विधान मंडळाचेही सदस्य होते. विधान मंडळाचे सदस्य म्हणून ते स्वतःची कामे पार पाडण्यात व्यग्र असत आणि त्यामुळे समितीचे काम करण्यास त्यांना फारसा वेळ मिळत नसे किंवा उत्साह राहत नसे. समितीची स्थापना झाल्यापासून अशीच परिस्थिती होती. या शिवाय, राजकीय अस्थिरता व राजकीय परिस्थितीत वेळोवेळी होणारी उलथापालथ यांमुळेही समितीचे काम सुरळीतपणे पार पडू शकले नाही.

१२. श्री. डब्ल्यू. एम. शेख, उप सचिव, समाजकल्याण विभाग व या समितीचे सदस्य-सचिव यांनी केलेल्या कामाबद्दल समिती आपली कृतज्ञता नोंदवू इच्छिते. तसेच, श्री. एम. व्ही. संझगिरी (आता निवृत्त झाले) अवर सचिव, श्री. एस. जे. लाटकर, एम. एच. कांबळे श्री. र. ना. ढगे व श्री. एम. एन. देशपांडे, कक्ष अधिकारी, समाजकल्याण विभाग यांचेही समिती आभार मानते. समिती स्थापन झाल्यापासून समितीच्या कार्यात हे अधिकारी सतत व्यग्र राहिले तसेच समितीला आवश्यक असलेली सर्व माहिती संकलित करण्याची जबाबदारीही त्यांच्यावरच होती.

## प्रकरण दोन

# साक्षी पुरावे व लेखी उत्तरे

२.१. समितीला नेमून दिलेल्या विचारार्थ विषयांतून स्थूलमानाने पुढील प्रश्न समोर येतात :—

(एक) संविधानाने हमी दिलेल्या मूलभूत अधिकारांशी रुढीगत व वंशपरंपरागत अधिकार विसंगत आहेत काय ?

(दोन) अशा प्रकारचे अधिकार हे काल विसंगत आणि स्वतंत्र, मुक्त, समताधिष्ठित व लोकशाही समाजाला बाधक ठरतात का ?

(तीन) असे अधिकार नष्ट करणे हे काम निश्चितपणे कायदा करून करावे की सामाजिक व आर्थिक शक्तींना ते यथावकाश करू द्यावे ?

(चार) असे अधिकार जर कायद्याने नष्ट करावयाचे असतील तर अशा कायद्याखाली केलेले अपराध हे दखली अपराध समजावेत किंवा काय ?

(पाच) जर असे अधिकार कायद्याने नष्ट करावयाचे असतील तर ज्या व्यक्तीं हे अधिकार सध्या उपभोगत असतील त्यांना काही भरपाई देण्याची आवश्यकता आहे काय ?

२.२. समितीने आपल्या विविधांगी अभ्यासात व तपासाच्या कामात, एक स्थूल मार्गदर्शक तत्त्व म्हणून या विचारार्थ विषयांचा स्वीकार केला. तसेच ज्या प्रश्नांवर निरनिराळ्या व्यक्तींशी चर्चा करण्याकरता आम्ही राज्यातील बऱ्याच ठिकाणांना भेटी दिल्या ते प्रश्नहीं हेच होते. अशा व्यक्ती या एकतर प्रशासक, समाज कार्यकर्ते, शिक्षणतज्ञ किंवा स्थानिक संस्था व इतर संस्था यांच्याशी त्यांचे सदस्य किंवा पदधारक म्हणून संबंध असलेल्या व्यक्ती होत्या. तोंडी साक्षीपुराव्यावरोबरच वर उल्लेखिल्याप्रमाणे समितीने एक प्रश्नावली तयार करून ती देखील प्रस्तुत केली होती. या प्रश्नावलीच्या तंत्राला मिळालेला प्रतिसाद अतिशय उत्साहवर्धक होता. २,३०० लोकांना प्रश्नावली पाठवण्यात आली होती. जवळजवळ २,००० लोकांनी समितीकडे आपली उत्तरे पाठवली. व्यर्थ व कधी कधी गूढ देखील म्हणता येतील अशा काही रुढींवर या उत्तरात लक्ष केंद्रित करण्यात आले होते. या गोष्टींची एकतर फारशी माहिती नसते किंवा त्यांची सविस्तर माहिती असलेली प्रकाशित झालेली कागदपत्रेही उपलब्ध नसतात. आणि म्हणून तोंडी साक्षीपुरावे व लेखी उत्तरे ही खरोखरच या विषयांच्या मौल्यवान व मौलिक माहितीचा स्त्रोत मानता येईल आणि म्हणून, काही महत्त्वाच्या व्यक्तींनी नोंदविलेल्या साक्षी तसेच प्रश्नावलीमध्ये समाविष्ट केलेल्या सर्व प्रश्नांच्या उत्तरांचा त्रोटक सारांश यांचा या अहवालात निर्देश करणे उचित ठरेल असे या समितीला वाटते. यातील काही उत्तरे काहीशी विस्कळीत व भाषेच्या दृष्टीने अशुद्ध वाटतील परंतु उघड असलेल्या काही कारणांमुळे समिती यासंबंधात काही करू शकत नाही.

## तोंडी साक्षी पुरावा

### डॉ. व्ही. एम. दांडेकर, संचालक, गोखले इंन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स व इकॉनामिक्स

२.३. मी या विषयाचा तज्ञ नाही. माझे स्वतःचे काही अनुभवच मी सांगू शकेन. काही विवक्षित व्यक्तींना कायद्याने प्रदान केलेले (महार वतन इ.) सारखे असे अधिकार आता जवळजवळ अस्तगत झालेले आहेत' "मानापाना"च्या प्रश्नाची इतर अधिकारांबरोबर सांगड आपण घालू इच्छिता का व कायद्याने "मानपान" नष्ट करावा असे आपणास वाटते काय ते मला माहीत नाही.

२.४. रुढीगत व परंपरागत अधिकार नष्ट करण्याची शिफारस मी व्यक्तिशः करू इच्छित नाही. हे अधिकार एका प्रदीर्घ काळापासून चालत आलेले आहेत व काही तुरळक अपवाद वगळता त्यामुळे फार मोठा कोणताही विक्षोभ निर्माण झालेला नाही. पोळ्यासारख्या विवक्षित सणांच्या वेळचे अग्रहक्क नष्ट झाले पाहिजेत हे मला मान्य आहे. परंतु येथेही एक अडचण आहे आपण या रुढी नष्ट केल्या तर ज्या व्यक्ती या प्रथा पाळतात यांचे अधिकार हिरावून घेतले जातील व पर्यायी अधिकार कोणाचा असा प्रश्न उपस्थित होईल. देशाच्या सामाजिक जीवनात प्रत्येक सामाजिक समारंभाच्या वेळी "मानपानासारखे" विधी असतातच. आणि

दीर्घ कालांतराने कोणाला तरी ते पाळावे लागणारच. सध्याच्या व्यक्तींचे अधिकार हिरावून घेणे व त्याऐवजी दुसऱ्यांना ते अधिकार देणे हा एक कठीण प्रश्न आहे त्यासाठी आपल्याला या विषयावर एक सविस्तर व कंटाळवाणा कायदा करावा लागेल. काही अधिकारांचा वापर सध्या पाटील वगैरेंसारख्या काही व्यक्ती करतात. ते अधिकार पंचायतींच्या सरपंचांना देता येतील ही आपली सूचना मला मान्य आहे. परंतु येथे पुन्हा आपण कायद्याला राजकीय स्वरूप देत आहात. आपल्या पद्धती व चालीरीती लोकांनी स्वतःहूनच ठरवाव्या असे मला वाटते. कायदा करून शासनाने त्यात हस्तक्षेप करू नये. सद्या काही व्यक्तींकडे असलेले अधिकार नष्ट करणे व त्यांच्याऐवजी अन्य अधिकार इतर व्यक्तींना प्रदान करणे यामुळे "मानकऱ्यांची" वेगळी जमात निर्माण होता कामा नये. सामंतशाही पद्धत नष्ट झालीच पाहिजे याबद्दल शंका नाही. परंतु, कायदा करावयाचाच असेल तर प्रस्तावित कायद्याच्या उद्देशिकेत ही विवक्षित बाब स्पष्ट केली पाहिजे. प्राचीन सांस्कृतिक व्यवस्था नष्ट होता कामा नये. सरंजामशाहीची पद्धत मात्र गेलीच पाहिजे. उत्सव तसेच चालू राहिले पाहिजेत. पाटलालाच अग्रहक्क द्यावा अशी लोकांचीच इच्छा असेल तर याला अपराध समजू नये.

**डॉ. ए. बोपेगमागे, अधिव्याख्याता, समाजशास्त्र, गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स व इकॉनॉमिक्स**

२.५. रुढीगत व परंपरागत अधिकारांमुळे गावामध्ये सामाजिक तणाव व तंटेबखेडे निर्माण होतात. म्हणून, कायद्याद्वारे असे अधिकार नष्ट करावेत या गोष्टीशी मी सहमत आहे. ४–५ वर्षांमागे चिंचवड (जिल्हा पुणे) येथे काय घडले त्याचे मी उदाहरण देतो. त्या ठिकाणी मी हजर होतो. गावामध्ये एका विवक्षित हिंदू देवाच्या पालखीची मिरवणूक निघावयाची होती आणि पालखीवर छत्री धरण्याचा अधिकार अहमद नावाच्या मुस्लिम गृहस्थाकडे होता. काही कारणामुळे हा गृहस्थ मिरवणूक निघण्याच्या वेळी हजर नव्हता. आणि तो येईपर्यंत मिरवणूक निघू शकली नाही. आपल्या सध्याच्या परिस्थितीत हे बसू शकत नाही.

२.६. ह्या प्रथा कशा अस्तित्वात आल्या? असे आपण विचारता. हा योग्य प्रश्न आहे. माझ्या माहिती-प्रमाणे ज्यावेळेला वस्तुविनिमयाची पद्धत अस्तित्वात होती व पैशांचे व्यवहार लोकांना माहीत नव्हते अशा आपल्या अतिपुरातन भूत काळात या अधिकारांनी मूळ धरले. जमीन देऊन किंवा एखादा विवक्षित अधिकार प्रदान करून केलेल्या सेवेची दखल घेतली जात असे.

इंग्रज राज्यकर्त्यांनीसुद्धा या व्यवस्थेला धक्का लावला नाही. पैशाचे व्यवहार होऊ लागले तेव्हा काही अडचणी निर्माण झाल्या. काही विशिष्ट गावांमध्ये बलुतेदार आता वस्तुऐवजी रोख पैशांची मागणी करतात. गोसावी हे सुद्धा बलुतेदारच आहेत आणि गावामध्ये त्यांना एक विशिष्ट दर्जा आणि मान असतो. अशा रीतीने दर्जाचा प्रश्न बलुतेदारी पद्धतीशी संबंधित आहे.

२.७. रुढीगत आणि वंशपरंपरागत अधिकार नष्ट करण्यासाठी कायदा असावा आणि अशा कायद्यामध्ये राज्यातील सर्व समाजांचा अंतर्भाव असावा हे मला मान्य आहे. काही विशिष्ट ठिकाणी मुसलमान समाजात काही विशिष्ट प्रसंगी बकऱ्यांची कत्तल करण्याचा अधिकार फक्त "मुल्ला"नांच असतो असे माझ्या पहाण्यात आले आहे. याला कोणतीही कायदेशीर मान्यता नसली तरी सामाजिक मान्यता आहे. या बलुतेदारी पद्धतीमुळे बलुतेदारांना एकाच ठिकाणी रहावे लागते आणि त्यांचा स्वतःचा कल आपली गावे सोडून जाण्याकडे नसतो. यामुळे श्रमिकांच्या चलनशिलतेस खीळ बसते व परिणामी आर्थिक विकासावर परिणाम होतो. या प्रश्नाला कोणतीही तोड सुचवणे शासनाला शक्य होईल असे मला वाटत नाही. केवळ काळच हा प्रश्न सोडवू शकेल आणि आकाश-वाणी (रेडिओ) दूरचित्रवाणी (टी. व्ही.) इत्यादींसारख्या संदेश आणि माहिती प्रसाराच्या निरनिराळ्या साधनांद्वारे योग्य ते वातावरण आणि लोकमत आपल्याला तयार करावे लागेल. उद्बोधन करण्यासाठी प्रचाराची अत्यंत आवश्यकता आहे. "मानकऱ्यां" चे अधिकार आपण नष्ट केले तर त्यांना योग्य भरपाई देण्याची तरतूद आपणास करावी लागेल.

२.८. उत्तर प्रदेश इत्यादींसारख्या उत्तरेकडील इतर राज्यांमध्ये, रुढीगत आणि वंशपरंपरागत अधिकार अधिक मोठ्या प्रमाणावर व तीव्र स्वरूपात प्रचारात आहेत आणि त्यांमुळे काहीवेळा हिंसाचार, खून इत्यादीं-मध्येही त्याची परिणती होते.

हे अधिकार कायद्याने नष्ट केले तर खालच्या थरातील लोकांना अधिक स्वैरपणे वागता येईल.

**श्री. बी. के. चौगुले, आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद**

२.९. जे रूढीगत व वंशपरंपरागत अधिकार सेवेच्या दृष्टीने उपयुक्त नसतील ते नष्ट करण्यात यावेत अशी मी व्यक्तिश: शिफारस करतो. या अधिकारांना समाजाचीही मान्यता नसते किंवा एखाद्या कायद्याच्या आधारे ते वापरले जात नाहीत. असे अधिकार बहुधा खेड्यापाड्यांमध्ये तंग वातावरण आणि संघर्ष निर्माण करतात. कायद्याने असे अधिकार नष्ट करण्यात यावेत आणि कायद्यामध्ये शिक्षेचीही तरतूद असावी आणि कायद्याच्या तरतुदीचे उल्लंघन करून केलेले अपराध दखली अपराध समजण्यात यावेत. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विद्यमान यंत्रणा पुरेशी आहे आणि त्यासाठी कोणत्याही जादा यंत्रणेची कोणतीही आवश्यकता नाही असे मला वाटते. हा कायदा सर्व समाजांना लागू करण्यात यावा. कालांतराने हे अधिकार नष्ट होतील, या आशेची वाट पाहणे योग्य होणार नाही. परंतु, लोकांच्या कल्याणासाठी केलेल्या सेवांच्या स्वरूपात असणारे अधिकार आणि ज्यांमुळे व्यक्ती गुलाम होत नाही असे अधिकार मात्र नष्ट करण्यात येऊ नयेत असे मला वाटते. परंतु लोक कल्याणासाठी सेवा म्हणून न करता केवळ एक पवित्र विधि म्हणून करण्यात येणाऱ्या सेवा नष्ट करण्यात याव्यात. भरपाई देण्याची आवश्यकता नाही. आवश्यक कर्तव्यांची कायद्यात तरतूद असावी.

**श्री. एस. पी. कुलकर्णी, आयुक्त, पुणे विभाग**

२.१०. रूढीत आणि वंशपरंपरागत अधिकार नष्ट करण्याची मी व्यक्तिश: शिफारस करणार नाही. प्रथम, मी या अधिकारांची प्रतीकात्मक आणि प्रतीकात्मक नसलेले अशा दोन वर्गात विभागणी करीन. प्रतीकात्मक अधिकार हे गौण आणि निरुपद्रवी असतात आणि त्यामागे संबंधित व्यक्तिंना कोणतेही पारिश्रमिक देण्याची भावना नसते. परंतु काही अधिकारांमध्ये पारिश्रमिक देण्याची भावना असते. अधिकार नष्ट केले तर ग्रामीण क्षेत्रांमध्ये अराजकतेसारखी स्थिती आपण निर्माण करू असे मला वाटते. विद्यमान व्यक्तींकडून अधिकार हिरावून घेतले तर एक प्रकारची पोकळी निर्माण होईल आणि विद्यमान व्यक्तींऐवजी पर्यायी व्यक्ती शोधून काढणे आपल्याला अवघड जाईल. उदाहरणार्थ, पोळा या सणाच्या दिवशी आपला बैल प्रथम नेण्याचा 'पाटलाचा' अधिकार नष्ट केला तर हा अधिकार आता कोणास द्यावा हा प्रश्न नक्कीच उद्‌भवेल. कदाचित, असा अधिकार ग्रामपंचायतीच्या सरपंचाला देता येईल. तसे केल्यास हा अधिकार एखाद्या विशिष्ट पदधारकास प्रदान केला, असे होईल, परंतु तो कोणत्याही विशिष्ट व्यक्तीला असणार नाही. सरपंच बदलत राहतात आणि म्हणून कोणताही निहित हितसंबंध उद्‌भवणार नाही.

२.११. गौण अधिकारांचा वापर हा प्रतीकात्मक असल्याने आणि गंभीर स्वरूपाच्या भांडणांमध्ये त्यांची परिणती होत नसल्याने त्यांच्याकडे फारसे लक्ष देण्यात येऊ नये असे मला वाटते. तुळजापूर, शिरडी, महालक्ष्मी इत्यादींसारख्या मोठ्या 'देवस्थानां'साठी एकतर विश्वस्त मंडळे स्थापन करावीत किंवा मद्रासमध्ये असल्याप्रमाणे देवस्थानांचा एक स्वतंत्र विभाग स्थापन करून स्वत: शासनानेच त्यांचे नियंत्रण करावे. छोट्या अधिकारांचा संबंध आहे तेथवर ते तसेच ठेवावेत अन्यथा या बाबींकडे लक्ष पुरवण्यासाठी शासनास निरनिराळ्या पातळ्यांवर एक सांगोपांग यंत्रणा निर्माण करावी लागेल, असे मला वाटते. शिवाय, छोट्या अधिकारांचे विनियमन करताना, उप-विधि बरोबरची गुंतागुंत निर्माण करतील आणि कायद्याच्या तरतुदी व त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यात खूपच अंतर पडेल.

२.१२. म्हणून, तुळजापूर, शिरडी इत्यादी ठिकाणच्या अधिक मोठ्या देवळांसाठी रीतसर विश्वस्त मंडळे असावीत आणि मध्यम देवळांसाठी एक स्वतंत्र शासकीय विभाग असावा व सर्व अधिकार त्या विभागाकडे असावेत असे मी सुचवू इच्छितो. छोट्या अधिकारांचा संबंध आहे तेथवर ते एकतर तसेच ठेवावेत किंवा ग्रामपंचायतीच्या सरपंचाला ते द्यावेत.

२.१३. आपण जो कायदा करू त्यामध्ये सर्व समाजांच्या रुढीगत व वंशपरंपरागत अधिकारांचा अंतर्भाव असावा, परंतु निरनिराळ्या पातळ्यांवर विशेषत: अगदी खालच्या पातळीवर गोंधळ निर्माण होणार नाही याची आपण पुरेशी दक्षता घ्यावी. कायदा लवचिक असावा आणि प्रशासनातील अगदी खालच्या श्रेणीच्या अधिकाऱ्यांना त्याचे सहज आकलन झाले पाहिजे आणि वरच्या पातळीवरील अधिकाऱ्यांकडे बाबी निर्दिष्ट न करता तत्परतेने त्याची अंमलबजावणी करणे त्यांना शक्य झाले पाहिजे. असा एखादा कायदा करण्यात येईल तेव्हा, वेळोवेळी, म्हणजे ४ ते ५ वर्षांनी त्याचे पुनर्विलोकन करण्यात यावे आणि कोणताही ताठरपणा निदर्शनास आल्यास तो शक्य तितक्या लवकर दूर करण्यात यावा.

### श्री. जे. जी. कांगा, जिल्हाधिकारी, पुणे

२.१४. 'पोळा' या सणाच्या दिवशी बैल पुढे ठेवण्याचा अधिकार आज अस्तित्वात आहे आणि या अधिकाराच्या वापरास्तव कधीकधी वाद उद्भवतात आणि तंटेबखेडे होतात. पूर्वी पुणे जिल्ह्यात अशा प्रकारच्या २–३ घटना घडलेल्या आहेत. तथापि, काही तालुक्यांमध्ये, दसऱ्याच्या दिवशी पूजा, समारंभ, उत्सव इत्यादी तहसिलदारांनी पार पाडण्यास भाग पाडल्याचे मी पाहिले आहे. अशी भांडणे बहुधा इंदापूर आणि खेड तालुक्यांमध्ये होतात आणि या क्षेत्रांमध्ये मी १४४ कलम जाहीर केले होते.

२.१५. रूढीगत आणि वंशपरंपरागत अधिकार नष्ट करणे मला आवश्यक वाटत नाही. कालांतराने हे अधिकार नाहीसे झाले पाहिजेत हे मलाही मान्य आहे परंतु अगदी तडकाफडकी नव्हे. आपल्या देशाला अनेक महत्त्वाचे प्रश्न भेडसावीत आहेत आणि अल्प महत्त्वाच्या बाबींमध्ये स्वतःला गुंतवून ठेवण्याऐवजी या महत्त्वाच्या प्रश्नांवर आपण आपले लक्ष केंद्रित करावयास पाहिजे. या विषयावर आपल्याला कायदा करावयाचाच असेल तर असा कायदा समजण्यास सोपा आणि अंमलबजावणी करण्यास सुलभ असला पाहिजे.

२.१६. पारशी समाजात कोणतेही रूढीगत आणि वंशपरंपरागत अधिकार नाहीत. वस्तुतः या समाजामध्ये कोणताही पुरोहित वर्ग नाही. कोणताही पारशी गृहस्थ कोणताही समारंभ पार पाडू शकतो. तथापि, हे काम करण्यासाठी प्रशिक्षण घेतले असले पाहिजे ही अट आहे आणि नवसारी व सुरत येथे पारशी पंचायतीने प्रशिक्षणाची सोय केली आहे. ही पद्धत इतकी लवचिक आहे की त्यामुळे कोणत्याही विशिष्ट व्यक्तीस कोणताही विशिष्ट अधिकार किंवा सत्ता प्राप्त होत नाही.

२.१७. जगामध्ये आज पारशांची एकूण लोकसंख्या १,३३,००० एवढी आहे. त्यापैकी ८०,००० पारशी एकट्या मुंबईमध्येच आहेत.

### श्री. विठ्ठलराव सातव, अध्यक्ष, जिल्हा परिषद, पुणे

२.१८. रूढीगत अधिकार आजही अस्तित्वात असल्याचे दिसते. उदाहरणार्थ, 'पोळा' या सणाच्या दिवशी बैलांची मिरवणूक काढण्यात येते आणि कोणाचा बैल पुढे असावा हा एक भयंकर संघर्षाचा प्रश्न उद्भवतो व अखेरीस भांडणामध्ये त्याचे पर्यवसान होते. अग्रहक्काच्या या प्रश्नामुळे, सुमारे ६–७ वर्षांपूर्वी वडगाव–शिंदे (तालुका हवेली, जिल्हा पुणे) येथे एक खूनही झाला होता. संबंधित व्यक्तींवर न्यायालयात खटला झाला आणि त्यांना योग्य शिक्षाही देण्यात आली. परंतु अशी भांडणे आता अगदी क्वचितच होतात असे मला वाटते.

२.१९. काही वर्षांपूर्वी, 'पूजा' करण्यासाठी कोणताही पुरोहित (भटजी, गुरव आणि जंगम) असल्याखेरीज पूजा करता येत नसे. ही प्रथा आता फारशी दिसत नाही आणि अशा प्रथेचा आता फारसा प्रभावही राहिलेला नाही. उद्यास येणारी नवीन पिढी अशा बाबींकडे फारसे लक्ष देत नाही आणि पुरोहिताच्या पूजा करण्याच्या रूढीगत अधिकाराचे महत्त्व कमी कमी होत चालले आहे गणपतीची असंख्य देवळे आहेत परंतु 'दर्शन' घेण्याकरिता काही विशिष्ट अंतरापर्यंतच लोकाना प्रवेश दिला जातो. रांजणगावसारख्या ठिकाणी असे घडत आहे. भटजी आणि गुरव हे या देवळांचे नियंत्रक आहेत आणि ते केलेल्या सेवांबद्दल पैशांची मागणी करण्याच्या आपल्या अधिकाराचा ते अद्यापही वापर करतात, या देवळात भटजी, गुरव व जंगम यांच्याखेरीज इतर कोणत्याही व्यक्तींचे नियंत्रण नाही. देवळात येणाऱ्या भक्तांकडून देवळाला जी काही 'दक्षणा' (दान) देण्यात येते तीसुद्धा हे भटजी स्वतःच घेतात.

२.२०. हे अधिकार रूढींमुळे आहेत की जात आणि जन्म यानुसार आहेत हे सांगणे शक्य नाही. असा फरक करणे काहीसे कठीणच आहे.

२.२१. या विषयावर एक कायदा असावा या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. रूढीगत किंवा वंशपरंपरागत अधिकार हे कायद्यानेच नष्ट करावे लागतील. कदाचित अशा प्रकारचा कायदा आपण विविध थरांवर पूर्णपणे अंमलात आणू शकणार नाही, परंतु अशा अधिकारांचे अस्तित्व आणि वापर हे अगदी अन्याय्य आणि त्याज्य आहे. असे एक वातावरण आणि भावना आपण लोकांमध्ये निर्माण करू शकू. एकदा हे अधिकार कायद्याने नष्ट केले म्हणजे मग या कायद्याच्या कोणत्याही तरतुदींचा भंग हा दखलपात्र गुन्हा मानला पाहिजे.

२.२२. मुसलमान, खिस्ती, पारशी इत्यादींसारख्या इतर समाजांतील रूढीगत अधिकारांनाही हा कायदा लागू असला पाहिजे हे मला मान्य आहे.

**श्री. भाऊसाहेब चव्हाण, माजी महापौर, पुणे**

२.२३. महारदेखील अतिशय कर्तत्ववान सैनिक होते आणि ब्रिटिशांच्या काळात त्यांनी अनेक लढाया लढलेल्या आहेत. त्यांची निष्ठा आणि इमानदारी यांची बूज राखून ब्रिटिश राज्यकर्त्यांनी त्यांना वतन म्हणून काही जमिनी दिल्या, त्या "महार वतने" म्हणून ओळखल्या जातात. ही वतने सद्हेतून देण्यात आली होती. परंतु कालांतराने त्याचे गुलामगिरीच्या पद्धतीत रूपातर झाले. १८७४ मध्ये, व्हिक्टोरीया राणीच्या काळात ही वतने देण्यासाठी एक कायदा करण्यात आला होता. परंतु मी वर सांगितल्याप्रमाणे याचेच पुढे एकप्रकारच्या गुलामगिरीमध्ये रुपांतर झाले. ही निकृष्टप्रतीची महार-वतने नष्ट करावी असा जोरदार प्रचार डॉ. आंबेडकरांनी केला. परंतु हे नष्ट करण्यासाठी, १९५८ मध्ये, म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर कायदा करण्यात आला. महार-वतने नष्ट केल्यानंतर, शासनाने या जमिनी स्वतःकडे घेतल्या आणि मूळ वतनदार महाराला योग्य भरपाई देऊन त्या निरनिराळ्या व्यक्तींना विकून टाकल्या. मी अशी विनंती करतो की, जमिनी मूळ महारांना पुन्हा परत द्याव्या आणि जमिनी परत देण्यासाठी असलेली सद्याची १९६८ पर्यंतची कालमर्यादा १९८० पर्यंत वाढविण्यात यावी. मी अशीही विनंती करितो की, 'महार' हा शब्द अप्रतिष्ठाकारक असल्यामुळे तो काढून टाकावा. अधिकाराभिलेखामध्ये 'महार', असा जातीवाचक निर्देश करण्याऐवजी त्या त्या अधिकाराभिलेखातून व्यक्तींची आडनावे नोंदण्यात यावीत.

२.२४. तगाई कर्जे, आणि बियाणे, अवजारे इ. च्या खरेदीसाठी विभागाकडून मिळणारी कर्जे, अशासारख्या शासनाकडून मिळणाऱ्या विविध सवलती या वतन जमीनीच्या बाबतीत उपलब्ध होत नाहीत असे मला आढळून आले आहे. म्हणून या जमिनी ज्यांच्या मालकीच्या आहेत अशा व्यक्तींनाही या सवलतीचा लाभ दिला पाहिजे.

२.२५. आपण 'मानपान' काढून टाकले तरी भरपाई देण्याची गरज नाही कारण, बरोबर असो किंवा चुकीचे असो इतकी वर्षे अनेकांनी मानपानापासून त्यांना मिळणारे फायदे पदरी पाडून घेतलेले आहेत. हे मानपान कायद्यानेच काढून टाकले पाहिजेत आणि या विरुद्धचा गुन्हा हा दखलपात्र गुन्हा मानला पाहिजे. मानपानाच्या रिवाजामुळे खूपच हिंसक स्वरूपाची भांडणे झालेली आहेत. हिंगणी-गड (तालुका दौंड) आणि दाहेरगाव येथे अशी भांडणे झालेली माझ्या पाहण्यात आहेत. काही ठिकाणी मला असेही आढळून आले की, काही कुटुंबांना त्यांची एखादी मुलगी देवदासी म्हणून किंवा एखादा मुलगा पोतराज म्हणून वाहण्यास सांगण्यात येते. हे सर्व बंद झाले पाहिजे. 'मरीआई' देवीचा उत्सवही साजरा केला जातो. आणि या उत्सवा-नंतर एका विशिष्ठ महारानेच, देवीची मूर्ती गावाच्या वेशीपर्यंत न्यावयाची असते. मी असे सुचवितो की, 'मरीआईगाडा' चा उत्सव तसाच राहिला तरी चालेल परंतु मरीआईची मूर्ती नेण्याचा अधिकार एकाद्या विशिष्ठ महारालाच असू नये.

२.२६. महत्त्वाच्या व्यक्तींनी समितीसमोर दिलेल्या तोंडी साक्षींचे विवेचन केल्यानंतर आता आम्ही प्रश्नावलीच्या लेखी उत्तरांच्या सारांशाकडे वळू.

**प्रश्न १.—दसरा, दिवाळी, पोळा, शिमगा, पाडवा इत्यादी प्रसंगी पाळण्यात येणारे मानपान आणि महाराष्ट्रामधील खेडी, नगरे व शहरे येथे तशाच प्रकारे पिढ्यानपिढ्या अस्तित्वात असलेल्या अन्य रुढी यांसह रूढीगत व वंशपरंपरागत अधिकारांबाबत आपली काय कल्पना आहे ?**

**तहसीलदार, महाड, जिल्हा कुलाबा**

२.२७. दसरा, दिवाळी, पोळा, शिमगा आणि पाडवा यांसारखे उत्सव साजरे केले जातात. प्राचीन काळा-पासून अशा प्रत्येक सणाचे स्वतःचे असे काही धार्मिक महत्त्व आहे. या दिवशी केल्या जाणाऱ्या चांगल्या कृत्यांचा आणि घटनांचा यशस्वी शेवट होतो आणि अशी कृत्ये करणारी माणसे आनंदाने आणि सुखाने जगू शकतात असा समज आहे.

### प्राचार्य, कनिष्ठ शिक्षण महाविद्यालय, नांदगाव, नाशिक

२.२८. दसऱ्याच्या दिवशी पाटील किंवा इतर कोणीतरी त्याच्याच तोडीची व्यक्ती पूजा करण्याचा अधिकार स्वतःकडे घेते. अशाच प्रकारच्या सर्व प्रसंगी, "मंत्र" म्हणण्यासाठी ब्राम्हणाला पाचारण करण्यात येते, तर महार, मांग इत्यादीसारख्या मागासवर्गाच्या व्यक्तींना जबरदस्तीने "वाजंत्री" वाजवण्यास भाग पाडण्यात येते.

### प्राचार्य, शासकीय शिक्षण महाविद्यालय, आंबेजोगाई (बीड)

२.२९. "मानपाना"च्या रूढिगत आणि वंशपरंपरागत अधिकार हे फक्त मागास क्षेत्रामध्येच प्रचारात आहेत.

### प्राचार्य, शासकीय कनिष्ठ शिक्षण महाविद्यालय, नांदेड

२.३०. पराक्रमी व्यक्तींनी आपल्या शासकांची जी सेवा बजावली त्यामूळे "मानपाना"सह रूढिगत आणि वंशपरंपरागत अधिकार अस्तित्वात आलेत आणि त्यांच्या (पराक्रमी व्यक्तीच्या) शौर्यासाठी त्यांना त्यांच्या शासकांनी बक्षिस म्हणून काही अधिकार बहाल केलेत. धार्मिक समारंभांमध्ये, काही व्यक्तींना त्यांच्या लक्षणीय वर्तनामुळे आणि धर्मशीलतेमूळे काही अधिकार दिले गेलेत. उदाहरणार्थ, दसऱ्याच्या दिवशी, देशमुख, देशपांडे, जहागीरदार, पाटील किंवा महान, योग्य, सन्मान्नीय मानल्या जाणाऱ्या अशाच एखाद्या व्यक्तीला, पूजेचा पहिला मानकरी म्हणून 'शमीच्या झाडांची' पूजा करण्याकरिता सांगितले जायचे. दुसरे उदाहरण म्हणजे "पोळया"च्या दिवशी, पाटील, देशमुख किंवा तशाच एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीला, पहिल्या प्रथम त्याचे बैल घेऊन मारुतीच्या देवळा-भोवती प्रदक्षिणा घालण्याचा "मानपान" देण्यात येतो.

### प्राचार्य, कनिष्ठ शिक्षण महाविद्यालय, बसमतनगर

२.३१. "पोळया"च्या दिवशी गावातील बैल मिरवणुकीने फिरवण्यात येतात आणि ह्या बैलांना त्यांच्या पारंपारिक रूढिनूसार क्रमांक देण्यात येतात

### * कुलसचिव (प्रशासन) नागपूर विद्यापीठ, नागपूर

२.३२. महाराष्ट्रामध्ये पुढील व्यक्तींना वंशपरंपरागत अधिकार आहेत :—

(एक) पाटील : गावाचा प्रमुख;

(दोन) कुलकर्णी : महसूल कारकून/हिशेबनीस;

(तीन) गुरव : देवळाचा पुजारी;

(चार) तलार (महार) : गाव चाकर.

या वर्गांमधील व्यक्तींना जमीन व इतर वंशपरंपरागत विशेषाधिकार बहाल करण्यात आले होते. सोनार सुतार इत्यादींसारखे आणखी काही वंशपरंपरागत सेवकही होते. या अधिकारांना रूढिचे आणि लोकभावनेचे संरक्षण होते.

### श्री. जे. जी. कांगा, जिल्हाधिकारी, पुणे

२.३३. (एक) काही गावांमध्ये पोळयाच्या उत्सवाच्या वेळी पाटलाला मिरवणुकीमध्ये स्वतःचा बैल पुढे ठेवण्याचा अधिकार असतो.

(दोन) पोळयाच्या दिवशी बैलांची मिरवणक काढण्याचा हक्क, शेंदूर लावून मारुतीची पूजा सर्व प्रथम करण्याचा हक्क अशासारखे काही वंशपरंपरागत अधिकार व रूढि महाराष्ट्राच्या ग्रामीणक्षेत्रात प्रचलित आहेत. दसऱ्याच्या दिवशी सर्व ग्रामस्थ चावडीवर किंवा गावातील देवळामध्ये जमतात आणि वाजतगाजत गावाच्या वेशीकडे म्हणजे "शिवे"कडे जातात. पाटील आणि गावामधील इतर प्रतिष्ठित व्यक्ती "शमी"च्या व "आपटया"च्या झाडांची पूजा करतात आणि नंतर त्या झाडांची पाने काढून घेण्यास सुरुवात होते, यालाच "सोने लूटणे" म्हणतात. दिवाळीच्या दिवशी, मागासवर्गांमधील व्यक्ती, कुलकर्णी, पाटील इत्यादींना "टिळा" लावण्यासाठी जातात आणि मोबदल्यात त्यांना गोडधोड, धान्य किंवा जुने कपडे मिळतात.

(तीन) "पोळा" हा ऑगस्ट श्रावण–भाद्रपद महिन्यामध्ये येणारा आणि सर्व ग्रामीणक्षेत्रामधील शेतकऱ्यांकडून साजरा केला जाणारा एक महत्त्वाचा सण आहे. या दिवशी बैलांना व गाईंना सजविण्यात येऊन त्यांची पूजा करतात आणि नंतर मिरवणुकीने त्यांना ग्रामदेवतेकडे नेले जाते. या दिवशी बैलांना कामाला जुंपले जात नाही. भारतामधील शेतकऱ्यांना बैल शेताच्या कामामध्ये मदत करतात. त्यामुळे, त्यांच्या दृष्टीने हा दिवस अतिशय महत्त्वाचा असतो.

**प्रश्न २.—पूर्वीच्या सत्ताधिकाऱ्यांनी तुमच्या भागात कोणाही व्यक्तीला किंवा जमातीला प्रदान केलेले कोणतेही रूढिगत किंवा वंशपरंपरागत अधिकार किंवा सामाजिक आणि संस्थागत सवलती सध्याच्या काळातही वापरल्या जात आहेत असे तुम्हाला वाटते काय? तसे असल्यास, ते कोणते आहेत आणि त्यांचे सामाजिक धार्मिक स्वरूप काय आहे आणि हे रूढिगत हक्क किंवा 'मानपान' कोणत्या प्राधिकरणाकडून देण्यात आले यासंबंधात तुमच्या कल्पना आणि तुम्हाला असलेली सर्व माहिती तुम्ही देऊ शकाल काय?**

**श्री. अशोक चौधरी (संपादक, 'समाज क्रांती' मराठी वृत्तपत्र, परभणी)**

२.३४. (एक) 'मानपाना'चे वर्गीकरण तीन वर्गांमध्ये करता येईल (एक) सामाजिक, (दोन) धार्मिक आणि (तीन) आर्थिक,. सामाजिक "मानपाना"मध्ये होळी पेटवणे आणि "पोळ्या"च्या दिवशीची बैलांची मिरवणुक यांचा समावेश होतो. धार्मिक "मानपानां"मध्ये मंत्रांचे पठण आणि फलज्योतिषाच्या आधारे भविष्य सांगणे यांचा समावेश होतो. बलुतेदारांचा अंतर्भाव आर्थिक वर्गात होतो. आता कोतवालदेखील बलुतं मागतात हे सर्व "मानपान" पूर्वीच्या सामाजिक व्यवस्थेचे परिणाम आहेत. उदा. ग्रामीणक्षेत्रात सरदेशमुखी, चौथाई, बसुली इत्यादी गोष्टी अजूनही वसूल करण्यात येतात.

**श्री. पी. एस. पाटील, माजी आमदार**

२.३५. (१) "तलवार" नावाची एक जमात असून ती कोणत्याही मालाचा किंवा विक्रेय वस्तुंचा जाहीर लिलाव पुकारण्याचा हक्क बजावते. त्यांना या कामाचा मोबदला मिळत नाही. परंतु हे काम त्यांच्याकडून वंशपरंपरागत रुढीनुसार करून घेण्यात येते. ही गोष्ट बंद केली पाहिजे आणि लिलावाचे काम कोतवालाकडे सोपविले पाहिजे.

(२) काही खेड्यांत अद्यापही स्त्री/पुरुषांना एखाद्या दैवताला किंवा स्थानिक देवतेला वाहण्यात येते आणि रुढीप्रमाणे त्यांना आयुष्यभर ब्रम्हचारी अथवा अविवाहित रहावे लागते. यामुळे वेश्या व्यवसाय ास उत्तेजन मिळते.

**तहसीलदार, महाड, जिल्हा कुलाबा**

२.३६. खालील अधिकार अद्याप प्रचलित आहेत :—

(१) महत्त्वाच्या उत्सवाच्या दिवशी खेड्यांतील विवक्षित व्यक्तींनीच देवाची पालखी वाहून नेणे,

(२) देवाच्या पुजेच्या वेळी "मानपान" घेणे आणि इतर सर्व लोकांपेक्षा अग्रमान मिळवणे,

(३) काही देवांच्या वतीने लोकांनी देवाला दिलेल्या [नारळ, खण यांसारख्या भेटी इतर मिठाया आणि दागदागिणे स्वतः घेणे,

(४) देवळात मानाचे विशिष्ट स्थान असणे,

(५) देवासमोर ठेवलेल्या भेटवस्तू घेण्याचा अधिकार,

(६) देवाच्या संपत्तीपासून मिळणाऱ्या फायद्याचा उपभोग घेणे.

पूजा करणाऱ्या आणि देवळाची व्यवस्था पहाण्याची जबाबदारी असलेल्या व्यक्तींना हे सर्व अधिकार सर्वसाधारणपणे मिळतातच.

हे लोक हा अधिकार प्राचीन काळापासून पिढ्यानपिढ्या उपभोगत आहेत.

प्रश्न ३.—या अधिकारांखेरीज तुमच्या क्षेत्रात जन्माच्या किंवा जातीच्या आधारे काही परंपरागत अधिकार प्रचलित आहेत काय? जर असतील तर तुम्ही त्यांचे मूळ कशात आहे म्हणजे ते कसे आणि कशासाठी निर्माण झाले ते सांगू शकाल काय? तुम्ही त्यांचे स्वरूप सांगू शकाल काय?

**गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सोयगाव, जिल्हा औरंगाबाद**

२.३७. काही उत्सवांच्या प्रसंगी, विवक्षित जातीचे लोक दारोदार जाऊन लोकांची कामे करतात, आणि त्याद्वारे काही पैसे मिळवतात. याची उदाहरणे म्हणजे,—(अ) खेड्यांतील वतनदारांसारख्या महत्त्वाच्या व्यक्तींना

निरोप पोचवणे, (ब) "धोबी" जमातीतील किंवा "महार" जमातीतील स्त्रियांकडून ओवाळून घेणे. ही कामे विशेषेकरुन कनिष्ठ जातीतील लोकांकडून करवून घतली जातात. या प्रथा सरंजामशाहींच्या काळात अस्तित्वात आलेल्या आहेत. वतनदारांना सामाजिक महत्त्व देणे आणि कनिष्ठ जातीतील गरीब लोकांना एक उत्पन्नाचे साधन पुरवणे हा त्यामागील उद्देश आहे. परंतु अशी सेवा करण्याची कोणावरही सक्ती नसल्यामुळे या प्रथा आपोआपच बंद पडत आहेत असे दिसते. बहुधा असे दिसते की, गरीब लोक पैसे मिळवण्याचा एक मार्ग म्हणून या प्रथांचे पालन करीत असतात.

### भारतीय समाजकल्याण परिषद, मुंबई

२.३८. महाराष्ट्रातील "माधुकरीचे" उदाहरण घ्या, यामध्ये फक्त ब्राम्हणालाच "माधुकरी" म्हणून अन्न किंवा काही दान मागण्याचा अधिकार आहे. आम्हाला असे वाटते की, सध्याच्या समाजात जन्मावर किंवा जातीवर आधारलेल्या कोणत्याही अधिकाराला स्थान नाही.

२.३९. **श्रीमती सुशीला गाडगीळ, प्राचार्य, आदर्श बालशिक्षण महाविद्यालय, नाशिक**

जन्मामुळे किंवा जातीमुळे ब्राम्हण कुटुंबात जन्मलेला ब्राम्हण मनुष्य पूजा अर्चा, लग्न, मुंज, भूमीपूजन आणि इतर वेगवेगळी धार्मिक कार्ये करू शकतो. पिढ्यानपिढ्या ब्राम्हण अशाप्रकारचे जीवन जगत होते आणि म्हणून, त्यांना सामाजिक व धार्मिक अधिकारांच्या क्षेत्रात वर्चस्व प्राप्त झाले.

खेड्यामध्ये पाटलांना आपले शेत प्रथम नांगरण्याचा अग्रहक्क होता. (याचाच गर्भितार्थ असा की, पाटलाने नांगरणीस सुरूवात केल्याखेरीज खेड्यातील शेतकऱ्यांना त्यांची नांगरणी सुरू करता येत नव्हती.)

### जिल्हाधिकारी, सांगली

२.४०. दरवर्षी असंख्य सामाजिक/धार्मिक समारंभ साजरे होत असतात आणि त्यामध्ये जन्माच्या व जातीच्या आधारे परंपरागत व रूढीगत अधिकार पाळले जातात. या रूढी प्राचीन काळापासून चालत आलेल्या आहेत आणि त्या कशा अस्तित्वात आल्या ते नेमके सांगणे सोपे नाही. या प्रयोजनासाठी खास चौकशीच करावी लागेल. परंतु ग्रामीण समाजामध्ये ऐक्य आणि स्थैर्य आणण्याच्या कामी हातभार लावणे हा या अधिकारांमागचा उद्देश निश्चितच होता. त्यांचे धार्मिक महत्त्व जरी कमी झाले असले तरी त्यांचे सामाजिक महत्त्व आजही तेवढेच आहे. या समारंभांचा अत्यावश्यक भाग असलेले वेगवेगळे वंशपरंपरागत व रूढीगत अधिकार हे जवळ-जवळ त्या समारंभांसोबतच निर्माण झाले. पूर्वीच्या काळी हे अधिकार व "मानपान" एखाद्या विशिष्ट कुटुंबाकडे किंवा जातीकडे असत, कारण त्या कुटुंबाचा किंवा त्या शिशिष्ट जातीचा त्या संपूर्ण खेड्यावर सामाजिक व आर्थिक प्रभाव असे. विशेषेकरून, बलुतेदारांना या समारंभांमध्ये महत्त्वाचे स्थान असे. बलुतेदार आणि अस्पृश्य संपूर्ण खेड्याची जी सेवा करीत त्याचे चीज करून त्यांना काही बक्षीस देण्यासाठी त्यांना विशिष्ट "मानपान" दिले जात. आता, बलुतेदारी नष्ट झाल्यामुळे ज्या विशिष्ट कुटुंबाला पूर्वी विशिष्ट "मानपान" दिला जात असेल ते कुटुंब तो विशिष्ट व्यवसाय आता कदाचित करीत देखील नसेल. उदा. सोनाराच्या कुटुंबातील व्यक्ती ही आज इतर व्यवसाय करून आपली उपजीविका चालवीत असेल परंतु तरीसुद्धा उत्सवाच्या वेळी गावातील लोक त्याला त्याचे परंपरागत अधिकार बजावण्यास आणि अशा रीतीने आपले मानपान घेण्यास बोलावतात. यावरून असे दिसते की, या समारंभांचे आर्थिक महत्त्वदेखील नष्ट झाले आहे, परंतु त्यामागील सामाजिक व मानसिक भावना मात्र आजही टिकून आहेत. अशा मानपानांच्या अभावी, बरेचसे उत्सव साजरे होऊच शकणार नाहीत.

### तहसिलदार, महाड

२.४१. खेड्यातील काही देवतांच्या बाबतीत काही विशिष्ट कामे ठराविक कुटुंबांनाच त्यांची जात इत्यादि लक्षात नघेता, सोपविली जातात. या गोष्टी पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या आहेत.

### प्राचार्य, कनिष्ठ शिक्षण महाविद्यालय, नांदगाव, जिल्हा नाशिक

२.४२. आमच्या भागात फक्त ब्राम्हणांनाच विशिष्ट देवांची पूजा करण्याची मुभा आहे. काही ठराविक कुटुंबांनाच शेंदूर लावण्याचा अधिकार आहे.

### श्री. शेख रमझान संपादक 'ताबीर', अकोला

२.४३. मी गवळी समाजातील आहे. श्रीकृष्णाचे संरक्षण व त्याचा सांभाळ करण्याचा मान आमच्या समाजाला मिळाला आहे. महाराष्ट्रामध्ये आपल्याला मोठमोठ्या शहरांच्या कानाकोपऱ्यात या जमातीचे लोक त्यांच्या गायींगुरांसह आढळतील. या समाजातील आर्थिक दृष्ट्या मागासलेला व अडाणी वर्ग हा विवक्षित वंशपरंपरागत अधिकारांचा उपभोग घेणाऱ्या लोकांच्या तावडीत सापडलेला असतो. प्रत्येक शहरात तीन गट किंवा भाग असतात व संपूर्ण सामाजिक व्यवस्थेवर त्यांचे वर्चस्व असते. पहिला म्हणजे चौधरी. सामाजिक समारंभ पार पाडण्यासाठी त्यांची अतिशय गरज आहे असे मानतात. त्यांच्याशिवाय कोणताही समारंभ किंवा विवाह पार पाडता किंवा सुरूदेखोल करता येत नाही. घरगुती तंट्यात किंवा सामाजिक विवादात चौधरीचा शब्द हा अखेरचा शब्द असतो. चौधरीनंतर सर्व धार्मिक समारंभात पाटलाचे स्थान त्या खालोखाल असते. दिवाळी-दसऱ्यासारखे सण पाटलाशिवाय साजरे करता येत नाहीत. या कामांसाठी पाटील स्वतःच्या मनास येईल त्याप्रमाणे पैशाची मागणी करतो. तिसरा मान गुरवाचा असतो. हा वरील पहिल्या दोघांच्या हाताखालचा असतो आणि त्यांच्या गैरहजेरीत त्यांच्या अधिकारांची अंमलबजावणी करतो. या लोकांनी असा समज पसरवला आहे की, भगवान श्रीकृष्णानेच त्यांना हे अधिकार दिले आहेत आणि प्रत्यक गवळयाने त्यांच्या आज्ञेचे पालन करणे हे त्याचे कर्तव्य आहे.

### श्री. बी. एस. माने, अध्यक्ष, जिल्हा परिषद, कोल्हापूर

२.४४. आमच्या भागात, जन्माच्या व जातीच्या व रूढीच्या आधारावर विवक्षित परंपरागत अधिकार अस्तित्वात आहेत. उदाहरणार्थ सामाजिक समारंभात किंवा धार्मिक समारंभात किंवा लग्नप्रसंगी पाटील व बलुतेदार यांचा 'मानपान'. हे अधिकार फार फार वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेले असणार.

प्रश्न ४ : वर उल्लेखिलेल्या प्रकाराच्या आणि सध्या तुमच्या भागात प्रचलित असलेल्या सर्व अधिकारांची, रूढींची, मानपानांची जंत्री तुम्ही करू शकाल काय ?

### भारतीय समाजकल्याण परिषद, मुंबई

२.४५. स्थूलमानाने, 'मानपानाच्या' रूढीगत व वंशपरंपरागत अधिकारात कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, पटेल, वतन इत्यादिंचा समावेश होतो. मुंबई परगणा व कुलकर्णी वतन (नष्ट करण्याबाबत) अधिनियम, १९५० आणि मुंबईचा कनिष्ट ग्राम वतने नष्ट करण्याबाबतचा अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र महसूल पाटील (पद नष्ट करण्याबाबतचा) अधिनियम, १९६२ यांमध्ये सामाजिक बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने उत्तम संदर्भ दिला आहे. तथापि, पैशाच्या किंवा वस्तूच्या रूपाने रूढीने फी वसुली करण्याचा अधिकार नष्ट करणे किंवा काही कामे करण्याची सक्ती यांसारखे परंपरागत समाजाने निर्माण केलेले सामाजिक अधिकार नष्ट करण्यासाठी फक्त कायद्याची चौकट पुरेशी ठरणार नाही. परंतु, वस्तुत: अद्याप समता प्रस्थापित झाली आहे असे वाटत नाही. विशेषकरून जेव्हा आपण महाराष्ट्रातील आदिवासींची स्थिती पाहतो, तेव्हा आपल्याला असे दिसते की, आदिवासींवर अद्यापही अन्याय होत असून त्यांची फार मोठ्या प्रमाणावर पिळवणूक होत आहे. वर उल्लेखिलेल्या कायद्यांमुळे परिणामकारक अंमलबजावणीची चौकट हाती येण्यास नक्कीच मदत झाली आहे. परंतु, या अधिनियमांद्वारे, आपल्याला जे काही हव होत ते साध्य करता येणे शक्य नाही आणि आदिवासींच्या बाबतीत अजूनही बरेच काही करता येण्यासारखे आहे.

### श्री. एस. आर, देसाई, प्राचार्य, कनिष्ठ शिक्षण महाविद्यालय, रत्नागिरी

२.४६. गावामध्ये पुढील वतनदार आहेत :—

(अ) **धर्माधिकारी**.—गावामध्ये पाळल्या जाणाऱ्या धार्मिक विधींचा हा प्रमूख असतो. सर्व धार्मिक प्रकरणांच्या संबंधात तो सल्ला देतो. गावातील सर्व लोक त्याला मान देतात.

(ब) **गावकर**.—गावामधील एखाद्या वाडीचा किंवा विवक्षित भागाचा हा मुख्य असतो. त्या भागाचा तो प्रतिनिधी असतो व त्याचा प्रमूख म्हणून काम करतो. लोक त्याला "गावडया" म्हणतात.

(क) **खोत**.—जेव्हा विविध समारंभ साजरे केले जात असत तेव्हा खोत गावचा पुढारी होता. खोताला पैशात किंवा वस्तूच्या स्वरूपात "मानपान" देऊन लोक त्याला मान देतात. अशा समारंभाचे वेळी याला अत्यंत मानाचे स्थान असते.

(ड) **महाजन**.—हा खोताचा मदतनीस असतो. खोताच्या गैरहजेरीत त्याचे सर्व "मानपान" महाजनाला देण्यात येतात. गावचा खजिना त्याच्या ताब्यात असतो.

(इ) **कुळकर्णी**.—हा गावचा चिटणीस असतो. गावचे हिशेब व फायली तो ठेवतो.

### जिल्हाधिकारी, सोलापूर

२.४७. वर उल्लेख केलेल्या प्रकारात (जन्म आणि जात यांच्या आधारे चालत आलेल्या अधिकारां-व्यतिरिक्त) पुढील अधिकार, रूढी, मानपान आहेत व ते सध्या या जिल्ह्यात (सोलापूर) अस्तित्वात आहेत :—

(एक) पोळ्याच्या दिवशी बैल मिरवण्याचा पोलीस पाटलाचा अधिकार ;

(दोन) सोलापूर जिल्ह्यात नाते गावी चैत्र महिन्यातील यात्रेच्या वेळी "गुप्तलिंग" व "गिरिजा-पति" देवांच्या उत्पन्नावर देशमुख, देशपांडे यांचा असणारा अधिकार ;

(तीन) दसरा, दिवाळी इत्यादी सणांच्या दिवशी मानकऱ्यांच्या घरांपुढे "वाजंत्री" वाजवण्याची सक्ती करण्याचा अधिकार ;

(चार) गावामध्ये रात्रीच्या वेळी गस्त घालण्याचा व त्या भागातील लोकांकडून भाकरी मागण्याचा रामोशाचा अधिकार ;

(पाच) देवळातील देवांपुढील वस्तू गोळा करण्याचा पुजाऱ्याचा अधिकार.

### गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड

२.४८. पोळ्याच्या दिवशी एखाद्या विशिष्ट वतनदाराचा बैल इतर सर्व बैलांच्या पुढे ठेवण्याचा अधिकार.

(दोन) दसऱ्याच्या दिवशी एखाद्या विवक्षित कुटुंबातील व्यक्तीने गावातील सर्व लोकांच्या पुढे राहणे.

(तीन) कुटुंबातील नवीन लग्न झालेल्या जोडप्याने विवक्षित मानकऱ्यांच्या कुटुंबाचे आशीर्वाद मिळवणे.

(चार) असे मानकरी आल्याशिवाय काही सामाजिक संमेलने किंवा उत्सव सुरू न होऊ शकणे.

### तहसिलदार, महाड

२.४९. (एक) विशिष्ट देवतेच्या उत्सवाच्या वेळी किंवा सर्वसामान्य उत्सवाच्या वेळी गावातून पालखी फिरवताना तिला काही विवक्षित व्यक्तींनीच खांद्यावर उचलून नेणे.

(दोन) देवतांच्या पूजेच्या वेळी किंवा उत्सवाच्या वेळी "मानपान" किंवा इतर भेट वस्तू घेणे.

(तीन) देवळाला भेट देणाऱ्या व्यक्तींकडून मिळणाऱ्या वस्तू किंवा देवतेला अर्पण केलेल्या वस्तू देवतेच्या वतीने घेणे.

(चार) देवदेवतेच्या वतीने मिळणाऱ्या उत्पन्नातील ठराविक हिस्सा घेणे.

(पाच) देवांची जपणूक करणे व त्यांची निगा राखण्यासाठी देवदेवतांच्या नावे दिलेल्या जमिनीचा उपभोग घेणे.

### पोलीस अधीक्षक, बुलडाणा

२.५०. चिखली येथे, देवीच्या मिरवणुकीच्या वेळी नगरपालिकेचा अध्यक्ष मिरवणुकीच्या अग्रभागी राहण्याचा मान असतो.

### जिल्हाधिकारी, पुणे

२.५१. (अ) नवरात्रीच्या वेळी (कार्ला देवीला) वसौली, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथील पाटलालाच बोकड कापण्याचा अधिकार आहे.

(ब) जेजूरीच्या खंडोबापुढे "जागरण-गोंधळ" करण्याचा अधिकार त्या गावच्या वाघ्या-मुरळीलाच आहे.

### श्री. अशोक चौधरी, परभणी

२.५२. पुढील अधिकार अस्तित्वात आहेत :—

(एक) दसऱ्याचे दिवशी बोकड कापणे व रक्ताचा टिळा लावणे ;

(दोन) दसऱ्याचे दिवशी "मशाल" मिरवणूक काढणे ;

(तीन) दसऱ्याच्या दिवशी घोड्याला आंघोळ घालणे व मिरवणुकीत घोडा धरणे ;
(चार) दिवाळीच्या दिवशी मानकऱ्यांना उटणे लावणे ;
(पाच) दसरा व दिवाळीच्या दिवशी वाद्ये वाजवणे ;
(सहा) दसऱ्याच्या दिवशी "शमी" व आपट्यांच्या झाडांची पूजा करणे व झेंडा लावणे ;
(सात) दसरा व पाडवा इत्यादि दिवशी बैलांच्या झुंजी लावणे ;
(आठ) दिवाळी, पाडवा या सणांना बक्षीस मागण्याचा अधिकार ;
(नऊ) देवळासमोर नारळ व इतर पूजा वस्तू विकणे ;
(दहा) देवदेवतांना अर्पण केलेल्या वस्तू घेण्याचा अधिकार ;
(अकरा) देवदेवतांना वाहिलेली किंवा सोडलेली जिवंत किंवा मृत जनावरे घेण्याचा अधिकार ;
(बारा) देवळात राहण्याचा अधिकार ;
(तेरा) होळी पेटवणे व नैवेद्य घेणे ;
(चौदा) लग्न समारंभाच्या वेळी टिळा, पान-सुपारी घेण्याचा अधिकार ;
(पंधरा) देवदेवतांची पालखी वाहून नेण्याचा अधिकार ;
(सोळा) मेलेल्या जनावरांचे कातडे सोलण्याचा अधिकार.

**संपादक, ग्रामीण समाचार, भंडारा**

२.५३. (एक) रावणाची प्रतिमा जाळण्याचा अधिकार ;
(दोन) पोळ्याच्या दिवशी "तोरण" तोडणे व भाकरी मागणे ;
(तीन) दिवाळीच्या दिवशी बक्षिसी देणे.

**श्री. शंकर दाते, पुणे**

आळंदीवरून पुण्याला आणण्यात येणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीला सामोरे जाणे. पुण्याच्या महापौरांना या पालखीला सामोरे जाण्याचा अधिकार आहे.

**प्रश्न ५.—सर्व पाटील वतने, कुळकर्णी, देशमुख, देशपांडे, इत्यादी वतने तसेच सर्व कनिष्ठ ग्राम वतने महाराष्ट्र महसुली पाटील (पदे रद्द करणे) अधिनियम, १९६२, मुंबई परगणा व कुळकर्णी वतने (रद्द करणे) अधिनियम, १९५० व मुंबईचा कनिष्ठ ग्राम वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ नष्ट करण्यात आलेली आहेत. तसेच उक्त तीन अधिनियमांखाली पाटील वतनांखालील कुळकर्णी इ. वतनांखालील सर्व जमिनी, कनिष्ठ ग्राम वतनांखालील जमिनी शासनाने स्वतःच्या ताब्यात घेतलेल्या आहेत आणि पद व वतन मालमत्ता धारण करण्याचा अधिकार व रूढीगत फी किंवा पैशांच्या किंवा वस्तूंच्या स्वरूपात बक्षिस आकारण्याच्या अधिकारासह उक्त वतनाशी संबंधित असलेले सर्व भार व सेवा विलुप्त करण्यात आल्या आहेत, असे असतानाही एखादे पद किंवा रूढीगत अधिकार किंवा रूढीगत फी आकारण्याचा अधिकार किंवा कोणतीही सेवा मागण्याचा अधिकार अजूनही चालू आहे? असे आपणास वाटते का? तसे असल्यास आपण त्याचा तपशील देऊ शकाल का? तसेच उपरोक्त कायदा परिणामकारक ठरला का? हे नमूद करावे. नसल्यास, तो परिणामक्षम व यशस्वी ठरण्यासाठी कोणती कार्यवाही करावी हे सुचवावे.**

**जिल्हाधिकारी, यवतमाळ**

२.५४. सध्या कोणतेही पद किंवा रूढीगत अधिकार किंवा रूढीगत फी आकारण्याचे अधिकार किंवा कोणत्याही सेवेची मागणी करण्याचे अधिकार अस्तित्वात नाहीत, कायदा परिणामकारक ठरला आहे.

**भारतीय समाजकल्याण परिषद**

२.५५. महाराष्ट्रातील आदिवासी तसेच अनुसूचित जातीच्या परिस्थितीचा विचार करताना आम्हाला असे वाटते की, खुल्या व समाजवादी समाजाचा विकास करण्यासाठी मागासवर्गाच्या व्यक्तींसाठी नोकऱ्यांमध्ये राखीव जागा ठेवण्याच्या किंवा तशाच इतर तरतुदी यांवर विसंबून राहता येत नाही. कारण, त्याचवेळी आर्थिक दृष्टीने मागासलेपणा सुस्पष्ट केला पाहिजे. तसेच ज्या जमातींचा बऱ्याच जास्त प्रमाणात विकास झालेला आहे त्यांची माहिती मिळवण्याचाही प्रयत्न केला पाहिजे. यामुळे समाजात त्यांना हळूहळू सामाजिक दर्जा प्राप्त होईल. आर्थिक निकषाच्या आधारे मागासलेपणा ठरवणे, आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी विकासाचे कार्यक्रम

राबवणे हा या समस्येवरील एकच उपाय आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी असलेल्या संपूर्ण कार्यक्रमांचा आराखड्यामध्ये सेवेचा तसेच नियोजन व त्याची अंमलबजावणी याबाबतीत संशोधनाचा अभाव असल्याचे दिसते.

**जिल्हाधिकारी, सोलापूर व सांगली आणि तहसीलदार, एदलाबाद, जि. जळगाव**

२.५६. वर उल्लेखिल्याप्रमाणे केलेला कायदा परिणामकारक ठरला व यशस्वी ठरला आहे.

**प्राचार्य एस. आर. देसाई, कनिष्ठ शिक्षण महाविद्यालय, रत्नागिरी**

२.५७. कायदा हा परिणामकारक ठरलेला आहे यात शंकाच नाही तरीही जुन्या पिढीमध्ये अद्याप या वतनांची वृत्ती जिवंत आहे. नवीन पिढी मात्र या वृत्तीपासून पूर्णपणे मुक्त आहे. अद्याप देशमुख हे आपल्या परंपरागत अधिकारांचा अतिशय अल्प प्रमाणात उपभोग घेत असल्याचे काही गावांत, विशेषत: जिल्ह्यात आड-जागी असलेल्या गावात आढळून येते. शिक्षणाचा प्रसार झाल्यास कायदा अधिकाधिक परिणामकारक ठरेल.

**तहसीलदार, बीड**

२.५८. वतने नष्ट करण्यात आल्यानंतर फी आकारण्याचे रुढीगत अधिकार किंवा कोणत्याही सेवेची मागणी करण्याचे अधिकार बंद झालेले आहेत. परंतु उक्त कायद्यामध्ये अशा सर्व रुढींना पायबंद घालण्याचा प्रयत्न आढळत नाही.

**प्राचार्य, शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ**

२.५९. वर उल्लेख केलेल्या कायद्यांमुळे रुढी व अधिकार नष्ट करण्यात आले असल्यामुळे पूर्वीप्रमाणे या प्रथा आता आढळत नाहीत. उद्दिष्ट साध्य करण्यास कायद्याचा पुष्कळच उपयोग झालेला आहे.

**आयुक्त, पुणे विभाग**

२.६०. वर उल्लेख केलेला कायदा यशस्वी ठरल्याचे सिद्ध झाले आहे. परंतु या कायद्यात त्याला वतनांशी संबंधित रुढीगत व परंपरागत अधिकार व त्यांखालील पदे नष्ट करण्याची तरतूद आहे. देवस्थान व धर्मादाय संस्थांशी संबंधित असलेले असे अधिकार व विशेषाधिकार अद्यापही अस्तित्वात आहेत.

**कुलसचिव, मराठवाडा विद्यापीठ**

२.६१. कमीत कमी शासन करण्यास शासनाने शिकले पाहिजे. एखादी रुढी काही लोक का व कसे मानतात किंवा मानत नाहीत याच्याशी शासनाचा कसा काय संबंध पोचतो? कोणत्याही व्यक्तीस म्हणजे पाटलाला किंवा कुलकर्णीला लोक जर स्वेच्छेने रुढीगत मान देत असतील तर शासनास याबाबतीत काही करता येत नाही आणि शासनाने त्याबाबतीत काही करूही नये. जेव्हा पाटील किंवा कुलकर्णी, जनमत विरुद्ध असताना, लोकांना नमवून रुढीगत "मानपानां"ची मागणी करण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्याला नक्कीच हार खावी लागेल. कोणत्याही बाबतीत, शांतता आणि सुव्यवस्था राखण्याव्यतिरिक्त शासनाचा त्यात संबंध येत नाही.

लोकांनी इष्ट मार्ग चोखाळून नवीन परिस्थितीशी जुळवून घ्यावे म्हणून शासनाने योग्य त्या सामाजिक, आर्थिक बलकेंद्रांना मोकळीक द्यावी, हळूहळू शिक्षण देऊन आणि सामाजिक बलकेंद्रे यांमुळे हे सामाजिक बदल खात्रीशीरपणे घडून येतील. कायदा, जनतेच्या मानाने फार पुरोगामी असेल तर त्यामुळे कदाचित उलट मत प्रवाह सुरू होतील. कायद्याला फार तर एखादी पुढची पायरी गाठता येईल.

**आयुक्त, नागपूर विभाग**

२.६२. नागपूर विभागाचा प्रश्न आहे तेथवर, मध्य प्रदेश मालकी हक्क (इस्टेटी, महाल, दुमाला जमिनी) नष्ट करण्याबाबत अधिनियम, १९५१ अन्वये सर्व मालगुजारी, इस्टेटी, जहागिऱ्या, इनामे इत्यादी १९५१ मध्ये नष्ट करण्यात आलीत. अमरावती, अकोला, बुलढाणा आणि यवतमाळ या चार वऱ्हाडी जिल्ह्यांमध्ये प्रचलित असलेली पटेल आणि पटवारी वतनदारी पद्धती, मध्य प्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ च्या कलम २१४ अन्वये १९५६ मध्ये नष्ट करण्यात आली. गावचा कोतवाल म्हणून सेवा बजावण्याकरिता ज्या अनुदानान्वये जमिनी धारण करण्यात आल्या होत्या ती सर्व अनुदानेसुद्धा मध्य प्रदेश भू-राजस्व संहितेच्या कलम १५०-अ अन्वये १९६२ मध्ये रद्द करण्यात आली होती. कोणतेही वंशपरंपरागत पद किंवा रुढीगत अधिकार किंवा

म. अ. एचके ४६०३—४ (८००—३—८१)

कोणत्याही सेवेनी मागणी करण्याचा कोणताही अधिकार अद्याप अस्तित्वात नाही. वर नमूद केलेले कायदे अगदी प्रभावी ठरले आहेत आणि ते प्रभावी व यशस्वी करण्यासाठी आणखी कोणतेही उपाय योजण्याची आवश्यकता नाही.

**गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवडी, भंडारा**

२.६३. वर्तमान कायदेशीर उपाय प्रभावी सिद्ध झाले आहेत. तथापि, ग्राम पंचायतीकडून होणाऱ्या अंमलबजावणीच्या कामावर देखरेख ठेवणाऱ्या गटपातळीवरील समाज कल्याण कार्याशी संबंधित असलेल्या विस्तार एजन्सीला या कायदेशीर उपाययोजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी कायदेशीर अधिकार दिले जाणे आवश्यक आहे, अशी सूचना आहे.

या कायदेशीर उपाययोजनांच्या संबंधात कोणतेही उल्लंघन झाल्यास त्या संबंधात ग्राम पंचायतींनासुद्धा संबंधित प्राधिकरणांना काही प्रमाणात जबाबदार ठरविण्यात आले पाहिजे आणि त्यासाठी मुंबई ग्राम पंचायत अधिनियमात योग्य सुधारणा करावी लागेल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा**

२.६४. कायदा प्रभावी आहे आणि वर नमूद केलेला कोणताही अधिकार आता अस्तित्वात नाही.

**उप-विभागीय दंडाधिकारी, दापोली**

२.६५. उपर्युक्त अधिनियम पूर्णपणे अंमलात आणण्यात आले आहेत आणि जुन्या वतनदारांनी उपभोगलेल्या अधिकारांचा कोणताही मागमूस आता उरलेला नाही.

**प्रश्न ६.—वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारचे वंशपरंपरेने चालत आलेले अधिकार म्हणजे मानपानासारखे सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक अधिकार किंवा सेवा बजावण्याचे खास अधिकार (महार वतन वगैरे) हे जिल्ह्यागणिक व क्षेत्रागणिक वेगळे आहेत असे आपणास वाटते का? तसे असेल तर त्या अधिकारांतील एखादा फरक किंवा अनेक फरक आपणास नमूद करता येईल/येतील का आणि याबाबतीत आपणास जी काही माहिती असेल ती आपण देऊ शकाल काय?**

२.६६. या प्रश्नासंबंधी याबाबतीत सर्वसाधारण एकमत आढळते की, क्षेत्रागणिक किंवा जिल्ह्यागणिक-रुढीगत आणि वंशपरंपरागत अधिकारांमध्ये कोणताही लक्षणीय फरक पडत नाही.

**प्रश्न ७.—या रुढीगत आणि वंशपरंपरागत अधिकारांचे आपण वर्गीकरण करू शकाल का आणि अशा प्रत्येक अधिकाराची ऐतिहासिक उत्क्रांती आपण थोडक्यात वर्णन करू शकाल का?**

**जिल्हाधिकारी, यवतमाळ**

२.६७. या रुढी प्राचीन काळापासून चालत आलेल्या आहेत. ऐतिहासिक उत्क्रांती दर्शवणारे कोणतेही अधिकृत साधन उपलब्ध नाही.

**गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सोयगाव, जिल्हा औरंगाबाद**

२.६८. धोबी समाजातील महिलांनी दिपावलीच्या वेळी ओवाळणे; न्हाव्याने मॉलिश करणे आणि महारांनी "पान-सुपारी" देणे हे रुढीगत अधिकार आहेत. वंशपरंपरागत नव्हेत,. ग्रामीण समाजामधील सरंजामी पद्धतीमध्ये त्यांचे मूळ दिसून येते. ब्राम्हणांनी पूजा करणे यांसारखे अधिकार आता कालबाह्य झालेले आहेत त्यांना आता विशेष महत्त्व राहिलेले नाही. .

**भारतीय समाजकल्याण परिषद**

२.६९. रुढीगत आणि वंशपरंपरागत अधिकारांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे :—

(१) एकतर रोख रकमेच्या स्वरूपात किंवा सेवेच्या स्वरूपात आर्थिक लाभ मिळवून देणारे अधिकार.

(२) सामाजिक दर्जा प्राप्त करून देणारे आणि सामाजिक पातळ्या निर्माण करणारे अधिकार आणि

(३) धार्मिक वर्चस्व देणारे अधिकार यांपैकी प्रत्येक अधिकाराची ऐतिहासिक उत्क्रांती देणे शक्य नाही, कारण हा सांगोपांग अभ्यासाचा विषय आहे.

### जिल्हाधिकारी, सोलापूर

रुढीगत अधिकार हे धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक अधिकारांचे मिश्रण आहे. त्यांचे योग्य वर्गीकरण करता येत नाही.

### जिल्हाधिकारी, सांगली

२.७१. ग्रामीण जनतेच्या सामाजिक आर्थिक उपयुक्ततेच्या कल्पनेमधून हे अधिकार निर्माण झालेले आहेत. सामाजिक व्यवस्था अशी होती की, एका विशिष्ट जातीच्या व्यक्तींना एक विशिष्टच व्यवसाय करावा लागत असे. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण राहील आणि कोणतेही गाव दुसऱ्या गावावर अवलंबून राहणार नाही अशा रीतीने बलुतेदारांनी कार्य करावे अशी मूळ कल्पना होती. आर्थिक घडणीच्या या पद्धतीमध्ये, बलुतेदारास सामाजिक-दृष्टया आणि आर्थिकदृष्टया काही बक्षिस दिले जाणे आवश्यक होते. ही सहजप्रवृती या कुटुंबाना वार्षिक 'उत्सवा'च्या वेळी परंपरागत आणि रुढीगत अधिकार आणि "मानपान" देऊन भागवण्यात आली होती. हे "मानपान" धार्मिक समारंभांशी निगडीत असत, कारण ग्रामीण जनतेवर धर्माचा विलक्षण पगडा होता. थोडक्यात म्हणजे सामाजिक आणि आर्थिक गरजेमधून हे "मानपान" निर्माण झाले असे म्हणता येईल. प्रचंड आर्थिक बदलांमुळे दुसऱ्या जागतिक युद्धानंतर आर्थिक गरजेचा हा घटक नष्ट झाला आहे. सामाजिक दृष्टया हे "मानपान" समाजाच्या निरनिराळ्या गटांना एकत्र आणतात. धार्मिक दृष्टिकोनातून असे दिसते की, ग्रामीण क्षेत्रांमध्ये सध्याच्या समाजात धर्माला एक अत्यंत उपयुक्त प्रयोजन साध्य करावयाचे आहे. आजसुद्धा धर्माला बरेच महत्त्व असल्यामुळे आज देखील गावांमध्ये, धार्मिक समारंभांचे अविभाज्य भाग म्हणून या "मानपानांना" आणि इतर अधिकारांना तितकेच महत्त्व आहे. आजसुद्धा निरनिराळे परंपरागत आणि रुढीगत अधिकार अस्तित्वात असण्याचे संभाव्य स्पष्टीकरण आहे.

या अधिकारांचे स्थूलमानाने दोन प्रमुख गटांमध्ये विभाजन करता येते. (१) सामाजिक अधिकार आणि (२) धार्मिक गटांचे अधिकार.

ह्या अधिकारांचे अधिकतर साहचर्य धार्मिक कार्याशी दिसते. निव्वळ सामाजिक अधिकार तुलनेने कमी आहेत.

**प्रश्न ८.—आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासावर अशा अधिकारांचा अहितकर प्रभाव पडतो असे आपणास वाटते का? तसे असेल तर, अशा अहितकर प्रभावाचे स्वरूप आपण थोडक्यात नमूद करू शकाल का?**

### जिल्हाधिकारी, यवतमाळ

२.७२. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासावर कोणताही अहितकार परिणाम किंवा प्रभाव दिसून येत नाही.

### भारतीय समाजकल्याण परिषद

२.७३. जे संधीच्या समानतेवर आधारलेले नाहीत अशा रुढीगत अधिकारांचा राज्याच्या सामाजिक, आर्थिक विकासावर अहितकर प्रभाव नक्कीच पडतो. या अधिकारांमुळे सामाजिक, आर्थिक विकासाचा वेग फारच मंदावलेला आहे आणि लोकशाही तत्त्वानुसार संधी आणि सामाजिक संबंध यांच्या संदर्भात या अधिकारांना कोणतेही मूल्य नाही. शिवाय, कोणत्याही समाजाचा विकास हा आरोग्य, शिक्षण, कल्याण, दळणवळण इत्यादीं सारखी कोणतीही सेवा करण्याच्या आर्थिक संधीवर अवलंबून असतो. जन्म किंवा जात यांवर आधारलेला असा एखादा अधिकार नष्ट केला पाहिजे. कोणताही व्यवसाय वंशपरंपरागत नाही आणि कोणताही व्यवसाय केवळ एखाद्या विशिष्ट वर्गाचाच नसतो आणि म्हणून, या स्तरीकरणामुळे निर्माण होणारी परिस्थिती तरुण पिढी मान्य करू शकत नाही. झाडू मारण्याच्या व्यवसायासाठी भंगी नसलेल्या एकाद्या व्यक्तीची नेमणूक करणे मुंबई महा-नगरपालिकेस शक्य झालेले नाही. चर्मकला तंत्राच्या आणि चामडे कमावण्याच्या प्रक्रियेच्या क्षेत्रात, त्या उद्योगाचे फार मोठया प्रमाणावर यांत्रिकीकरण झाले नसेल तर आपणास चांभार नसलेल्या एकाही व्यक्तीची नियुक्ती करणे शक्य झालेले नाही. म्हणून, जातीनिष्ठ समाजव्यवस्थेचे हे अवशेष आपल्या सामाजिक विकासावर प्रतिकूल परिणाम करीत आहेत. म्हणून, सामाजिक, आर्थिक विकासासाठी हे परंपरा आणि रुढी यांवर आधारलेले अधिकार नष्ट केले पाहिजेत.

### तहसीलदार, बीड

२.७४. वस्तुस्थिती अशी आहे की, असे अधिकार चालू राहिले तर. गावगाड्याच्या कारभारात स्वतःचे वर्चस्व स्थापन करू पाहणाऱ्या एखाद्या व्यक्तीला किंवा जनतेच्या एखाद्या विशिष्ट गटाला वरचे स्थान लाभते कारण आपला सामाजिक वरिष्ठ दर्जा कायम राखण्यासाठी ते आपला हा अधिकार चालू ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न करीत असतात. जुन्या पारंपारिक पद्धतीने हे अधिकार वापरले जातात आणि म्हणून अशी कार्ये पार पाडण्यासाठी गावातील तरुण पिढी ज्या नवीन पद्धतीचा वापर करते त्या नवीन पद्धतीशी त्यांचा संघर्ष निर्माण होतो. पूर्वी गावांना यांचा जो आर्थिक उपयोग होता तो मात्र आता राहिलेला नाही.

### जिल्हाधिकारी, सोलापूर

२.७५. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासावर अशा रूढीगत अधिकारांचा कोणताही अहितकर प्रभाव पडत नाही.

### जिल्हाधिकारी, सांगली

२.७६. आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासावर अशा अधिकारांचा कोणताही अहितकर प्रभाव पडत नाही. या उलट सामाजिकदृष्ट्या एकीकरणाकरता त्यांचा उपयोग होतो तर सांस्कृतिकदृष्ट्या ते उपयुक्त आहेत कारण ते आपल्या समाजाच्या सांस्कृतिक परंपरांचे प्रकर्षाने चित्रण करतात. आर्थिकदृष्ट्या विचार केल्यास, कुठलाही अहितकर परिणाम दिसत नाही. उलटपक्षी, या समारंभांच्या वेळी खरेदीविक्री आणि मनोरंजनास वाव मिळतो.

### प्राचार्य, शासकीय शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ

२.७७. सध्याची समाजाची घडण ही जुन्या कृषिप्रधान समाजापेक्षा बरीच वेगळी आहे त्यामुळे सामाजिक व धार्मिक प्रतिष्ठा लाभलेल्या अधिकारांचा प्रभाव कमी झाला आहे. खरे पाहिले तर समाजाच्या घडणीत पारंपारिक आणि सामाजिक अधिकारांमुळे फायदेही आहेत व तोटेही आहेत.

### आयुक्त, पुणे विभाग

२.७८. बरेचसे अधिकार हे धार्मिक स्वरूपाचे आहेत, जेव्हा कुठल्याही प्रकारच्या सामाजिक, सांस्कृतिक किंवा आर्थिक विकासाशी संबंधित असलेली एखादी योजना राबवण्याच्या मार्गात अशा अधिकारांमुळे अडथळा निर्माण होतो त्यावेळी हे मानकरी त्याचप्रमाणे समाजाचे इतर घटक अशा विकास योजनांना विरोध करतात. व्यक्तींच्या मनावरील धार्मिक संस्कारामुळे सर्वसाधारणपणे हे असे घडते. अशा तऱ्हेने हे अधिकार आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासाला मारक ठरतात आणि बऱ्याचवेळा ते विकास कार्यक्रमात अडसर निर्माण करतात.

### कुलसचिव, मराठवाडा विद्यापीठ

२.७९. परंपरागत हक्कांवर तडकाफडकी निर्णय देणे अवघड आहे. काही प्रकरणात ते हितावह असतील तर इतर काही प्रकरणांत आर्थिक विकासाच्या दृष्टीने ते अडसरही ठरतील. तथापि, या प्रश्नात मात्र सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासाला एकाच प्रक्रियेचा परिणाम म्हणून, समानार्थी, एककालिक, समानपर्यवसायी किंवा सहचर मानलेले आहे. या संज्ञांचा ज्या मुबलकतेने वापर करण्यात आला आहे त्यामुळे त्या संदिग्ध व अस्पष्टार्थक बनल्या आहेत. हे शक्य आहे की, आर्थिक विकासामुळें (ज्याचा जो काय अर्थ असेल तो) सांस्कृतिक अधःपात (ज्याचा जो काय अर्थ असेल तो) होईल व त्यामुळे सामाजिक विषमता वाढेल. अशा प्रकारे, आर्थिक स्थित्यंतरास विरोध करणारा एखादा विशिष्ट रुढीगत अधिकार सामाजिक शांतता व परस्परावलंबिता टिकवून ठेवण्यास पोषक ठरू शकतो. या उलट हेही घडू शकते की, जनदेतेला स्वीकार्य असलेल्या एखाद्या आर्थिक प्रक्रियेमुळे समाजात क्षोभ निर्माण होऊ शकतो व त्यामुळे लोकांचे सामाजिक स्थैर्य संकटात येऊ शकते.

### आयुक्त, नागपूर विभाग

२.८०. उक्त रुढी जेथे कोठे अजून चालू असतील तेथे त्यांचा आपल्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकासावर मुळीच अहितकर परिणाम होत नाही.

### मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

२.८१. सर्वसामान्यपणे या अधिकारांचा कोणताही अहितकर परिणाम आपल्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकासावर होत नाही. फक्त जातीव्यवस्था या देशात अजूनही अस्तित्वात आहे याची त्यामुळे आठवण होत राहते हाच काय तो अहितकर परिणाम म्हणता येईल.

### गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड

२.८२. वंशपरंपरागत अधिकारांमुळे आपल्या सामाजिक व सांस्कृतिक विकासावर अहितकर परिणाम होतो यात काहीच संशय नाही. लोकशाहीवादी आणि सांस्कृतिक दृष्टया विकसित समाजाचा आत्मा असणाऱ्या समतेच्या तत्त्वाचाच त्यामुळे पाडाव होतो. कोणतेही सुसंगत कारण नसताना एका व्यक्तीला दुसरीपेक्षा श्रेष्ठ मानणे हे न्यायाच्या तत्त्वाविरुद्ध व तर्कदुष्ट आहे. जेथे असे अधिकार अस्तित्वात असतील ती कुजकी संस्कृती असणार.

### जिल्हाधिकारी, पुणे

२.८३. कुलकर्णी, पाटील, देशमुख आणि देशपांडे यांसारखी महत्त्वाची वतने नष्ट झाल्यामुळे या वतनांमुळे दिले गेलेले वंशपरंपरागत अधिकारही आता संपुष्टात आले आहेत. आता जे काही रूढीगत आणि परंपरागत अधिकार अस्तित्वात आहेत ते अगदीच क्षुल्लक आणि बिनमहत्त्वाचे आहेत. समाजवादी आणि लोकशाही राज्यात या अधिकारांचे अस्तित्व विसंगत आहे हे खरे असले तरी दीर्घकालीन मान्यतेमुळे पूर्वी ज्या एखाद्या कार्यपद्धतीचे अनुसरण केले जात असेल ती कार्यपद्धती काळाच्या त्यांच्या आचारामुळे प्रस्थापित होण्यास मदत होते. उदाहरणार्थ, पोळयाच्या दिवशी गावातील एका ठराविक व्यक्तीचेच बैल सर्वापुढे असावेत किंवा ठराविक व्यक्तीचेच विशिष्ट सणाचे विधि पार पाडावेत यामुळे अशा प्रत्येक प्रसंगी उद्भवणाऱ्या संघर्षांना आपोआपच पायबंद बसतो. ग्रामीण लोक या जुन्या रूढींचा सर्वसाधारणपणे आदरच करतात आणि त्यांचा स्वीकार करतात आणि म्हणूनच विरोधी दाव्यांतून निर्माण होणारी भांडणे किंवा मारामाऱ्या क्वचितच उद्भवतात. पोळयाच्या सणाच्यावेळी आम्हाला दंड प्रक्रिया संहितेचे १४४ कलम लागू करावे लागते. जर हे खास अधिकार एखादा कायदा करून नष्ट केले तर वंशपरंपरेने हे अधिकार उपभोगणाऱ्या सध्याच्या व्यक्तींच्या जागी ते अधिकार उपभोगणाऱ्या दुसऱ्या व्यक्तींची नेमणूक करावी लागेल. उदाहरणार्थ, पोळयाच्या मिरवणुकीत पाटलाची बैलजोडी जर सर्वापुढे राहून द्यायची नसेल तर कोणाची बैलजोडी सर्वापुढे असावी हे सुद्धा कायद्याने ठरवून दिले पाहिजे आणि हे ठरवण्याची पद्धत अगदी स्पष्ट असली पाहिजे नाहीतर निरनिराळे वादग्रस्त दावे निकालात काढावे लागतील व त्यामुळे कायदा व सुव्यवस्था विषयक अनेक प्रश्न निर्माण होतील. त्याचप्रमाणे, जर गाव पाटलाने पूजा करावयाची नसेल तर ही पूजा करण्याकरता दुसऱ्या कोणाची तरी निवड करावी लागेल आणि त्यामुळे निवडणुकीपूर्वी जसे संघर्ष उद्भवतात तशाच प्रकारचे संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे. आजच्या युगात हे अधिकार विसंगत आहेत हे मीही मान्य करतो तरी पण या अधिकारांचे गौण स्वरूप पाहता मला असे वाटते की, ते नष्ट करण्यासाठी एखादा कायदा तात्काळ पास करण्याची कोणतीही निकड नाही.

### श्री. शंकर दाते, पुणे

२.८४. समाजाच्या सांस्कृतिक विकासाकरता रूढी उपकारक ठरतात. तथापि, प्राचीन काळात अस्तित्वात असलेल्या रूढींमध्ये बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

प्रश्न ९.—भारतीय स्वतंत्र्यानंतर उदयाला आलेल्या राष्ट्रीय एकात्मकता, औद्योगिक विकास इ. वर आधारित नव्या समाजरचनेच्या संदर्भात जुन्या रूढी, बलुतेदारी पद्धती, परंपरा, मान-पान इ. गोष्टी या आपल्या समाजाला उपयुक्त ठरणाऱ्या आहेत असे आपल्याला वाटते काय? जर तसे आपल्याला वाटत असेल तर, मग यापैकी कोणत्या रूढी तुम्हाला उपयुक्त म्हणून पुढे चालू राहाव्यात असे वाटते? आणि समाजाला नुकसान पोचवणाऱ्या कोणत्या रूढी बंद कराव्यात असे तुम्हाला वाटते?

### गट विकास अधिकारी पंचायत समिती, सोयगाव, जिल्हा-औरंगाबाद

२.८५. अजिबात उपयुक्त नाही. कोणतीही रूढी पुढे चालू ठेवण्याची गरज नाही.

### उप-विभागीय अधिकारी, काटोल जिल्हा-नागपूर

२.८६. हे हक्क लवकरच आपोआप नाहीसे होतील. त्यांच्या सध्याच्या स्वरूपात ते समाजाला उपयुक्तही नाहीत किंवा हानीकारकही नाहीत.

### भारतीय समाजकल्याण परिषद

२.८७. हा प्रश्न विचारला जावा याचे आम्हाला आश्चर्य वाटते. आपल्या समाजाच्या नवीन आर्थिक घडणीत फक्त एकाच जातीला स्थान आहे ती म्हणजे गरीब, धार्मिक व परंपारिक सीमा तिला लागू नाहीत, कोणतेही वंशपरंपरागत किंवा रूढीगत अधिकार पुढे चालू ठेवण्याची आम्ही कल्पनाहीं करू शकत नाहीं.

### तहसिलदार, एदलाबाद, जिल्हा जळगाव

२.८८. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर,बलुतेदारी पद्धती, परंपरा, मानपान, इ० जुन्या रूढी समाजाला मुळीच उपयुक्त नाहीत. म्हणून हे अधिकार पुढे चालू राहावेत किंवा नाही हा प्रश्नच उद्‌भवत नाहीं.

### प्राचार्य, कनिष्ठ शिक्षण महाविद्यालय, रत्नागिरी

२.८९. कायदा अधिक कडक करून किंवा दुसरा एखादा कडक कायदा पास करून काहीही साध्य होणार नाही. मला असे वाटते की, सतत सामाजिक शिक्षण आणि प्रचार या गोष्टी या प्रयोजनाकरता पुरेशा आहेत.

### तहसिलदार, बीड

२.९० स्वातंत्र्य प्राप्तीनंतर उदयास आलेल्या, राष्ट्रीय एकात्मकता, औद्योगिक विकास इत्यादींवर आधारित नव्या समाज रचनेच्या संदर्भात सर्व जुन्या रूढी आणि वंशपरंपरागत अधिकार हे आता उपयुक्त नाहीत.

### जिल्हाधिकारी, सोलापूर

२.९१. माझ्या मते या जुन्या रूढी, बलुतेदारीची पद्धती, परंपरा आणि 'मानपान' ह्या गोष्टी आता आपल्या समाजाला कोणत्याही प्रकारे उपयुक्त नाहीत.

### तहसिलदार, परांडा, जिल्हा उस्मानाबाद

२.९२. बलुतेदारीची पद्धती म्हणजे दुसरे तिसरे काही नसून शेतकऱ्यांनी वैयक्तिक रीत्या केलेल्या सेवेसाठी त्यांना कृषि उत्पादनाच्या स्वरुपात परिश्रमिक देणे होय. कृषि उत्पादनाच्या स्वरुपात द्यावयाचे असे परिश्रमिक हे मुख्यत: शेतकऱ्यांच्या एकूण उत्पादनाच्या दर्जावर अवलंबून असते. हे परिश्रमिक वर्षातून दोनदा देण्यात येते. या मिळकतीवरच मुख्यत्वेकरून बलुतेदारांचा चरितार्थ अवलंबून असतो. बलुतेदारांना इतर कोणतेही काम करणे शक्य नसते. तसेच सुतार, न्हावी इत्यादींसारख्या बलुतेदारांना त्यांच्या सेवेबद्दल गरीब शेतकरी रोख रक्कम देऊ शकत नाहीत. खेडेगावांमध्ये सध्या प्रचलित असलेली बलुतेदारी पद्धती आणखी १० वर्षे चालू ठेवावी.

### जिल्हाधिकारी, सांगली

२.९३. आता आर्थिक दृष्टचा या जुन्या रूढींचे महत्व आता संपुष्टात आलेले आहे. परंतु यापैकी बऱ्याचशा रूढी आजही समाजाला उपयुक्त ठरणाऱ्याच आहेत कारण त्या समाजातील निरनिराळ्या थरांतील व्यक्तींना एकत्र आणतात, धार्मिक भावना जोपासतात. आणि लोकांचे मनोरंजन करण्याचे महत्वाचे कार्य करतात. परंतु या प्रकरणी संपूर्ण चौकशी करणे जरूर आहे. पूर्ण चौकशी नंतरच वंशपरंपरागत व रूढीगत अधिकार चालू ठेवावे किंवा नाही या प्रश्नाचे उत्तर देता येईल.

### आयुक्त, पुणे विभाग, पुणे

२.९४. सर्व रूढीगत आणि वंशपरंपरागत अधिकार नष्ट केले पाहिजेत. अधिकार म्हणून हे रूढीगत विशेषाधिकार चालू राहू देऊ नयेत.

### आयुक्त, नागपूर विभाग

२.९५. जुन्या रूढी काहीही असल्या तरी, त्या समाजाला लाभदायक नसतील पण त्याचबरोबर त्या घातकही नाहीत.

या रूढी अंमलात आणण्यासाठी कोणीही न्यायालयाकडे धाव घेतल्याची घटना घडलेली नाही आणि आजच्या काळात ह्या रूढी काटेकोरपणे पाळल्या जातात हे पहाण्यातही कोणालाच स्वारस्य नसते.

**प्रश्न क्र. १०. अशा अधिकारांचे अस्तित्व आणि त्यांचा वापर हे भारताच्या संविधानाने हमी दिलेल्या मूलभूत अधिकारांशी सुसंगत आहे का आणि या अधिकारांना कालबाह्य आणि आपल्या राष्ट्राने ज्या प्रकारच्या समाजव्यवस्थेची बांधिलकी स्वीकारली आहे त्या मुक्त, खुल्या समतावादी, समाजवादी आणि लोकशाही समाजव्यवस्थेमध्ये अडचणीचे समजावे लागतील असे तुम्हाला वाटते का? आणि वाटत असल्यास कशा प्रकारे?**

जिल्हाधिकारी, यवतमाळ

२.९६. या रूढी आणि परंपरा, आपल्या संविधानाच्या मूलभूत तत्त्वांचे भंग करत नाहीत किंवा त्याविरुद्धही नाहीत.

जिल्हाधिकारी, सोलापूर

२.९७. अशा अधिकारांचे अस्तित्व आणि त्यांचा वापर हे भारतीय संविधानाद्वारे देण्यात आलेल्या मूलभूत अधिकाराशी सुसंगत नाही, कारण या तथाकथित अधिकारांना कोणताही मौलिक आधार नाही. ते पिढ्यान पिढ्या चालत आलेले आहेत इतकेच. अशा परंपरा चालू राहिल्या तर त्यामुळे समाजविरोधी भावना निर्माण होईल. उदा. समाजातील व्यक्तींमध्ये अहंगंड, न्यूनगंड आणि हे अधिकार वापरणाऱ्यांमध्ये सत्ता गाजवण्याची वृत्ती बळावेल.

प्राचार्य, शासकीय शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ

२.९८. आधुनिक काळातील माणसाच्या गरजा लक्षात घेऊन त्यारूढीगत अधिकारांमध्ये योग्य बदल करण्यात आला पाहिजे. या आधी उल्लेख करण्यात आलेले अधिकार हे संविधानाद्वारे हमी देण्यात आलेल्या मूलभूत हक्कांशी सुसंगत नाहीत.

आयुक्त, पुणे विभाग

२.९९. हे रूढीगत अधिकार आणि त्यांचा वापर हे भारतीय संविधानाद्वारे हमी देण्यात आलेल्या मूलभूत अधिकारांशी सुसंगत नाहीत. बऱ्याच वेळा या अधिकारांचा वापर योग्य प्रकारे केला जात नाही. आणि त्यामुळे सामाजिक भेदभाव निर्माण होतात आणि यामुळे ग्रामीण लोकांमध्ये बेबनाव होण्याची आणि शांतताभंग होण्याची भीती निर्माण करण्यासारखी परिस्थिती निर्माण होते.

कुलसचिव, मराठवाडा विद्यापीठ

२.१००. प्रस्तुत प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला तरी ते उत्तर अगदी संदिग्ध आणि अर्थशून्य असेल.

प्राचार्य, शासकीय शिक्षण महाविद्यालय, बसमतनगर

२.१०१. अशा अधिकारांचे अस्तित्व आणि त्यांचा वापर हे भारतीय संविधानाने हमी दिलेल्या मूलभूत हक्कांशी सुसंगत नाहीत. अशा अधिकारांना कालबाह्य मानणे आणि सर्व नागरिकांना समान हक्क देण्याच्या तत्त्वाच्या मुक्त वापरात अडथळा आणणारे मानणेच योग्य होईल.

पोलीस अधीक्षक, अहमदनगर

२.१०२. समतावादी समाजाच्या संकल्पनेशी हे अधिकार सुसंगत नाहीत. सध्याच्या सामाजिक परिस्थितीमध्ये हे अधिकार प्रतिगामी स्वरुपाचेच समजले पाहिजेत.

**प्रश्न क्र. ११. संपूर्ण समाजाला किंवा एखाद्या विशिष्ट सामाजिक व धार्मिक गटांला हानिप्रद ठरणाऱ्या या जुनाट रुढी व अधिकार (मानपान) (श्रेष्ठ कनिष्ठ) इत्यादी काढून टाकण्याचे काम, शिक्षणाचा प्रसार, औद्योगिक व तंत्र वैज्ञानिक, विकास, समाज सुधारणेच्या चळवळी, अशासारख्या सध्या चालू असलेल्या सामाजिक व आर्थिक शक्तींवर सोपवावे असे तुम्हाला वाटते का की, हे अधिकार नाहीसे करण्यासाठी कायदा करण्याची आवश्यकता आहे?**

जिल्हाधिकारी, यवतमाळ

२.१०३. यासाठी खास कायदा करण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही.

### भारतीय समाजकल्याण परिषद

२.१०४. शिक्षणात सुधारणा, श्रमिक संघ, औद्योगिकरण, नागरीकरण इत्यादीसारख्या सुधारणा न होतां समाजाच्या औद्योगिक व तंत्रशास्त्रविषयक सुधारणांच्या उदयानंतर हे अधिकार आपोआपच नाहीसे होतील असे समजणे बरोबर नाही. हे अधिकार नाहीसे करण्यासाठी नेमक्या कायद्याची गरज आहे असे आम्हाला वाटते.

### प्राचार्य, कनिष्ठ शिक्षण महाविद्यालय, रत्नागिरी

२.१०५. खास कायदा केल्याने आपल्याला अपेक्षित असलेले बदल होणार नाहीत. म्हणून, शिक्षण सभा, चित्रपट, चर्चासत्रे इत्यादीसारखे इतर जुनाट रुढी व अधिकार काढून टाकण्याच्या मुख्य कामात खूप, सहाय्यक होऊ शकतील असे इतर विधायक उपाय योजणे आवश्यक आहे.

### जिल्हाधिकारी, सोलापूर

२.१०६. यासाठी खास कायदा करण्याची आवश्यकता आहे.

### जिल्हाधिकारी,सांगली

२.१०७. सामाजिक शिक्षणाला यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागेल. खास कायदा करण्याची आवश्यकता नाही. रुढीगत अधिकार नष्ट करायचे म्हणजे, प्रत्यक्षात हे धार्मिक समारंभ करण्याचे बंद करावे लागेल. म्हणून इतर कोणताही पर्याय न ठेवतां हे समारंभ बंद केले तर त्यामुळे ग्रामवासियांच्या मनात रोष उत्पन्न होईल.

### आयुक्त, पुणे विभाग

२.१०८. खास कायदा आवश्यक आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

२.१०९. खास कायदा करण्याची आवश्यकता नाही.

**प्रश्न क्र. १२. कायदा करण्याची आवश्यकता आहे असे मानले तर, ज्यामुळे, या कायद्याचे उल्लंघन करण्याचा गुन्हा हा दखलपात्र गुन्हा मानला जाईल, अशा गुन्ह्यासाठी दंड, अपील करण्याची पद्धत, नुकसान-भरपाई देणे किंवा न देणे, नुकसानभरपाईचे प्रभाव इत्यादींसाठी योग्य आणि सविस्तर अशी पद्धती तुम्ही सुचवू शकाल का?**

### भारतीय समाजकल्याण परिषद

२.११०. समाजातील सर्व अनिष्ट प्रथा नाहीशा करण्यासाठी केवळ कायदा हाच उपाय आहे असे मानणे योग्य होणार नाही. कायद्यामुळे याला केवळ एक सामाजिक संदर्भ प्राप्त होतो आणि कायद्याने केवळ कायदेशीर मार्गदर्शन दिले जाऊ शकले, तरीही आम्ही जन्मावर, जातीवर किंवा वंश परंपरेवर आधारलेले कोणतेही अधिकार नष्ट करण्यासाठी काही कार्यवाही करू शकेल अशा कायद्याचीच शिफारस करतो. अपिलाचे स्वरूप किंवा त्यावरील कार्यवाहीसंबंधीच्या प्रश्नावर अशी संक्षिप्त चर्चा शक्य नाही. हे काम तंत्र समितीकडे सोपविण्यात यावे. अशी समिती नेमण्यात आली तर भारतीय समाजकल्याण परिषद त्या समितीला सहकार्य देईल.

### प्राचार्य, कनिष्ठ शिक्षण महाविद्यालय, रत्नागिरी

२.१११. माझ्या मते या प्रयोजनासाठी कायद्याची आवश्यकता नाही. म्हणून यासाठी योग्य आणि सविस्तर पद्धती सुचविण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मला असे वाटते की, सामाजिक न्याय मिळण्यासाठी कोणत्याही कायद्याचा उपयोग होणार नाही.

### जिल्हाधिकारी, सोलापूर

२.११२. कायदा आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवर्ग असलेली स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. प्रस्तावित कायद्याचे उल्लंघन करून केले जाणारे गुन्हे हे दखलपात्र गुन्हे मानण्यात येऊ नयेत यासाठी अल्प अशा दंडाची तरतूद असावी आणि गुन्हेगारास पाच वर्षे निवडणुकीसाठी अपात्र ठरविण्यात यावे. या अधिकारांना कोणताही कायदेशीर किंवा कागदोपत्री आधार नाही. त्यामुळे ते नाहीसे करण्यासाठी नुकसानभरपाई देण्याची आवश्यकता नाही.

### जिल्हाधिकारी, सांगली

२.११३. कायदा आवश्यक आहे असे वाटत नाही. परंतु या वंशपरंपरागत व रूढीगत अधिकारांच्या अस्तित्वामध्ये अंतर्भूत असलेल्या सामाजिक, आर्थिक कार्याचा व मानसशास्त्रीय घटकांचा सखोल विचार करणे आवश्यक आहे असे सुचविण्यात येत आहे. या प्रयोजनासाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमण्यात यावी. आदिवासी क्षेत्रामध्ये जे अशाच प्रकारचे रूढीगत अधिकार अस्तित्वात असतील त्यांचीही चौकशी करण्यात यावी.

### आयुक्त, पुणे विभाग

२.११४. (अ) प्रस्तावित कायद्याचे उल्लंघन करून केले जाणारे गुन्हे हे दखलपात्र ठरविण्यात यावेत, (ब) श्री. धोंडगे यांनी मांडलेल्या विधेयकाच्या कलम ५ मध्ये विहित करण्यात आलेला दंड योग्य वाटतो आणि तो स्वीकारण्यास हरकत दिसत नाही. (क) (वर उल्लेखिलेल्या) विधेयकाच्या कलम (७) खाली नुकसानभरपाईसंबंधात करण्यात आलेली तरतूद वाजवी आहे. आणि (ड) जिल्हाधिकाऱ्याने द्यावयाच्या नुकसानभरपाई विरूद्ध (एम्. आर्. टी) महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे एक अपील करण्याची तरतूद योग्य व पुरेशी वाटते, कारण जमीन महसुली सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत आतापर्यंत संमत करण्यात आलेल्या सर्व कायद्यांमध्ये अशाच प्रकारची तरतूद होती.

### प्राचार्य, शिक्षण महाविद्यालय, परभणी

२.११५. श्री. धोंडगे यांनी सुचविलेल्या पद्धतीचा अधिनियम संमत करून हे अधिकार नाहीसे केले पाहिजेत आणि याखालील गुन्हे हे दखलपात्र ठरविण्यात यावेत आणि सहा महिने साधा कारावास किंवा जास्तीत जास्त रु. ५०० पर्यंत दंडाची तरतूद करण्यात यावी.

## प्रकरण तीन

## हक्कांची जंत्री आणि त्यांचे वर्गीकरण

३.१. या आधीच्या प्रकरणात नमूद केलेली चर्चा आणि माहिती यावरून हे लक्षात येईल की, असे अधिकार हे अनेकविध व पुष्कळ तर आहेतच शिवाय ते भिन्न स्वरूपाचेही आहेत. त्यापैकी काही हक्क हे धार्मिक स्वरूपाचे आहेत तर इतर काही सामाजिक स्वरूपाचे आहेत. आणखी काही आर्थिक स्वरूपाचेही आहेत. या प्रकरणात आम्ही वरील तीन स्थूल प्रकारांत हक्कांचे वर्गीकरण तर करणार आहोतच परंतु, त्याशिवाय महाराष्ट्रातील प्रमुख सण आणि या सणांच्या वेळी गावामधील पाटील, देशमुख, देशपांडे, कुलकर्णी, गूरव, भटजी आणि इतर व्यक्ती जी भूमिका वठवतात किंवा वठवत आहेत तेदेखील विशद करणार आहोत.

३.२. दसरा किंवा दसहरा हा महाराष्ट्राप्रमाणेच संपूर्ण भारताचाही एक फार महत्त्वाचा सण आहे. हा सण बहुधा कार्तिक (सप्टेंबर किंवा ऑक्टोबर) महिन्यात येतो आणि रामाने रावणावर मिळविलेल्या विजयाचे स्मारक म्हणून हा सण साजरा केला जातो. हिंदु पुराणामध्ये या सणाला आगळे महत्त्व आहे. कारण या दिवशी रामाची पत्नी सीता हिची लंकेतून हनुमान आणि त्याची वानरसेना यांच्या सहाय्याने सुटका केली त्या मुक्तीचाच केवळ सोहळा म्हणून नव्हे तर हा दिवस असत्यावर सत्याने केलेली मात म्हणूनही प्रतिक रुपाने साजरा केला जातो.

३.३. संपूर्ण देशभर १० दिवसांचा नवरात्र उत्सव साजरा केला जातो. उत्तर भारतात या सणाला 'बिजया-दशमी' म्हणजेच रावणावरील रामाच्या विजयाचा उत्सव असे म्हटले जाते. तर बंगालमध्ये हा सण दुर्गा-पूजा म्हणून साजरा केला जातो. गुजरातमध्ये तो नवरात्र किंवा नऊ रात्रींचा उत्सव असतो. महाराष्ट्रात दसरा फक्त ग्रामीण भागांतच नव्हे तर शहरातही साजरा केला जातो. गावांमध्ये नऊ दिवसांचा उत्सव समाप्त झाला की, स्थानिक देव-देवतांच्या मूर्ती पालखीतून मिरवणूकीने गावाच्या वेशीपर्यंत नेण्यात येतात. त्या ठिकाणी शमी-वृक्षाच्या सामुदायिक पुजेची व्यवस्था करण्यात येते. हा पूजा-विधी संपल्यानंतर, शमी-वृक्षाची किंवा आपट्यांची पाने प्रथम ग्रामदेवतेला वाहून मग ती एकमेकांना दिली जातात. आता ही प्रथम पूजा करणारी व आपट्याची पाने घेणारी व्यक्ती ही पाटील किंवा देशमुख म्हणजेच कोणीतरी वतनदार किंवा मानकरी असते. ग्रामदेवतेची पूजा प्रथम करण्याचा व आपट्याची पाने घेण्याचा मान त्याला जुन्या रुढीमुळे मिळतो.

३.४. 'पोळा' हा ग्रामीण महाराष्ट्राचा आणखी एक रंगतदार सण होय. हा सण सर्वसाधारणपणे खेड्यापाड्यांतून आषाढ-श्रावण-भाद्रपद (ऑगस्ट-सप्टेंबर) या महिन्यात साजरा केला जातो. आणि प्रामुख्याने बैलांना सजवून व त्यांची पूजा करून हा सण साजरा केला जातो. सर्वसाधारणपणे वर नमूद केलेल्या तीन महिन्यांत शेतीची कामे अधिक जोरात असतात आणि म्हणूनच बैलांची आवश्यकताही फार असते. बैल हे भारतीय शेतीचे प्रतिक आहे आणि त्यांना फार पवित्र मानले जाते.

३.५. या सणाच्या दिवशी शेतकरी आपापल्या बैलांना न्हाऊमाखू घालतात आणि त्यांच्या अंगावर रंगीबेरंगी झूली चढवून आणि घागरमाळा घालून त्यांना सजवतात. बैलांची शिंगे लाल किंवा गुलाबी रंगाने रंगवतात. कुटूंबामध्ये वर्षभर बैलांची निगा राखणाऱ्या नोकरांनाही या दिवशी खास पक्वान्नाचे ('पुरण-पोळी' चे) भोजन देऊन आणि त्यांना काही भेट देऊन त्यांचा गौरव केला जातो. बैलांना न्हाऊमाखू घातल्यावर आणि त्यांना सजवल्यानंतर त्यांची मिरवणूक काढली जाते. या मिरवणुकीपुढे ताशा व 'शहनाई' वाजवली जाते तसेच 'लेझिम' खेळण्यात येते. सर्वसाधारणपणे या मिरवणुकीचा शेवट गावचावडीशी होतो. मिरवणुकीत असलेल्या सर्व बैलांना क्रमांक दिले जातात आणि पहिले दोन क्रमांक गावच्या पाटलाच्या बैलांचे असतात. ही प्रथा रूढीने चालत आली असून आपले बैल सर्वांपुढे ठेवण्याचा पाटलाचा अधिकार हा रूढीगत अधिकार आहे.

३.८. "दिवाळी" किंवा दीपोत्सव हा देशातील उत्सवांचा राजाच म्हणता येईल. हा हिंदूंचा अतिशय आनंदाचा सण असून देशात सर्वत्र ह्या ना त्या प्रकारे हा सण मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येतो.

दिवाळी हा शब्द "दिपावली" या शब्दापासून म्हणजे दिव्यांची मालिका (दिवा; मातीच्या पणत्या) या शब्दापासून बनला असावा असे वाटते. या दिव्याशिवाय, घराघरांतून, शहराशहरांतून, गावागावांतून विद्यूत रोषणाई देखील केली जाते. त्यामुळे सबंध देशच एका विलक्षण तेजाने उजळून निघातो. सर्वसाधारणपणे दिवाळीचा उत्सव कार्तिक अमावस्येला म्हणजेच कृष्ण पक्षाच्या १५ व्या दिवशी साजरा करण्यात येतो. तो साधारणपणे आक्टोबर-नोव्हेंबर मध्ये येतो. हिंदू पुराणातील एका कथेप्रमाणे याच दिवशी श्रीराम आपला १४ वर्षांचा वनवास संपवून परतले होते असे मानतात. राम परतल्यानंतर अयोध्येतील लोकांनी रोषणाई करून रामाचे स्वागत केले होते. वस्तुतः दिवाळी ५ दिवस साजरी करतात. त्यातील पहिल्या दिवशी हिंदू लोक भल्या पहाटे उठून अभ्यंग स्नान करतात व नवीन रंगीबेरंगी कपडे परिधान करतात. फटाके व आतिषबाजी यांनी या दिवसाचे स्वागत केले जाते. दिवाळीचा तिसरा दिवस धन आणि समृद्धी देवता लक्ष्मी हिच्या पुजनाचा असतो. या दिवशी थरथरणाऱ्या ज्योतींच्या दिव्यांनी सुशोभित असलेले प्रत्येक घर लक्ष्मीच्या स्वागतास सिद्ध असते. हिंदू पुराणातील आख्यायिकेनुसार दिवा नसलेल्या घरांकडे लक्ष्मी पाठ फिरवते आणि हे अमंगल आणि अपशकुनी समजले जाते.

३.९. खेडेगावात अशी प्रथा आहे की, दिवाळीच्या दिवशी न्हावी, म्हणजे बारा बलुतेदारांपैकी एक, गावातील पाटील, देशमुख, देशपांडे यांच्यासारख्या बडयांच्या घरी जातो व त्यांची हजामत व दाढी करतो. त्यानंतर तो त्यांना मालीश करतो आणि त्यांच्या शरिराला उटणे लावतो. त्यानंतर 'धोबीण' येते आणि ती वरील व्यक्तींना ओवाळते.

३.१०. होळीचा सण महाराष्ट्रासकट सबंध देशात साजरा केला जातो. हा सण हिंदू पंचांगातील शेवटच्या महिन्यात म्हणजेच फाल्गुनमध्ये म्हणजे इंग्रजी महिन्याप्रमाणे मार्चमध्ये येतो. या विशिष्ट दिवशी होळी पेटवण्यात येते. याच दिवशी रबी मोसमाचा आणि रबी पीक कापणी मोसमाची समाप्ती होते. हा दिवस आनंदाचा उत्सव म्हणून साजरा केला जातो आणि त्या दिवशी सर्वत्र आनंदाचे प्रसन्नतेचे वातावरण असते. वर सांगितल्या-प्रमाणे हा सण शेतीच्या कामाशी संबंधित असल्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात त्याचे विशेष व आगळे महत्त्व आहे. विशेषतः शहरांमध्ये या सणाच्या दिवशी क्वचित प्रसंगी हिंसाचार घडतो आणि शांतताभंग पावते. गावामध्ये या दिवशी होळी पेटवण्याचा पहिला मान गावच्या वतनदाराचा असतो. काही वेळी या अधिकारास आक्षेप घेतला जातो आणि लहान प्रमाणात का होईना पण हिंसाचारही घडतो. वतनदारांना अग्रमान देण्याची प्रथा केव्हापासून व कशी पडली याचा ऐतिहासिक दृष्टीने शोध लागत नसला तरी हा सण हजारो वर्षांपासून अस्तित्वात असून होळी पेटवण्याचा अग्रमान वतनदारांना देण्याचा रूढीगत अधिकार हा सरंजामशाहीतूनच उद्भवला असावा असा अंदाज चुकीचा ठरू नये.

३.११. पाडवा हा आणखी एक सण प्रामुख्याने महाराष्ट्रात साजरा केला जातो. या दिवशी हिंदू-मराठी नववर्षारंभ होतो. या दिवशी महाराष्ट्रातील लोक कडुलिंबाची पाने खातात. कडुलिंबाचा पाला हा आरोग्यदायक असून तो माणसाला होणाऱ्या अनेक रोगांच्या बाबतीत व दुखण्यावरही प्रतिबंधक औषध म्हणून उपयुक्त ठरतो. या सणाच्या दिवशी घरांच्या छपरावर व उंच ठिकाणी गुढया उभारण्यात येतात. कडुलिंबाची पानेही या गुढयांना अडकवण्यात येतात. हा या सणातील प्रमुख विधी आहे. आणि म्हणूनच या सणाला 'गुढी पाडवा' असे नाव पडले. या सणाच्या दिवशी हिंदूंच्या घरोघर पक्वान्ने बनवतात. एखाद्या चांगल्या कामाची सुरवात करण्यासाठी हा दिवस एक चांगला मुहूर्त म्हणून मानला जातो. या दिवशी हलक्या जातींच्या लोकांना 'मानकऱ्यां'च्या घरी जाऊन तेथे ते 'वाजंत्री' वाजवणे भाग पडते.

३.१२. आमदार, श्री. के. एस. धोंडगे यांनी महाराष्ट्र विधानसभेत मांडलेल्या आपल्या बिनसरकारी विधेयकात, त्यांनी सुमारे २२ रुढीगत व वंशपरंपरागत अधिकारांची यादी प्रस्तुत केली असून हे सर्व अधिकार कायद्याने रद्द करावेत असे सुचविले आहे. त्यांनी असेही सुचविले आहे की, हे अधिकार रद्द करणारा कायदा पास झाल्यानंतर त्याविरूद्ध करण्यात येणारा गुन्हा हा दखलपात्र समजून त्याबद्दल गुन्हे-गाराला योग्य ती शिक्षा (दंड इ.) ठोठावण्यात यावी. या समितीने केलेल्या पाहणीत असे उघडकीस आले की, अस्तित्वात असलेले असे अनेक अधिकार असून त्यांची संख्या श्री. धोंडगे यांनी नमूद केलेल्या संख्येपेक्षा कितीतरी अधिक आहे. कदाचित, या विषयाची अधिक चौकशी आणि पाहणी केली तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अस्तित्वात असलेले व प्रचलित असलेले अनेक अधिकार उघडकीस येतील. काही का असेना जे समितीच्या दृष्टोत्पत्तीस आलेल्या अनेक अशा अधिकारांचे हे पुढील तीन ढोबळ प्रकारांत वर्गीकरण करण्यात आले.

ते म्हणजे सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक. असे शक्य आहे की, काही अधिकार हे आर्थिक अन् सामाजिक स्वरूपाचे असतील तर इतर काही हे धार्मिक आणि आर्थिक स्वरूपाचे असतील व त्यामुळे ते दोन्ही प्रकारांत अंतर्भूत असतील किंवा तीनही प्रकारांत असतील.

## धार्मिक अधिकार

(१) सणांच्या दिवशी मारुतीच्या मूर्तीला शेंदूर लावण्यात अग्रमान मिळण्याचा अधिकार तसेच मारुतीची पूजा प्रथम करण्याचा अधिकार.

(२) कामाई देवीपुढे "डाक" वाजवण्याचा अधिकार.

(३) धार्मिक उत्सवाच्या दिवशी "दहीहांडी" फोडण्याचा व पालखीमधून मिरवण्याचा अधिकार.

(४) उत्सवाच्या दिवशी तोरण तोडण्याचा व बैलगाड्या व रथ मिरवण्याचा अधिकार.

(५) शिराळशेट भुलोबाच्या मूर्तीची पूजा करण्याचा व तिची मिरवणूक काढण्याचा अधिकार;

(६) पूजा करण्याचा अधिकार;

(७) मोरगीन, तालुका पोलादपूर, जिल्हा कुलाबा येथील सोमाजी व काळकाई जनानी देवींच्या देवस्थानांत धार्मिक उत्सव साजरे करण्याचा वंशपरंपरागत अधिकार.

(८) वाडी-रत्नागिरी, तालुका पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर येथील ज्योतीबा देवाच्या पूजेचा मानपान;

(९) खेरडी, तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी येथील सुखाईदेवीच्या धार्मिक समारंभाची व्यवस्था पाहण्याचा अधिकार.

(१०) तहसिल राजापूर, जिल्हा रत्नागिरी येथील "गंगोबा" या ग्रामदेवतेची पूजा करण्याचा व उत्सव साजरा करण्याचा अधिकार.

(११) इसावली, तालुका राजापूर, जिल्हा रत्नागिरी येथील "कारुकेस" देवीची मालकी व तिची पूजा करण्याचा अधिकार.

(१२) देवळी, तालुका राजापूर, जिल्हा रत्नागिरी येथील विठाईच्या देवळाच्या मानकऱ्याचा व मालकीचा अधिकार,

(१३) खण, नारळ, यांसारख्या काही देवतांना अर्पण केलेल्या वस्तू घेण्याचा अधिकार.

(१४) एखाद्या विवक्षित देवाच्या उत्सवाच्या वेळी किंवा सर्वसामान्य स्वरूपाच्या उत्सवाच्या वेळी गावामध्ये मिरवणुकीत स्वतःच्या खांद्यावरून पालखी वाहून नेण्याचा काही विवक्षित व्यक्तींचा अधिकार.

(१५) चिखली येथे नगरपालिकेच्या अध्यक्षास देवीच्या मिरवणुकीचे वेळी पुढे राहण्याचा मान आहे;

(१६) (कार्ला देवीच्या) नवरात्रामध्ये वरसोळी, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथील पाटलाला असलेला बोकड मारण्याचा अधिकार.

(१७) जेजुरीच्या खंडोबापुढे "जागरण-गोंधळ" घालण्याचा गावातील वाघ्या मुरळीचा अधिकार;

(१८) दसऱ्याच्या दिवशी बोकड मारणे व टिळा लावणे.

(१९) दसरा, पाडवा यांसारख्या दिवशी बैलांच्या झुंजी लावणे.

(२०) देवीची पालखी धरण्याचा अधिकार.

(२१) रावणाची प्रतिमा जाळण्याचा अधिकार.

## सामाजिक अधिकार

(१) गावातील बारा बलुतेदारांचा मानपान.

(२) बालाजीची काठी, महादेवाची काठी, खंडोबाची पालखी, ज्योतीबाची पालखी यांच्या पूजेचा अग्रमान.

(३) महाकालीचा मान, कडक लक्ष्मीचा मान व जोखमार मान.

(४) फस्की, पानधारी मान, मान-धन, मानाची सुपारी व मानाचा शिधा या नावांनी ओळखले जाणारे अधिकार.

(५) मानकऱ्याच्या घरी वाजंत्री लावून तुळशीचे लग्न प्रथम लावण्याचा अधिकार.

(६) दसरा, दिवाळी, शिमगा व पाडवा या दिवशी मानकऱ्याच्या घरापुढे "वाजंत्री" वाजवण्यास भाग पाडण्याचा अधिकार.

(७) लग्नामध्ये शेवंती समारंभाच्या वेळी मारुतीला वाहिलेले फेटयाचे कापड घेण्याचा अधिकार.

(८) लग्न समारंभाच्या वेळी "टिळा" व सुपारी प्रथम मिळण्याचा अधिकार.

(९) गुढीपाडव्याचे दिवशी "परात" (Parat) वाचण्याचा व कडुनिंबाचा रस पिण्याचा अग्रमान.

(१०) हनुमान जयंतीच्या उत्सवाच्या दिवशी वाजत गाजत देवाला शेंदूर लावण्याचा तसेच भंडारा घालण्याचा (अन्न शिजवणे व ते भाविकांना वाटणे) अधिकार.

(११) पोळयाच्या दिवशी वाजत गाजत बैलांची मिरवणूक काढण्याचा व तोरण तोडण्याचा अधिकार.

(१२) दसऱ्याच्या दिवशी वाजत गाजत "शमी" व "आपटयाच्या" झाडांची पूजा करण्याचा तसेच बळी देण्याचा व चावडीवर किंवा किल्ल्यावर झेंडा लावण्याचा अधिकार.

(१३) दिवाळीच्या दिवशी शेंदूर लावण्याचा अग्रमान.

(१४) होळीच्या दिवशी वाजत गाजत होळी पेटवण्याचा व त्या सणाचे दिवशी इतर विधी पार पाडण्याचा अग्रमान.

(१५) दसऱ्याच्या व पोळयाच्या दिवशी जळाऊ लाकडाची मोळी देण्याचा अधिकार.

(१६) महाराचा आठी सोळा व काठीचा अधिकार.

(१७) लग्नाच्या वेळी नवरा नवरीला जोडे देण्याचा मोच्याचा अधिकार.

(१८) एखाद्या सवर्ण व्यक्तीचा मृत्यू झाल्यास तिच्या अंत्यसंस्कारासाठी खड्डा खोदण्याचा व चितेसाठी लाकडे आणण्याचा अधिकार.

(१९) सवर्ण व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, हलक्या जातींच्या व्यक्तींनी त्या संबंधीचा निरोप पोचवण्याचा अधिकार.

(२०) लग्नासारख्या समारंभाच्या प्रसंगी पान-सुपारी वाटण्याचा अधिकार.

(२१) साखळी तोडण्याचा अधिकार तसेच पालखीची, रथाची मिरवणूक काढण्याचा अधिकार.

(२२) मुख्य मानकऱ्याच्या घरी वाजंत्री लावून तुळशीचे लग्न लावण्याचा अग्रमान.

(२३) न्हाव्याकडून उटणे लावून घेण्याचा व धोबिणीकडून ओवाळून घेण्याचा मानकऱ्याचा अधिकार.

(२४) गणपती उत्सवाच्यावेळी "गणपतीची" मूर्ती आणण्याचा अधिकार.

(२५) रथाची मिरवणूक काढण्याचा अग्रमान.

(२६) "मानकऱ्याच्या" घरांना त्यांच्या मानानुसार भेटी देऊन त्यांना "टिळा" लावण्याचा व त्याच्या मोबदल्यात "धान्य" मिळण्याचा अधिकार.

(२७) सार्वजनिक मालमत्तेचा किंवा वस्तूंचा जाहीर लिलाव विवक्षित जमातींनी पुकारण्याचा अधिकार.

(२८) देवीला किंवा स्थानीक देवतेला सेवक म्हणून स्त्री/पुरुष समर्पित करण्याची व त्यांना पुढे आयुष्य-भर अविवाहित राहविण्याची प्रथा.

(२९) देवदेवतांच्या पूजेच्या वेळी मानपान घेणे व सर्व लोकांमध्ये अग्रहक्क मान मिळवणे.

(३०) ब्राम्हण विद्यार्थ्यांनी "माधुकरी" मागण्याची प्रथा.

(३१) मानकऱ्यांनी सर्वप्रथम आपली शेते नांगरण्याचा अधिकार.

(३२) लग्नामध्ये सुगडी देण्याचा "कुंभारांचा" अधिकार.

(३३) गावामध्ये रात्रीच्या वेळी गस्त घालण्याचा व गावातील लोकांकडून भाकरी मिळवण्याचा रामोशांचा अधिकार.

(३४) नवीन लग्न झालेल्या जोडप्यांनी गावातील विवक्षित मानकरी कुटुंबाचे आशीर्वाद घेणे.

(३५) मानकरी आल्याशिवाय काही सामाजिक संमेलने किंवा सभारंभ सुरू न होऊ शकणे.

(३६) दसऱ्याच्या दिवशी घोडयाला न्हाऊ घालणे व मिरवणुकीत घोडा धरणे.

(३०) मढी सोलणे.

## आर्थिक अधिकार

(१) जोगिणीचा ओटीचा अधिकार.

(२) देवापुढे ठेवलेल्या वस्तू घेण्याचा देवस्थानांच्या पुजाऱ्यांचा अधिकार तसेच देवळाच्या स्थावर व जंगम मालमत्तेचा लाभ घेण्याचा अधिकार.

(३) पंढरपूर, शिंगणापूर, तुळजापूर, ज्योतिबा, वैजनाथ, खंडोबा व इतर ठिकाणच्या देवळांच्या उत्पन्नावरील पुजाऱ्यांचा व मानकऱ्यांचा वंशपरंपरागत अधिकार.

(४) देवदेवतांची निगा राखण्यासाठी शेती करण्याचा अधिकार.

(५) देवळाच्या वार्षिक उत्पन्नातून देवापुढे दिवा लावण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार.

(६) मूर्तीला वाहिलेले नारळ, साडया, फुले इत्यादींची विक्री करून मिळणारे उत्पन्न घेण्याचा अधिकार.

(७) देवापुढे बळी दिलेले किंवा देवाला सोडलेले प्राणी घेण्याचा अधिकार.

(८) प्रसाद, अभिषेक वस्तू यांसारख्या देवाला अर्पण केलेल्या वस्तू घेण्याचा अधिकार.

(९) देवळामध्ये राहण्याचा अधिकार.

(१०) खाजगी प्रयोजनांसाठी देवळांचा वापर करण्याचा अधिकार.

(११) पूजा करण्याबद्दल पगार मिळण्याचा अधिकार.

(१२) उत्पन्न मिळवण्याचा बलुतेदारांना अधिकार.

(१३) मदारी, कडकलक्ष्मी, नंदीवाला, डोंबारी, गोंधळी, दावरी फकीर, देवदासी, वाघ्या-मुरळी, जोगती इत्यादींना असलेला उदरनिर्वाहासाठी भीक मागण्याचा अधिकार.

(१४) श्रावण सोमवारी व इतर पवित्र दिवशी विविध कुटुंबामध्ये "बेल" वाटण्याबद्दल पैसे व सिधा मिळवण्याचा जंगमाचा अधिकार.

(१५) निरनिराळ्या धार्मिक उत्सवांच्या वेळी खालच्या जमातींच्या व्यक्तींकडून शिधा मागण्याचा उच्च वर्णीयांचा अधिकार.

(१६) दवंडी पिटवून घोषणा करण्याबद्दल पैसे मिळण्याचा अधिकार.

(१७) सोलापूर जिल्ह्यातील नातेपुते गावच्या देशमुख, देशपांडे यांचा चैत्र महिन्यातील जत्रेच्या वेळी गुप्तलिंग व गिरिजापती देवांच्या उत्पन्नावरील अधिकार.

## प्रकरण चार

## निष्कर्ष आणि शिफारशी

४.१ या पूर्वीच्या तीन प्रकरणांमध्ये कोणत्या परिस्थितीत या समितीची नेमणूक झाली ती परिस्थिती, काही महत्त्वाच्या व्यक्तींनी समितीपुढे नोंदवलेली तोंडी साक्ष प्रश्नावलीत अंतर्भूत केलेल्या प्रत्येक प्रश्नावर माहितगार व्यक्तिकडून किंवा संस्थाकडून आलेली लेखी उत्तरे आम्ही नमूद केली आहेत. तिसऱ्या प्रकरणात आम्ही समितीने शोधून काढलेल्या अधिकारांची जंत्री सादर केली असून धार्मिक, सामाजिक व आर्थिक अशा तीन स्थूल वर्गांमध्ये त्याचे वर्गीकरण प्रस्तूत केले आहे. त्याच प्रकरणात महाराष्ट्रातील महत्त्वाचे उत्सव आणि या उत्सवांच्यावेळी गावातील विशेषाधिकार असलेल्या व्यक्तींना कोणती कामगिरी बजवावी लागते ते सुद्धा आम्ही स्थूल मानाने नमूद केले आहे. या आणि शेवटच्या प्रकरणामध्ये, या विषयाशी निगडीत असलेले मूलभूत प्रश्न म्हणजेच या निरनिराळ्या अधिकारांच्या पालनामुळे भेदभावास उत्तेजन मिळते की काय आणि भारताच्या संविधानाच्या तत्त्वाशी ते विसंगत आहेत किंवा काय, निरनिराळे अधिकार कायद्याने नष्ट करावेत का आणि तसे करावयाचे तर त्यापैकी कोणते अधिकार नष्ट करावेत, जर अधिकार कायद्याने नष्ट करण्यात आले तर अपराध्यांसाठी कोणती विशिष्ठ शिक्षा सुचवावी इ. विचारात घेणार आहोत.

२. परंतु आपण हे करण्यापूर्वी आम्ही इतिहासाकडे थोडा दृष्टीक्षेप करू इच्छितो. भारतामध्ये अस्तित्वात असलेल्या विशिष्ट जाती व्यवस्थेमध्येच बऱ्याचशा अधिकारांचे मूळ असल्याचे दिसते. भारतीय समाजाची संपूर्ण घडणच अशी आहे की त्यात जातीला पराकोटीचे महत्त्व आहे आणि बहुसंख्य हिंदूंचाच काय परंतु खूप पूर्वी धर्मांतर केलेल्या बहुसंख्य मुसलमानांना व ख्रिस्ती लोकांनामुद्धा त्या विषयी जिव्हाळा वाटतो. कारण अनेक जुन्या रूढींचा त्यांच्या मनावरील पगडा अद्याप कायम आहे. उदा. काही मुसलमानांनी हिंदु देवतांच्या मिरवणुकीच्यावेळी पालखीवर मिरवणुकीने छत्र धरण्याचा विशेषाधिकार आजदेखील आहे.

४.३. 'कास्ट' (जात) हा इंग्रजी शब्द 'कास्टस' या मूळ पोर्तुगीज भाषेतील शब्दावरून झाला असून त्याचा अर्थ त्या भाषेत 'प्युअर' म्हणजे शुद्ध असा होतो. आणि हा शब्द भारतातील लोकांची ज्या निरनिराळ्या जमातींमध्ये आणि वर्गांमध्ये विभागणी झालेली आहे त्या जमातींचा आणि वर्गांचा दर्शक म्हणून वापरण्यात येतो. फार पूर्वी लोकांची चार मुख्य जातींमध्ये विभागणी करण्यात आली होती. पहिली आणि अत्यंत उल्लेखनीय जात म्हणजे ब्राम्हण; दुसरा नंबर 'क्षत्रियां'चा म्हणजे योध्यांचा, तिसरे 'वैश्य' किंवा जमीन-धारक अथवा व्यापारी ; व चौथे 'शुद्र' म्हणजे शेतकरी किंवा कष्टकरी. जातींची मूळ कल्पना रंगांवरून (वर्ण) आली. विजेत्या आर्यांनी जेव्हा जित लोकांना समाजाच्या नवीन व्यवस्थेत सामावून घेतले तेव्हा ही कल्पना पुढे आली. आक्रमण करणाऱ्यांनी या लोकांना 'दस्यु' (शत्रु) हे नाव दिले होते. परंतु पुढे या शब्दाचा अर्थ 'गुलाम' असा झाला.

४.४ लोकांचे जाती निहाय विभाजन हे एक प्रकारे व्यावसायीक स्वरूपाचेच होते, त्यामध्ये ब्राम्हणांनी पौराहित्याचा सर्वात आदरणीय व्यवसाय स्वतःच्या हाती ठेवला. क्षत्रिय योध्ये झाले आणि वैश्य व्यापारी बनले आणि या वर्गामध्ये शेतकरी, व्यापारी, सोनार, विणकर, कुंभार वगैरेंचाही अंतर्भाव झाला. प्रामुख्याने अस्वच्छ व्यवसाय करावे लागणारा सेवकांचा दर्जा प्रामुख्याने शुद्रांना देण्यात आला. इतिहास काळात केवळ तीनच वर्ग अस्तित्वात होते. इंडो आर्यांनी शुद्रांच्या या वर्गीकरणात भर घातली. या व्यवसायाधिष्ठित व्यवस्थेला ऋग्वेदाने एक प्रकारची दैवी उत्पत्ती लावली असून त्यात पुरुषाने म्हणजे दैवी पुरुषाने यज्ञ केला त्यावेळी त्याच्या डोक्यापासून ब्राम्हण, त्याच्या बाहूपासून क्षत्रिय, त्याच्या मांड्यांपासून वैश्य, आणि पावलापासून शुद्रांचा वर्ग उदय झाला ते वर्णिले आहे. मायकेल एडवर्डसने आपल्या "हिस्ट्री ऑफ इंडिया" या ग्रंथात असे नमूद केले आहे की:

"जात ही हिंदू समाजाची पोलादी चौकट आहे आणि ती एक विलक्षण गुंतागुंतीची रचना आहे परंतु चार जातींचा उगम दैवी आहे ही श्रद्धा त्याच्या मुळाशी असल्याने त्या निश्चित व अपरिवर्त्य मानल्या जातात आणि त्यांच्यामधील दरी भरून काढणे शक्य होत नाही. जात नाहीशी करणे म्हणजे संपूर्ण हिंदु समाजच नष्ट करण्यासारखे होईल. जेते आणि आक्रमक बौद्ध, मुसलमान, ख्रिस्ती अशा सर्वांनाच त्याची सर्वव्यापी शक्ती स्वीकारणे भाग पडले आहे."

सारख्या ब्राम्हण्यावर आणि ब्राम्हणी रीतीरिवाजांवर कडवट टीका करणाऱ्या एका महान विचारकाचाही समावेश होतो. अब्बे दुबईस म्हणतो: या धारणेच्या सत्यतेचा पडताळा घेण्यासाठी, हिंदु लोक ज्या अक्षांशावर राहतात त्याच अक्षांशावर राहणाऱ्या विविध वंशांच्या इतर लोकांच्या स्थितीकडे दृष्टिपात करणे आणि त्यांच्यापैकी ज्या लोकांची नैसर्गिक प्रवृत्ती आणि चारित्र्य, ईश्वरप्रणीत धर्माच्या शुद्धिकरणाच्या तत्त्वप्रणालीने कायमचे प्रभावित झालेली नाही अशा लोकांचा पूर्वीचा आणि विद्यमान सद्याचा दर्जा विचारात घेणे पुरेसे होईल.

आपण जर भारतीय द्वीपकल्पाच्या पश्चिमेकडील व त्याच्या पूर्वेकडील रांगेपलिकडील चीन पर्यंतच्या शेजारच्या राष्ट्रांकडे नजर टाकली तर हिंदुंना जातीच्या बंधनाने सामाजिक कर्तव्यांच्या चौकटीत जखडून ठेवले नसते तर हिंदूंची काय अवस्था झाली असती याची आपल्याला कल्पना करता येईल. खुद्द चीनमध्ये देखील तेथील समशीतोष्ण हवामान आणि त्या देशाने स्वीकारलेली जगात कोठेही इतरत्र न आढळणारी शासनपद्धती यांमुळे हिंदू समाजात जातिभेदामुळे जी परिस्थिती निर्माण झाली तशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

बराच काळजीपूर्वक विचार केल्यानंतर मला असे दिसते की, हिंदू लोक त्यांच्या शेजाऱ्यांप्रमाणे किंवा अतिउष्ण कटिबंधात राहणाऱ्या जवळजवळ इतर सर्व राष्ट्रांप्रमाणे त्याच रानटी अवस्थेत आढळत नाहीत याचे जातींखेरीज अन्य कोणतेही कारण नाही जातीमुळे प्रत्येक व्यक्तीला उपजीविकेसाठी स्वत:चा पेशा किंवा धंदा लाभतो. आणि ही पद्धती पिढ्यानपिढ्या बापापासून मुलास या रीतीनें चालत येण्यामुळे कोणत्याही व्यक्तीला किंवा तिच्या वंशजांना कायद्याने नेमून दिलेली जीवनाची परिस्थिती बदलणे अशक्य होऊन बसते. हिंदूंचे विशिष्ट गुणधर्म प्राप्त झालेल्या लोकांमध्ये सुसंस्कृतपणाची अवस्था टिकवून ठेवण्यासाठी अतिशय सुस्पष्ट दूरदर्शीपणानेच अशा प्रकारची यंत्रणा बहुधा अस्तित्वात आणली गेली असावी.

४.७. आपल्या अभ्यासाच्या विषयाशी संबद्ध असलेली आणखी दोन क्षेत्रे आहेत. एक म्हणजे ग्रामीण जीवन मूलत: ज्या चौकटीत बांधले गेले आहे ती पद्धत आणि दुसरे म्हणजे बलुतेदारी पद्धती, भारतामध्ये ५,००,००० गावे आहेत. त्यापैकी ३५,००० गावे महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रामध्ये आपल्याकडे सुमारे २२,००० ग्रामपंचायती आहेत. भारतीय लोक खेड्यांत राहतात ही अतिशयोक्ती नसून वस्तुस्थितीच आहे. भारताच्या लोकसंख्येपकी सुमारे ८० टक्के लोक खेड्यांत राहतात आणि त्यांपैकी सुमारे ६० टक्के लोक शेती करतात आणि उरलेले लोक एकतर बेकार तरी आहेत किंवा त्यांचा स्वत:चा इतर कामधंदा आहे. प्रत्येक खेड्याचे स्वत:चे असे काही वेगळेपण असून ते आटोपशीर आणि बऱ्याच मोठ्या प्रमाणात स्वावलंबी आहे. तरीही औद्योगीकरण आणि शहरीकरण यांमुळे भारतीय खेड्यांच्या सलगतेवर व एकसंघ रचनेवर थोडाफार आघात केला आहे यांत शंकाच नाही. वीज, रेल्वे आणि नवनवीन संकल्पना यांच्या उदयाबरोबर खेड्यातील जीवनाची लय बदलली आहे आणि बदलत आहे. भरभराट आणि सधनता यांमुळे ज्या भागांत पाटबंधाऱ्यांच्या विपुल सोयी व गोष्टी आहेत त्या भागात आधुनिकता व नवी जीवनप्रणाली येत आहे. ही गोष्ट विशेषत: महाराष्ट्रातील ऊस उत्पादक यांच्या बाबतीत खरी आहे. मोटार सायकली, रेडिओ, ट्रान्झिस्टर, आधुनिक पादत्राणे आणि कपडे या वस्तू ज्या खेड्यांमध्ये बऱ्याच वर्षांपासून शेतीची भरभराट होत आहे अशा कित्येक खेड्यांत, आजमितीस दिसतात. जवळच्या शहरांना व गावांना वरचेवर जाणे-येणे देखील रोजचेच झाले आहे. परंतु अशी भरभराट झालेली खेडी काही मोजकी सोडल्यास, उरलेल्या खेड्यांतील विशेषत: आडजागी असलेल्या खेड्यांतील जीवन त्याच जुन्या सुस्त आणि सुरी पद्धतीने चालू आहे. तेथील सर्वसाधारण जीवन ग्रामपंचायत, गावातील मंदिर, गावातील चावडी, गावची शाळा आणि गावातील शेते यांच्या भोवतीच केंद्रित झालेले दिसते. काही खेड्यांमध्ये ग्रामस्थांच्या आरोग्यविषयक गरजा भागविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे किंवा उपकेंद्रे देखील असतील. या संपूर्ण व्यवस्थेमध्ये "गावकरी" आणि "वतनदार" यांसारख्या विशेषाधिकार असणाऱ्यांचे फार वर्चस्व असते.

४.८. खेड्यामध्ये अद्यापही चालू असलेल्या बलुतेदार पद्धतीकडे आता आपण वळूया. खाली दर्शविल्याप्रमाणे एकूण १२ बलुतेदार असतात :—

(१) चांभार
(२) कुंभार
(३) न्हावी
(४) सोनार
(५) ढोर
(६) मांग
(७) धोबी
(८) रामोशी
(९) सुतार
(१०) लोहार
(११) महार
(१२) कोळी

४.९. जेव्हा वस्तूविनिमय पद्धती प्रचलित होती आणि पैशाचे व्यवहार लोकांना माहीत नव्हते किंवा तुलनेने फारच लहान प्रमाणात चालत होते आणि जेव्हा केलेल्या कामाचा मोबदला जमीन देऊन किंवा विशिष्ट अधिकार बहाल करून दिला जात असे तेव्हा म्हणजे सरंजामशाहीच्या काळात बलुतेदारी पद्धती अस्तित्वात आली. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी देखील या पद्धतीत विघ्न आणले नाही. पैशाचे व्यवहार अस्तित्वात आल्यानंतर मात्र अडचणी उद्‌भवू लागल्या आणि आमच्या उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाने असे सांगितले की, काही खेड्यांमध्ये बलुतेदार आता जमीन मालकांकडून व इतरांकडून पैशामध्ये मोबदला मागतात. हट्ट धरतात. अन्नधान्य, जुने कपडे यांसारख्या वस्तूंच्या रूपाने आता त्यांना मोबदला नको असतो. तसेच, गोसावीदेखील बलुतेदाराच्या वर्गातच मोडतात आणि 'जंगम' 'बडवे' 'गुरव' आणि अशाच प्रकारचे इतर मागासवर्गीचे लोक-जे खेड्यातील ब्राम्हणांचे प्रतिनिधी म्हणून धार्मिक विधी किंवा समारंभ पार पाडतात त्यांना देखील ग्रामीण समाज रचनेत काही दर्जा व मान प्राप्त झाला आहे.

४.१०. खेड्यातील विशेषाधिकार असलेले किंवा नसलेले लोक उपभोगत असलेले वेगवेगळे अधिकार दोन्ही बाजूंनी पाळले जातात. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर दोन्ही प्रकारचे लोक म्हणजे उच्च जातीचे तसेच कनिष्ठ जातीचे लोकसुद्धा या अधिकारांचा उपभोग घेतात. उदा. देवळात पूजा करण्याचा आणि लग्नाच्या वेळेस किंवा तशाच काही धार्मिक स्वरूपाच्या समारंभाच्या वेळी पूजा करण्याचा व मंत्र म्हणण्याचा अधिकार हा जसा ब्राम्हण पुरोहिताला असतो तसाच तो मानकऱ्यालाही असतो. दुसरे उदाहरण म्हणजे, खेड्याच्या आसपासची मेलेली जनावरे ओढून नेणे आणि अशा जनावरांची कातडी सोलणे हा कनिष्ठ जातीतील ढोरांचा अधिकार आहे. या कामास अधिकार म्हणजे हा एक विरोधाभासच आहे. कनिष्ठ जातीच्या समाजांच्या अधिकारांची अशाच प्रकारची आणखीही उदाहरणे देता येतील. म्हणून स्थूलमानाने, आमचा निष्कर्ष असा आहे की, 'अधिकार' हे उच्च जातीच्या लोकांनाच आहेत असे नाही तर कनिष्ठ जातीच्या लोकांनाही काही अधिकार आहेत. परंतु, सर्वसाधारणपणे खेड्यातील अस्वच्छ व निकृष्ठ प्रकारच्या कामांच्या संबंधातच कनिष्ठ जातीतील लोकांना या अधिकारांचा उपभोग घेता येतो. आता ही परिस्थिती थोडीशी परस्परविरुद्ध व विरोधाभासाची आहे. असे अधिकार कनिष्ठ जातीतील लोकांनी जरी बजावले तरी ते लोकशाही विरुद्धच व संविधानातील भावनेविरुद्ध आहेत आणि ते कायद्याने ताबडतोब बंद करणे जरूर आहे.

४.११. पोळा, दसरा, दिवाळी, शिमगा इ. सारखे सणांचे प्रसंग म्हणजे दंगलींना कायम आमंत्रणच ! यामुळे कधीकधी थोडीफार हिंसाही होते आणि खेड्यातील लोकांमध्ये कायम वैमनस्य निर्माण होते म्हणून समितीने पोलीस महा निरीक्षक, महाराष्ट्र यांजकडे अशी चौकशी केली की, रूढीगत व परंपरागत अधिकारांचा वापर दंगलीत किंवा हिंसेमध्ये परिणता झाल्याची प्रकरणे व तक्रारी गेल्या तीनएक वर्षांत पोलीस ठाण्यात किंवा चौकीत नोंदली गेलीकी नाहीत आणि अखेरीस अशी प्रकरणे न्यायालयापुढे पाठविण्यात आलीत किंवा नाहीत. समितीला हेही जाणून घ्यावयाचे होते की, प्रत्येक जिल्ह्यातील पोलीस ठाण्याकडे किंवा पोलीस चौकीकडे अशा प्रकारची किती प्रकरणे नोंदण्यात आली आणि या प्रकरणांवर अखेरीस काय कार्यवाही करण्यात आली आणि गावकऱ्यांचे मानपानाचे अधिकार उचलून धरणारे किंवा नाकारणारे मनाई हुकूम न्यायालयाने दिले होते किंवा नाही. म्हणून पोलीस महा निरिक्षकास प्रत्येक जिल्ह्याची वरील स्वरूपाची माहिति एका विहित नमुन्यात शासनाला सादर करण्याची विनंती करण्यात आली. पोलीस महा निरीक्षकांनी कळविलेल्या अशा प्रत्येक प्रकरणाचे विश्लेषण खाली दिले आहे :—

### बुलढाणा जिल्हा

४.१२. बुलढाणा जिल्ह्यातील गोटमारा खेड्यातील श्री. प्रल्हाद दयाराम कोळी यांच्या बैलांना पोळ्याच्या दिवशी पहिला मान देण्याची रूढी होती. परंतु २७ ऑगस्ट १९७३ रोजीच्या पोळ्याच्या दिवशी श्री. मोतीराम फत्स लोधी या व्यक्तीला आपल्या बैलांना पहिला मान मिळावा असे वाटले, परिणामी गावातील कोळी व लोधी यांच्यामध्ये बाचाबाची लाटीमार व दगडफेक झाली व त्याचे पर्यवसान खेड्यातील कोळी व लोधी यांच्यामध्ये दंगल होण्यात झाले. दोन्ही पक्षांनी धामणगावच्या पोलीस ठाण्यावर तक्रार नेली आणि १० कोळी व ८ लोधी यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम १४७, १४९ व ३३७ खाली दोन फौजदारी खटले गुदरण्यात आलेत. संबंधित व्यक्तींना ३० ऑगस्ट १९७३ रोजी अटक करण्यात आली आणि प्रकरण न्यायालयाकडे पाठविण्यात आले. ही प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याचे कळविण्यात आले.

### यवतमाळ जिल्हा

४.१३. (अ) २० ऑगस्ट १९७१ रोजी सिलोना खेड्यात पोळ्याच्या दिवशी मराठा व वंजारी जमातीत तंटा उद्‌भवला जेव्हा 'मानकरी' 'तोरणाखाली' आपले बैल लावीत होता तेव्हा वंजारी लोकांनी मानकऱ्यावर

हल्ला केला. दोन्ही गटांतील ९–१० लोकांनी परस्परावर हल्ला केला. दोन्ही बाजूंनी तक्रार केल्यावर महागांव पोलीस ठाण्यावर दोन फौजदारी प्रकरणे नोंदण्यात आली. अखेरीस ही प्रकरणे शेवटी सामोपचाराने मिटली.

४.१४ (ब) 'वडकी' खेड्यात पोळ्याच्या मानपानावरून भांडण झाले. पोलीस पाटील श्री. बळवंतराव देशमुख, त्यांचे तीन मुलगे व एक नोकर यांनी ७ सप्टेंबर १९७२ रोजी, आपले बैल दर वर्षी गुलाबराव काकडे यांचे बैल जेथे उभे केले जात, तेथे उभे केले. याला श्री. काकडे यांनी हरकत घेतली. पोळ्याचा उत्सव संपल्या-नंतर श्री. बळवंतराव देशमुख, त्यांची मुले व नोकर श्री. गुलाबराव काकडे यांच्या घरी लाठ्या काठ्या घेऊन गेले व त्यांनी त्यांना ठार मारण्याची धमकी दिली. वडकी पोलीस स्टेशनवर फौजदारी प्रकरण नोंदण्यात आले. खटला अद्याप न्यायालयात अनिर्णीत असल्याचे कळते.

४.१५. (क) दिनांक ७ सप्टेंबर १९७२ रोजी लाडखेड पोलीस स्टेशनवर एक फौजदारी प्रकरण नोंदण्यात आले. दहिफळ येथील श्री. सावतराम झामा बंजारी व त्याच्या मित्रांनी पोळ्याच्या दिवशी पोलीस पाटलाला शिवीगाळ केली. आणि अशा प्रकारे उत्सव साजरा करण्यात विघ्न आणले. प्रकरण न्यायालयात अनिर्णीत असल्याचे कळते.

## जिल्हा नांदेड

४.१६. दिनांक २० ऑगस्ट १९७१ रोजी श्री. सुभानराव हनुमंतराव सरपंच व अन्य २१ जणांनी पोळ्याच्या 'मानपानावरून' जुन्ना गावाचे रहिवाशी श्री. निवृत्ती मराना हटकर यांच्यावर हल्ला केला. दोन्ही पक्षांनी मुखेड पोलीस स्टेशनवर परस्परांविरुद्ध फौजदारी प्रकरणे नोंदविली. दिनांक १९ जुलै १९७३ रोजी समेट होऊन खटला निकालात निघाल्याचे कळले.

## जिल्हा औरंगाबाद

४.१७. दिनांक २७ ऑगस्ट १९७३ रोजी भाडगाव, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद येथील रहि-वाशी श्री. रामराव पंजाबी वाळके यांच्यावर श्री. शाहू देवजी ठोंबरे व श्री. आप्पा देवजी ठोंबरे यांनी पोळ्याच्या मानपानावरून सुरीहल्ला केला. खटला न्यायप्रविष्ट असल्याचे कळते.

## जिल्हा उस्मानाबाद

४.१८. दिनांक ७ सप्टेंबर १९७२ रोजी दावण हिपारगा येथील रहिवाशी श्री. हवगीवराव भीमराव पाटील, यांनी पोळ्याच्या सणाच्या दिवशी आपल्या बैलांची मिरवणूक काढली होती. गावातील मारुतीच्या देवळापाशी श्री. सरुप केशवराव पाटील व इतर ८ जणांनी भांडण उकरून काढले व श्री. हवगीवराव पाटील यांच्यावर हल्ला केला. श्री. सरुप पाटील व इतरांविरुद्ध देवनी पोलीस स्टेशनवर फौजदारी खटला नोंदविण्यात आला. दिनांक १२ फेब्रुवारी १९७३ रोजी त्यांच्यावर न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले. प्रकरण न्यायालयात अनिर्णीत असल्याचे कळते. मानपान कायम ठेवण्याबाबत किंवा ते नाकारण्याबाबत न्याया-लयाने कोणताही निषेधादेश दिलेला नाही.

४.१९. (ब) सातारा, जिल्हा उस्मानाबाद येथील पोलीस पाटील श्री. श्रीरंग तुकाराम हे मारुतीच्या देवळात पहिल्यांदा बैलांची मिरवणूक प्रथम नेण्याचा मानपान उपभोगत होते. परंतु दिनांक २७ ऑगस्ट १९७३ रोजी त्याच गावातील श्री. सयाजीराव शिंदे व इतरांनी प्रथम मिरवणूक काढली. या घटनेमुळे दोन्ही पक्षामध्ये किरकोळ स्वरूपाचे भांडण झाले. तथापि, पोलीस स्टेशनवर तक्रार नोंदविण्यात आली नाही, म्हणून कोणत्याही अपराधाची नोंद नाही.

## जिल्हा ठाणे

४.२०. दिनांक १७ ऑक्टोबर १९७२ रोजी, दहागाव, जिल्हा ठाणे येथील एक व्यक्ती श्री. धर्मा कानू पाटील व इतर काही यांनी दसऱ्याच्या दिवशी आपट्याची पाने वाटण्यासाठी सीमोल्लंघन केले. परंतु येत असताना, वाटेत श्री. लखू बुधा पवार व इतर काही जण श्री. पाटील यांना भेटले आणि श्री. पवारांच्या आधी ते सोने वाटण्यास का गेले? असे त्यांना विचारले. थोडीशी बाचाबाची झाली आणि श्री. पवार व त्यांच्या बरोबर असलेल्या इतरांनी श्री. पाटील यांच्यावर काठ्या, दगड व बुक्यांनी हल्ला केला. त्यामुळे सात इसम

जखमी झाले. श्री. पवार, श्री. पाटील यांच्या घरात घुसले व भिंतीचे नुकसान केले. श्री. पाटील यांनी दिनांक १८ ऑक्टोबर १९७२ रोजी शहापूर पोलीस स्टेशनवर तक्रार नोंदवली. प्रकरण न्यायालयात अनिर्णीत असल्याचे कळते.

४.२१. ही माहिती येथे देण्यामागील उद्देश असा की, उत्सव साजरे करताना, "मानकऱ्यांच्या" या तथाकथित अग्रमाच्या वापरामुळे गंभीर स्वरूपाचे तंटे निर्माण होतात, इतकेच नव्हे तर त्यातून हिंसाचार देखील उद्‌भवतो. अशा तंटेबखेड्यांमुळे कोणतीही जीवितहानी झालेली नाही. इतकेच या गोष्टीकडे लक्ष जावे. याशिवाय, अशी प्रकरणे ज्या न्यायालयात दाखल करण्यात आलीत त्या न्यायालयांनी मानपान उचलून धरणारे किंवा नाकारणारे कोणतेही स्पष्ट अभिप्राय दिलेले नाहीत. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे "मानापानाच्या" अधिकारांस कोणतीही कायद्याची मान्यता नसून सरंजामी काळातील रुढीमधूनच त्यांचा विकास झाला आहे.

४.२२. भारताच्या संविधानाचे अनुच्छेद १४ व १५ यामध्ये (मूलभूत अधिकार) कायद्यापुढे सर्वजण समान आहेत हे तत्त्व दिलेले आहे. कोणत्याही नागरिकास (धर्म, वंश, जात, स्त्री किंवा पुरुष याशिवाय जन्मस्थान या कारणावर) अनुच्छेद १५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कित्येक बाबींच्या संबंधात अपात्र ठरवणे, जबाबदार धरणे, निर्बंध घालणे किंवा अट घालणे इत्यादी गोष्टी करता येणार नाहीत असेही म्हटले आहे. याशिवाय संविधानाच्या निर्देशक तत्त्वांचा मुख्य भर भारतासाठी काम करण्यावर असून लोककल्याण हा त्या-मागील मुख्य विचार आहे. आणि प्रत्येक भारतीयास सर्व बाबतीत समान समजले जाते. मग ती बाब संपत्ती-विषयची असो किंवा सत्तेविषयीची असो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर आपला भारत देश आपल्याला अशा प्रकारे घडवावयाचा आहे की, ज्यामध्ये वर्ग नसतील, जाती नसतील, कोणत्याही स्वरूपाचे भेद नसतील आणि जेथे प्रत्येकाला प्रत्येक गोष्टीत समान सहभाग मिळेल जे अधिकार या समितीच्या निदर्शनास आलेत व या अहवालाच्या प्रकरण तीनमध्ये ज्यांची जंत्री व वर्गीकरण करण्यात आले आहे त्यामुळे समतेच्या व मानवी प्रतिष्ठेच्या तत्त्वांचा भंग होतो. ते भेदभाव करण्याच्या स्वरूपाचे आहेत व कायद्याच्या दृष्टीने त्यात समता नाही, नष्ट केले पाहिजे अशी या सगळयांनी स्पष्ट व जोरदार शिफारस केली आहे. समिती त्यांच्याशी सहमत आहे. समितीला असे वाटते की मानकरी, वतनदार, जी-हुजूर, स्वामी, पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, जंगम, गुरव, गोसावी यांनी आतापर्यंत ज्या अधिकारांचा उपभोग घेतला त्या अधिकारांचे दिवस आता संपुष्टात आलेले आहेत व एक निश्चित असा कायदा करून ते नष्ट करण्याची वेळ आता आली आहे.

४.२३. कायदा न करता सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बलाचा वापर करून याबाबतीत सुधारणा घडवून आणावी असा युक्तिवादही आमच्यापुढे जोमदारपणे करण्यात आला आहे. आम्ही या मताशी सहमत नाही कारण ते निव्वळ एक स्वप्न ठरेल असे आम्हाला वाटते. भारतीय समाज व भारतीय खेडी ही बहुतेक शतानुगतिक व अंधश्रद्धाळू आहेत. त्यामुळे कायदा करूनच हे अधिकार नष्ट करण्याचे क्रांतिकारी पाऊल शासनाने टाकले नाही तर, शिक्षणाचा, तंत्रशास्त्रीय प्रगतीचा, आधुनिक विचारांचा कितीही प्रसार झाला तरी मानकरी व इतर लोक पुढील कित्येक वर्षे विद्यमान अधिकार जसेच्या तसे वापरीत राहतील.

४.२४. आमच्यापुढे असेही प्रतिपादन जोरदारपणे करण्यात आले आहे की, काही अधिकार प्रमुख आहेत तर काही गौण आहेत. काही जास्त हानिकारक आहेत तर काही कमी आणि म्हणून यांच्यासंबंधात फरक केला पाहिजे. या युक्तीवादातही आम्हाला फारसा दम आढळून आला नाही. काही अधिकार भयानक आहेत तर इतर काही फारच भयंकर आहेत. दोन्ही बाबतीत परिणाम भयंकरपणा हाच आहे.

४.२५. आमच्या काही उत्तर देणाऱ्यांनी आम्हाला असे सांगितले की, कायद्याने जर अधिकार नष्ट केलेत तर "ऐवजी" चा प्रश्न उद्‌भवेल. उदाहरणार्थ पोळयासारख्या विवक्षित उत्सवातील अग्रमानाचा अधिकार जर नष्ट करण्यात आला तर भविष्यकाळात अशा अधिकाराचा वापर कोणत्या व्यक्तीने करावा असा प्रश्न उद्‌भवेल. ग्रामपंचायतीच्या सरपंचानी अधिकारांचा वापर करण्यासाठी ते त्यांच्याकडे हस्तांतरित करावे असेही सुचवण्यात आले आहे. या समितीच्या शिफारशींच्या परिणामी जो कायदा अंमलात येईल त्यास असे केल्याने राजकीय स्वरूप येईल. "ऐवजीच्या" या प्रश्नाला फारसे महत्त्व देऊ नये असे आम्हाला वाटते. एकदा अधिकार नष्ट झाले म्हणजे या प्रश्नावर लोक एकमताने काहीतरी ठरवतील व अन्य एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना अग्रमान देतील.

४.२६. अधिकार नष्ट केल्यानंतर भरपाई देण्यासंबंधीचा प्रश्न आमच्यापुढे उपस्थित करण्यात आल आहे. वस्तुतः समितीने तयार केलेल्या प्रश्नावलीतच हा मुद्दा समाविष्ट आहे. समितीला हा प्रश्न हास्यास्पद वाटतो. मानकऱ्यांनी खुषीने किंवा नाखुषीने इतकी वर्षे हे सर्व अधिकार उपभोगलेले आहेत व बऱ्याच काळापर्यंत अशा अधिकारांचा वापर करून उत्पन्न मिळवले आहे. शिवाय, या अधिकाऱ्यांना केवळ जनरूढीचाच आधार आहे, कायद्याचा नाही. म्हणून, समितीची अशी शिफारस आहे की, एकदा अधिकार नष्ट करण्यात आले की, सध्याच्या मानकऱ्यांना कोणतीही भरपाई देऊ नये.

४.२७. शिक्षेच्या संबंधात, श्री. धोंडगे यांनी आपल्या बिनसरकारी विधेयकात स्वीकारलेल्या दृष्टिकोणाशी ही समिती सहमत आहे. आणि समिती अशी शिफारस करते की, करावयाच्या कायद्याविरुद्धचे अपराध हे दखलपात्र अपराध असावेत आणि अशा अपराधासाठी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंतच्या कैदेची आणि ५०० रुपयांपर्यंत दंडाचीही शिक्षा देण्यात यावी.

४.२८. आणखी एक छोटासा मुद्दा आहे. प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक ५ मध्ये असे विचारण्यात आले आहे की, पाटील वतने, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे वतने आणि सर्व कनिष्ठ ग्राम वतने, महाराष्ट्र शासनाच्या १९६० पासून विविध अधिनियमांनी नष्ट करण्यात आल्यानंतरही रुढीगत फी इत्यादी घेण्याचे कोणतेही अधिकार अद्यापही चालू आहेत का आणि ही वतने रद्द करणारे कायदे परिणामकारक ठरले आहेत का? अक्षरशः उत्तरे देणाऱ्या सर्वांनीच असे म्हटले आहे की, आता कोणतीही रुढीगत फी वगैरे घेतली जात नाही आणि आपली ध्येये पार पाडण्यात हे कायदे बऱ्याच प्रमाणात यशस्वी ठरलेले आहेत. या दृष्टिकोणाशी समिती सर्वसामान्यपणे सहमत आहे.

४.२९. या समितीच्या लक्षात आलेले बरेचसे रुढीगत अधिकार हे देवळांशी संबंधित आहेत आणि यांमध्ये हिंदू धर्मानुसार पूजा करण्याचा संबंध आहे. या पवित्र स्थानी, ब्राह्मण, गुरव, जंगम गोसावी यांचेच वर्चस्व असते. पवित्र स्थानी हे सर्व अधिकार रद्द करावेत असे आम्ही सुचविलेले आहे. तथापि, समिती अशी शिफारस करते की, तुळजापूर, शिर्डी, वैजनाथ इत्यादींसारख्या सर्व मोठ्या देवळांसाठी सार्वजनिक विश्वस्त मंडळे स्थापन करण्यात यावीत आणि इतर सर्व लहान देवळे आणि छोटी देवळे आणि हिंदूंची पूजेची ठिकाणे यांच्या व्यवस्थापनासाठी शासनाचा एक स्वतंत्र विभाग असावा. तामीळ नाडूमध्ये तामीळ नाडू शासनाच्या नियंत्रणाखाली एक देवस्थान विभाग आहे असे समितीला कळले आहे. महाराष्ट्र शासनानेदेखील असाच एक विभाग सुरू करावा अशी ही समिती शिफारस करते.

**श्री. ए. एस. कस्तुरे,** अध्यक्ष.

**श्रीमती शांती नाईक,** उपाध्यक्ष.

**श्री. केशवराव धोंडगे,** सदस्य.

**श्री. व्ही. जी. प्रभुगांवकर,** सदस्य.

**श्री. टी. एस. भारदे,** सदस्य.

**श्री. टी. पी. कांबळे,** सदस्य.

**श्री. एम. बी. काकडे,** सदस्य.

**श्री. एस. एच. अवचर,** सदस्य.

**श्री. नामदेवराव व्हटकर,** सदस्य.

**श्री. अनंतराव पाटील,** सदस्य.

**श्री. उद्धवराव पाटील,** सदस्य.

**श्री. नानासाहेब माने,** सदस्य.

**श्री. महेश्वर ठाकूर,** सदस्य.

**डब्ल्यू. एम. शेख,**
उप सचिव व सदस्य-सचिव,
महाराष्ट्र शासन.

मुंबई, दिनांक ११ एप्रिल १९८०.

# परिशिष्ट अ

## प्रश्नावली

(१) दसरा, दिवाळी, पोळा, शिमगा आणि पाडवा इत्यादी प्रसंगी पाळण्यात येणारे मानपान आणि महाराष्ट्रामधील खेडी, नगरे व शहरे येथे अशाच प्रकारे पिढयान् पिढया अस्तित्वात असलेल्या अन्य रुढी यांसह रुढीगत व वंशपरंपरागत अधिकारांबाबत आपली काय कल्पना आहे ?

(२) पूर्वीच्या सत्ताधिकाऱ्यांनी तुमच्या भागात कोणाही व्यक्तीला किंवा जमातीला प्रदान केलेले कोणतेही रुढीगत किंवा वंशपरंपरागत अधिकार किंवा सामाजिक किंवा संस्थागत सवलती सध्याच्या काळातही वापरल्या जात आहेत असे तुम्हाला वाटते काय ? तसे असल्यास, ते कोणते आणि त्यांचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक स्वरूप काय आहे आणि हे रुढीगत अधिकार किंवा मानपान कोणत्या प्राधिकरणाकडून देण्यात आले. यांसंबंधात तुमच्या कल्पना आणि तुम्हाला असलेली सर्व माहिती तुम्ही देऊ शकाल काय ?

(३) या अधिकारांखेरीज जन्माच्या किंवा जातीच्या आधारे काही वंशपरंपरागत अधिकार प्रचलित आहेत काय ? जर असतील तर तुम्ही त्यांचे मूळ कशात आहे म्हणजे ते कसे आणि कशासाठी निर्माण झाले ते सांगू शकाल काय ?

(४) वर उल्लेखिलेल्या प्रकारच्या आणि सध्या तुमच्या भागात प्रचलित असलेल्या सर्व अधिकारांची, रुढींची, मानापमानांची जंत्री तुम्ही करू शकाल काय ?

(५) सर्व पाटील वतने, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे इत्यादी वतने तसेच सर्व कनिष्ठ ग्राम वतने महाराष्ट्र महसुली पाटील (वतने रद्द करणे) अधिनियम, १९६२, मुंबई परगणा व कुलकर्णी वतने (रद्द करणे) अधिनियम, १९५० व मुंबईचा कनिष्ठ ग्राम वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ या अन्वये नष्ट करण्यात आलेली आहेत. तसेच उक्त तीन अधिनियमांखाली सर्व पाटील, वतनांखालील कुलकर्णी इत्यादी वतनांखालील सर्व जमिनी आणि कनिष्ठ ग्राम वतनाखालील जमिनी शासनाने स्वतःच्या ताब्यात घेतल्या आहेत आणि पद व वतन मालमत्ता धारण करण्याचा अधिकार व रुढीगत फी किंवा पैशाच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात बक्षीस आकारण्याच्या अधिकारासह उक्त वतनाशी संबंधित असलेले सर्व भार व सेवा विलुप्त करण्यात आल्या आहेत. असे असतानाही एखादे पद किंवा रुढीगत अधिकार किंवा रुढीगत फी आकारण्याचा अधिकार किंवा कोणतीही सेवा मागण्याचा अधिकार अजूनही चालू आहे असे आपणास वाटते का ? तसे असल्यास, आपण त्याचा तपशील देऊ शकाल का ? तसेच उपरोक्त कायदा परिणामकारक ठरला का तेही नमूद करावे. नसल्यास, तो परिणामकारक व यशस्वी करण्यासाठी कोणती कार्यवाही करावी ते सुचवावे.

(६) वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारचे वंशपरंपरेने चालत आलेले अधिकार म्हणजे मानपानासारखे सामाजिक, धार्मिक व आर्थिक अधिकार किंवा सेवा बजावण्याचे खास अधिकार (महार वतन इत्यादी) हे जिल्हागणिक व क्षेत्रागणिक वेगळे आहेत असे आपणांस वाटते का ? तसे असेल तर त्या अधिकारातील एखादा फरक किंवा अनेक फरक आपणास नमूद करता येईल/येतील का आणि या बाबतीत आपणास जी काही माहिती असेल ती आपण देऊ शकाल काय ?

(७) या रुढीगत आणि वंशपरंपरागत अधिकारांचे आपण वर्गीकरण करू शकाल का ? आणि अशा प्रत्येक अधिकाराची ऐतिहासिक उत्क्रांती आपण थोडक्यात वर्णन करू शकाल का ?

(८) आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासावर अशा अधिकारांचा अहितकर प्रभाव पडतो असे आपणांस वाटते का ? तसे असेल तर अशा अहितकर प्रभावाचे स्वरूप आपण थोडक्यात नमूद करू शकाल का ?

(९) भारतीय स्वातंत्र्यानंतर उदयाला आलेल्या राष्ट्रीय एकात्मता, औद्योगिक विकास इत्यादींवर आधारित नव्या समाजरचनेच्या संदर्भात जुन्या रुढी, बलुतेदारी पद्धती, परंपरा, मानपान इत्यादी गोष्टी या आपल्या समाजाला उपयुक्त ठरणाऱ्या आहेत असे आपल्याला वाटते का ? जर तसे आपल्याला वाटत असेल तर मग यापैकी कोणत्या रुढी उपयुक्त म्हणून पुढे चालू ठेवाव्या असे वाटते ? आणि समाजाला नुकसान पोचवणाऱ्या कोणत्या रुढी बंद कराव्या असे तुम्हाला वाटते ?

(१०) अशा अधिकारांचे अस्तित्व आणि त्यांचा वापर हे भारताच्या संविधानाने हमी दिलेल्या मूलभूत अधिकारांशी सुसंगत आहे का आणि अशा अधिकारांना कालबाह्य आणि आपल्या राष्ट्राने ज्या प्रकारच्या समाजव्यवस्थेशी बांधीलकी स्वीकारली आहे त्या खुल्या समतावादी, समाजवादी आणि लोकशाही समाज-व्यवस्थेमध्ये अडचणीचे समजावे लागतील असे तुम्हाला वाटते का ? आणि वाटत असल्यास, कशा प्रकारे ?

(११) संपूर्ण समाजाला किंवा एखाद्या विशिष्ट सामाजिक व धार्मिक गटाला हानिप्रत ठरणाऱ्या या जुनाट रूढी व अधिकार (मानपान) (श्रेष्ठ/कनिष्ठ) इत्यादी काढून टाकण्याचे काम, शिक्षणाचा प्रसार, औद्योगिक व तंत्र वैज्ञानिक विकास, समाज सुधारणेच्या चळवळी अशांसारख्या सध्या चालू असलेल्या सामाजिक व आर्थिक शक्तींवर सोपवावे असे तुम्हाला वाटते का की, हे अधिकार नाहीसे करण्यासाठी वगैरे कायदा करण्याची आवश्यकता आहे ?

(१२) कायदा करण्याची आवश्यकता आहे असे मानले तर, ज्यामुळे या कायद्याचे उल्लंघन करण्याचा गुन्हा हा दखलपात्र गुन्हा मानला जाईल, अशा गुन्ह्यासाठी दंड, अपील करण्याची पद्धत, नुकसानभरपाई देणे किंवा न देणे, नुकसानभरपाईचे प्रमाण इत्यादींसाठी योग्य आणि सविस्तर अशी पद्धती तुम्ही सुचवू शकाल का ?

## परिशिष्ट 'ब'

### समितीने भेट दिलेली ठिकाणे

(१) नाशिक.
(२) सुरगाणा.
(३) पेठ .
(४) त्र्यंबकेश्वर.
(५) गुजरातच्या सरहद्दीवरील सातपुडा गाव.
(६) ठाणे.
(७) कोसवाड.
(८) तलासरी.
(९) भिवंडी.
(१०) मुंबादेवी, महालक्ष्मी, सिद्धीविनायक इत्यादींसारखी बृहन्मुंबईमधील विविध देवालये.
(११) पुणे.
(१२) जेजुरी.
(१३) सासवड.
(१४) आळंदी.
(१५) देहू .
(१६) चिंचवड.
(१७) खंडाळा.
(१८) सोलापूर.
(१९) पंढरपूर.
(२०) तुळजापूर.
(२१) औरंगाबाद.
(२२) खुलदाबाद.
(२३) अजंठा, वेरूळ.
(२४) घृष्णेश्वर.
(२५) अहमदनगर.
(२६) म्हैसमाळ.
(२७) शिर्डी.
(२८) गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे.
(२९) कोल्हापूर-महालक्ष्मी व अंबाबाई देवळे.
(३०) हातकणंगले.
(३१) ज्योतिबाचे देऊळ.
(३२) गोव्यामधील विविध देवळे.
(३३) दीव, दमण.

## परिशिष्ट 'क'

### श्री. टी. एस. भारदे यांची भिन्नमतपत्रिका

बऱ्याच उशिरा मला समितीवर नियुक्त करण्यात आले. या विषयावर मी अगोदरच एक टिप्पणी दिली होती आणि पुणे येथे भरलेल्या समितीच्या बैठकीत ती मान्यही करण्यात आली होती.

तयार केलेल्या अहवालाचा मसुदा पायाभूत मानून केलेल्या विविध सूचना विचारात घेण्याचेही ठरवण्यात आले होते. तसेच संबद्ध प्रकरणांचे मसुदे तयार करण्याचे काम काही सदस्यांकडे सोपवण्यात आले होते. तथापि, त्याचा पाठपुरावा करण्यात आला नाही. टीका म्हणून मी या गोष्टीचा उल्लेख करीत नाही. परंतु या अहवालावर मला सही करावयाची असल्याकारणाने मला या मुद्याचा उल्लेख करणे भाग आहे.

अहवालात समर्थपणे प्रस्तुत केलेल्या ऐतिहासिक व सामाजिक विश्लेषणासंबंधात मला काहीही म्हणावयाचे नाही. काही मुद्यासंबंधात मतभिन्नता असू शकते आणि म्हणून केवळ अहवालातील शिफारशीच्या भागावरच मला आपली मते व्यक्त करावयाची आहेत.

निष्कर्ष व शिफारशींच्या चौथ्या प्रकरणात काही शिफारशी करण्यात आल्या आहेत. ज्या परंपरागत अधिकारांमुळे काही विशिष्ट दर्जा किंवा विशेषाधिकार प्राप्त होतो आणि त्यामुळे समाजात भेदभाव निर्माण होतो ते कायद्याने नष्ट करण्यात यावेत आणि कोणत्याही व्यक्तीस जन्माच्या आधारावर कोणताही सामाजिक विशेषाधिकार उपभोगू देऊ नये. परंतु जेथे असा अधिकार किंवा विशेषाधिकार हा परंपरागत नसेल आणि जेथे स्थानिक प्राधिकारी, सार्वजनिक मंडळे किंवा सार्वजनिक विश्वस्त मंडळे अधिकारावरोबरच संबंधित व्यक्ती-बाबतचे एखादे काम किंवा एखादे कर्तव्य पार पाडतात, तेव्हा ती गोष्ट अगदीच वेगळी असते. आपला संपूर्ण भर हा ज्यामुळे असमता व शत्रुत्व निर्माण होते अशा परंपरागत गावकऱ्यांच्या अधिकारावर असला पाहिजे आणि अशा प्रकारचे सर्व मानपान किंवा अधिकार हे कायद्याने सरळ सरळ नष्ट करण्यात यावेत. परिच्छेद ४.२५ मध्ये असे म्हटले आहे की, 'ऐवजी' च्या प्रश्नाला महत्व देण्यात येऊ नये. मी या सूचनेशी पूर्णपणे सहमत आहे. परंतु पुढे असेही म्हटले आहे की, एकदा का अधिकार नष्ट झाले की, या प्रश्नावर लोक एकमताने काहीतरी ठरवतील आणि अन्य एखाद्या व्यक्तीला असमान देतील. मी याच्याशी सहमत नाही. यामुळे गुंतागुंत आणि गोंधळ निर्माण होईल. मला असे सुचवावेसे वाटते की, जेव्हा हे अधिकार नष्ट होतील तेव्हा स्थानिक सरकारी अधिकारी, सार्वजनिक कार्यक्रम सण किंवा मिरवणुकीच्या वेळी जसा कायदा व सुव्यवस्था सामान्यपणे राखतात, त्याप्रमाणेच कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने परिस्थिती अधिक चांगल्या प्रकारे हाताळू शकतील.

देवळांच्या संबंधातील शिफारशींच्या संबंधात (परिच्छेद ४.२९) समिती अशी शिफारस करते की, तुळजापूर, वैजनाथ यांसारख्या मोठमोठ्या देवळांसाठी सार्वजनिक विश्वस्त मंडळे नेमण्यात यावी. मला असे म्हणावयाचे आहे की, आतादेखील सार्वजनिक विश्वस्त मंडळे आहेतच. परंतु पुजारी व इतर लोक यांना मिळालेले परंपरागत अधिकार नष्ट करण्यासाठी, पंढरपूर मंदिर अधिनियमाच्या धर्तीवर अधिनियम करणे ही खरी गरज आहे.

लहान देवळांच्या संबंधातील समितीने केलेल्या शिफारशींविरुद्ध मी आहे. शिफारस अशी आहे की, लहान देवळांसाठी शासनाचा एक वेगळा विभाग असावा. मला वाटते की, अशा प्रकारची व्यवस्था ही देवळांच्या व पूजे-अर्चेच्या मूलभूत भावनेलाच मारक ठरेल. म्हणून सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाखाली काम करणारे भक्तगणांचे प्रातिनिधीक मंडळ नेमणे हाच उत्तम पर्यायी उपाय ठरेल.

टी. एस. भारदे.

पुणे, २१ एप्रिल १९८०.

## परिशिष्ट 'ड'

### श्री. के. शं. धोंडगे यांच्या बिनसरकारी विधेयकाची प्रत

**१९७३ चे विधानसभा विधेयक क्रमांक तीन—विशिष्ट वंशपरंपरागत आणि रूढिगत अधिकार नष्ट करण्याची तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात असलेले विशिष्ट वंशपरंपरागत आणि रूढिगत अधिकार नष्ट करणे आणि यात यानंतर उपस्थित होणाऱ्या विशिष्ट परिणामरूप व आनुषंगिक बाबींची तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चोविसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे—

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ.**—(१) या अधिनियमास महाराष्ट्र वंशपरंपरागत आणि रूढिगत अधिकार नष्ट करण्याबाबत अधिनियम, १९७३ असे म्हणता येईल.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो तावडतोब अंमलात येईल.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—'अनुसूची' म्हणजे या अधिनियमासोबत जोडलेली अनुसूची.

३. **वंशपरंपरागत आणि रूढिगत अधिकार नष्ट करणे.**—कोणताही कायदा, रूढि किंवा प्रथा यात एतद्विरुद्ध काहीही असले तरी, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले वंशपरंपरागत आणि रूढिगत अधिकार नष्ट करण्यात येतील.

४. **अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याची राज्य शासनाची शक्ती.**—राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूचीमध्ये कोणत्याही वंशपरंपरागत आणि रूढिगत अधिकारांची भर घालता येईल आणि अशा अधिसूचनेवरून, तदनुसार अनुसूचीमध्ये सुधारणा करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.

५. **अपराधांसाठी शास्ती.**—या अधिनियमाचे उल्लंघन करून, जो कोणी, या अधिनियमाद्वारे नष्ट करण्यात आलेले कोणतेही वंशपरंपरागत आणि रूढिगत अधिकार अंमलात आणील किंवा त्यांच्या अंमलबजावणीस प्रोत्साहन देईल त्यास, दोषसिद्धीनंतर, जास्तीत जास्त एक वर्ष कारावासाची आणि कमाल पाचशे रुपयांपर्यंत दंडाचीसुद्धा शिक्षा होईल.

६. **या अधिनियमाखालील अपराध दखली असणे.**—या अधिनियमाखालील अपराध दखली अपराध असतील.

७. **मालमत्तेचा अधिकार नष्ट करण्याबद्दल भरपाई देणे.**—कलम ३ खालील कोणत्याही अधिकाराच्या परिणामी, जिची मालमत्ता हिरावून घेतली गेली असेल अशी कोणतीही व्यक्ती, असा अधिकार ज्या तारखेस नष्ट करण्यात आला असेल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या तीन वर्षांमध्ये अशा व्यक्तीस पैशाच्या किंवा वस्तूच्या रूपात त्या मालमत्तेपासून मिळालेल्या एकूण उत्पन्नाच्या रोख मूल्याच्या सहापटींएवढी भरपाई मिळण्यास हक्कदार असेल, असे रोख मूल्य विहित रीतीने ठरवण्यात येईल.

८. **भरपाई देण्याची पद्धती.**—(१) कलम ७ अन्वये भरपाईची हक्कदार असलेल्या व्यक्तीस, विहित कालावधीत, विहित नमुन्यात भरपाईसाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला अर्ज मिळाल्यावर, जिल्हाधिकारी, विहित रीतसर चौकशी केल्यानंतर, विहित रीतीने भरपाई निर्धारित करणारा निर्णय देईल.

(३) पोट-कलम (२) खालील प्रत्येक निर्णय, जिल्हाधिकाऱ्याच्या सहीनिशी लेखी असेल आणि उक्त रक्कम देण्याच्या कारणांसह दिलेली रक्कम त्यात विनिर्दिष्ट केलेली असेल.

९. **जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध अपील.**—जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल.

१०. **महसूल न्यायाधिकरणापुढील कार्यपद्धती.**—अपीलदारास आणि राज्य शासनास नोटीस दिल्यानंतर, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, अपिलावर निर्णय देईल आणि आपल्या निर्णयाची नोंद करील.

(२) या अधिनियमान्वये अपिलावर निर्णय देताना, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ अन्वये मूळ न्यायालयाच्या डिक्रीवरील किंवा आदेशावरील अपिलांचा निर्णय देताना न्यायालय ज्या शक्तींचा वापर करते व जी कार्यपद्धती अनुसरते त्या सर्व शक्तींचा वापर करील आणि तीच कार्यपद्धती अनुसरील.

**११. मर्यादा.**—या अधिनियमान्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे करण्यात आलेले प्रत्येक अपील हे जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत दाखल करण्यात येईल. मर्यादा अधिनियम, १९६३ याची कलमे ४, ५, १२ आणि १४ यांचे उपबंध असे अपील दाखल करण्यास लागू होतील.

**१२. न्यायालय शुल्क.**—न्यायालय शुल्क अधिनियम, १८७० मध्ये काहीही असले तरी, या अधिनियमान्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे करण्यात येणाऱ्या प्रत्येक अपिलावर, विहित करण्यात येईल अशा किंमतीचा न्यायालय शुल्क मुद्रांक असेल.

**१३. महसूल न्यायाधिकरणाचा निवाडा व निर्णय अंतिम असणे.**—महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे अपिलाच्या अधीन, जिल्हाधिकाऱ्याने केलेला निवाडा आणि अपिलावरील महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम आणि निर्णायक असेल आणि कोणत्याही न्यायालयात, कोणत्याही दाव्याच्या किंवा कार्यवाहीत त्यास आव्हान देता येणार नाही.

**१४. चौकशी आणि कार्यवाही ही न्यायिक कार्यवाही असणे.**—या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यापुढील आणि महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढील सर्व चौकशी आणि कार्यवाही भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ आणि २२८ यांच्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही असल्याचे समजण्यात येईल.

**१५. नियम.**—(१) या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसलेले नियम राज्य शासनास करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी उपबंधांच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता अशा नियमाद्वारे, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :—

(एक) कलम ७ अन्वये, ज्या रीतीने रोख मूल्य ठरवता येईल ती कार्यपद्धती;

(दोन) कलम ८ च्या पोट-कलम (१) अन्वये, ज्या नमुन्यात आणि ज्या मुदतीच्या आत भरपाईसाठी अर्ज करता येईल तो नमुना व ती मुदत;

(तीन) कलम ८ च्या पोट-कलम (२) अन्वये ज्या रीतीने चौकशी करण्यात येईल आणि भरपाई निर्धारित करण्यात येईल ती रीत;

(चार) कलम १२ अन्वये, अपिलास चिकटवावयाच्या न्यायालय शुल्क मुद्रांकाचे मूल्य.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन असतील.

ह्या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिति अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येतील किंवा येणार नाहीत. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## अनुसूची

(कलम २ पहा)

### परंपरागत व रूढीगत अधिकार

| अनुक्रमांक | अधिकाराचे नाव | शेरा, (काही असल्यास) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |

(१) सणांच्या दिवशी मारुतीच्या मूर्तीला शेंदूर लावण्याचा अग्रमान मिळण्याचा अधिकार तसेच पूजा करण्याचा अग्रमान.

(२) कामाई देवीपुढे "डाक" (Dak) वाजवण्याचा अधिकार.

(३) जोगिणीचा ओटीचा अधिकार.

(४) धार्मिक उत्सवाच्या वेळी "दहीहंडी" फोडण्याचा व पालखीमधून मिरवण्याचा अधिकार.

(५) गावातील बारा बलुतेदारांचा मानपान.

(६) दर्गा, ताजवा (तावूत), संदल इ. वेळी सवारीत उजव्या बाजूची जागा व तेल मिळण्याचा अधिकार तसेच बालाजीची काठी, महादेवाची काठी व खंडोबाची पालखी आणि ज्योतिबाची पालखी यांच्या पूजेचा अग्रमान.

(७) देवापुढे ठेवलेल्या वस्तू घेण्याचा देवस्थानांच्या पुजाऱ्यांचा अधिकार तसेच त्यांचा देवळाच्या स्थावर, जंगम मालमत्तेचा उपभोग घेण्याचा अधिकार.

(८) उत्सवाच्या दिवशी तोरण तोडण्याचा आणि बैलगाड्यांची/रथांची मिरवणूक काढण्याचा अधिकार.

(९) महाकाली[illegible] मान कडक लक्ष्मीचा मान व जोखमार मान.

(१०) फास[illegible] पांढरीचा मान, मानधन, मानाची सुपारी व मानाचा शिधा, या नावाने ओळखले [illegible]गारे अधिकार.

(११) मा[illegible]कऱ्याच्या घरी वाजंत्री लावून तुळशीचे लग्न प्रथम मानकरी भटाच्या घरी लावण्याचा अधिकार.

(१२) दसरा, दिवाळी, शिमगा व पाडवा या दिवशी मानकऱ्याच्या घरापुढे "वाजंत्री" वाजवण्यास भाग पाडण्याचा अधिकार.

(१३) पंढरपूर, शिंगणापूर, तुळजापूर, ज्योतिबा, वैजनाथ, खंडोबा व इतर ठिकाणच्या देवळांच्या उत्पन्नावरील पुजाऱ्याचा व मानकऱ्यांचा वंशपरंपरागत अधिकार.

(१४) लग्नामध्ये शेवंती समारंभाच्या वेळी मारुतीला वाहिलेले फेटयाचे कापड (शेला) घेण्याचा अधिकार.

(१५) लग्न समारंभाच्या वेळी "टिळा" व "सुपारी" प्रथम मिळण्याचा अधिकार.

(१६) गुढी पाडव्याच्या दिवशी "परात" (Parat) वाचण्याचा व कडुनिंबाचा रस पिण्याचा अग्रमान.

(१७) हनुमान जयंतीच्या उत्सवाच्या दिवशी वाजत गाजत देवाला शेंदूर लावण्याचा तसेच भंडारा घालण्याचा (अन्न शिजवणे व ते भाविकांना वाटणे) अग्रमान.

(१८) शिराळशेट भुलोबाच्या मूर्तिची पूजा करण्याचा व तिची मिरवणूक काढण्याचा अग्रमान.

(१९) पोळयाच्या दिवशी वाजत गाजत बैलांची मिरवणूक काढण्याचा व तोरण तोडण्याचा अग्रमान.

(२०) दसऱ्याच्या दिवशी वाजत गाजत "शमी" व आपटयांच्या झाडांची पूजा करण्याचा तसेच बळी देण्याचा व चावडीवर किंवा किल्ल्यावर झेंडा लावण्याचा अग्रमान.

(२१) दिवाळीच्या दिवशी शेंदूर लावण्याचा अग्रमान.

(२२) होळीच्या दिवशी वाजत गाजत होळी पेटवण्याचा व त्या सणाच्या दिवशीचे इतर विधी पार पाडण्याचा अग्रमान.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

ग्रामीण महाराष्ट्रात पोळ्याच्या दिवशी बैलांची मिरवणूक काढण्याचा, मारुतीला शेंदूर लावण्याचा अग्रमान तसेच गुढीपाडवा इत्यादी सारख्या काही विशिष्ट सणांच्या दिवशी अग्रमान मिळण्याचा अधिकार यांसारखे अनेक परंपरागत व रुढीगत अधिकार अद्यापही प्रचलित आहेत. मानकऱ्यांचे हे अधिकार न्यायालयासही मान्य आहेत. जर एखाद्याने त्याच्या अधिकाराची पायमल्ली केली तर एकतर न्यायालय तात्पुरती किंवा कायमची निषेधाज्ञा देते किंवा मानकऱ्यांच्या बाजूने निर्णय देते. संविधानाने हमी दिलेल्या समानतेच्या मूलभूत अधिकाराशी हे अधिकार व रुढी विसंगत आहेत व ते समाजाच्या सध्याच्या समाजवादी पद्धतीत कालबाह्य ठरतात. याशिवाय हे अधिकार मुळातच सामान्य कायद्यात अपवादभूत आहेत आणि त्यामुळे सामाजिक भेदभाव निर्माण होतो व ग्रामीण जनतेमध्ये गैरव्यवस्था व बेबनाव निर्माण होतो. आणि म्हणून हे अधिकार तात्काळ नष्ट करणे अत्यावश्यक आहे, हा उद्देश साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

के. शं. धोंडगे,
प्रभारी सदस्य.

मुंबई, दिनांक ९ फेब्रुवारी, १९७३.

## प्रत्यायोजित विधिविधानांचे ज्ञापन

विधेयकाच्या खंड १५ द्वारे राज्य शासनास अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करण्याच्या शक्ती प्रदान केल्या आहेत, ज्या विविध बाबींच्या संबंधात असे नियम करावे लागतील त्याबाबी तसेच रोख किंमत ठरवण्याची पद्धत, ज्या नमुन्यात व मुदतीत अर्ज केला पाहिजे तो नमुना व मुदत, चौकशीची पद्धत व नुकसानभरपाई अपिलासोबत जोडण्याचे न्यायालय फी मुद्रांक इत्यादी गोष्टी त्या खंडाच्या पोटखंड (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्या आहेत. या तपशील व कार्यपद्धतीच्या बाबींसंबंधात मूळ अधिनियमात तरतूद करणे कठीण व अडचणीचे आहे. वैधानिक अधिकार प्रदान करणे हे नित्याचे चाकोरीतील काम आहे.

# परिशिष्ट 'ई'

## १९६८ चे वादविवाद (मूळ मराठी)

**श्रीयुत के. शं. धोंडगे, विधानसभा सदस्य, कंधार**

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात घटनेच्या विरुद्ध काही प्रथा आहेत. अनेक रूढी आहेत. अनेक अनिष्ट विधी आहेत. या सगळ्या रूढी, प्रथा, विधी तात्काळ नष्ट करून टाकाव्यात. काही रूढी अशा असतात की, त्या नष्ट करण्यासाठी शिक्षणाची गरज असते. परंतु ज्या रूढी वाईट आहेत त्यांना शासन मान्यता देते एवढेच नव्हे तर जनतेने लोकजागृती करून त्याविरुद्ध उभे राहण्याचा प्रयत्न केला, मानवी हक्कांविरुद्ध असलेली ही परंपरा सोडण्याच्या दृष्टीने बंड करण्याचा प्रयत्न केला तर, त्यांना संरक्षण मिळत नाही. उलट ज्यांचा मान असतो त्यांच्या मानाचे संरक्षण करण्यासाठी पोलीस फौज त्यांच्या तैनातीला जाते. या मानकऱ्यांविरुद्ध बंड केले तर ते कोर्टात जातात व इंजंक्शन आणतात, मनाईहुकूम आणतात. लोकशाहीचा खून करणाऱ्या, मानवा-मानवामध्ये फरक करणाऱ्या या सरकारमान्य रूढी आहेत, परंपरा आहेत. अशा रूढीना, परंपरांना तिलांजली का देण्यात येत नाही असा माझा या शासनाला सवाल आहे. या वतनदारी रूढीमुळे अनेक पिढ्या बरबाद झाल्या आहेत. तेव्हा या रूढी, प्रथा शासनाने मोडल्याच पाहिजेत. त्यासाठी कायदेच केले पाहिजेत. कायद्याने कुलकर्ण्यांची वतने नष्ट केली, जहागिऱ्या नष्ट केल्या, निझामशाही नष्ट केली, पण कायद्याला आव्हान देणारा, लोकशाहीच्या मूल्यांना आव्हान देणारा असा जो मूठभर वतनदारवर्ग आहे तो मात्र आजही जिवंत आहे.

मानवी हक्कांच्या सनदेमध्ये असे म्हटले आहे की,—सर्व मानवप्राणी जन्मत: स्वतंत्र आहेत आणि त्यांची प्रतिष्ठा व हक्क समान आहेत. तिसरा विश्वास म्हणजे सर्व स्त्री आणि पुरुष हे वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, मतप्रणाली, मूळ राष्ट्र किंवा मूळ समाज, संपत्ती, जन्म किंवा दर्जा या सर्व बाबतींत प्रतिष्ठेच्या दृष्टीने व कायद्यापुढे समान असतील.

वाटल्यास शासनाने या प्रश्नावर एखादी समिती नेमावी. नुकसानभरपाई द्यावी किंवा नाही व किती, काय द्यावी, कोणत्या रूपाने द्यावी हे शासनाने ठरवावे. या सर्व गोष्टी झाल्यानंतर हे विधेयक निवड समितीकडे पाठवावे. जर शासनाच्या वतीने विधेयक प्रस्तुत केले जात असेल तर ते अधिक चांगले होईल.

खेडेगावामध्ये या रूढींचा फार मोठा परिणाम होत आहे. या सर्व रूढींमुळे किती खून झाले असतील याचा अंदाज करणे कठीण आहे. या रूढीमुळे आणखी प्रचंड मारामाऱ्या होत आहेत व गावात लोकांच्या दोन प्रसंगी तीन फळ्या निर्माण होत आहेत. या सर्व गोष्टींची दखल सरकारने घेतली पाहिजे. या रूढी कायद्याने बंद केल्यास त्यासाठी कोणतीही नुकसानभरपाई देण्याची गरज नाही. ज्या जुन्या रूढी समाजाला हितकारक आहेत त्यांच्याविषयी आम्हांला काहीच म्हणावयाचे नाही. परंतु विषमता निर्माण करणाऱ्या अनिष्ट रूढीना मात्र तावडतोब बंदी केली पाहिजे.

**श्री. एम. आर. घाटे, विधानसभा सदस्य, देगलूर.**

माझ्या स्वतःच्या मतदारसंघात, पोळयाच्या दिवशी मी अशा किती तरी मानवतेला लाज आणणाऱ्या घटनांचा अनुभव घेतला आहे. या घटना भारतीय संस्कृतीशी किंवा मानवतेशी संपूर्णपणे विसंगत आहेत. त्या समाजावरील एक कलंक आहेत. अशा अनिष्ट रूढी या केवळ कायद्याच्या बडग्याने नष्ट होणार नाहीत तर त्यांसाठी संपूर्ण सामाजिक क्रांतीच होणे जरूर आहे. उदाहरणार्थ, आपल्याकडे दारूबंदीचा कायदा आहे. जरी राज्य शासनाने हा कायदा पास केला असला तरी जनतेच्या सहकार्याच्या अभावी, दारूबंदीच्या धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करता आली नाही. म्हणून हा प्रश्न आपल्याला सामाजिक क्रांतीच्या मार्गानेच सोडवला पाहिजे आणि त्यासाठी समाजाला शिक्षण दिले पाहिजे.

**श्री. टी. एम. सावंत, विधानसभा सदस्य, गंगाखेड**

जोपर्यंत सामाजिक क्रांती होत नाही तोपर्यंत कायदा करण्याचा काहीही उपयोग नाही. बरेचसे मानपान आज प्रचलित आहेत ते केवळ कायदा केल्याने नष्ट होणार नाहीत. बऱ्याचशा ठिकाणी, मंदिरे ही आता दान-निधीची मालमत्ता म्हणून जाहीर करण्यात आली आहेत. कोणत्याही जातीच्या किंवा वंशाच्या स्त्रीला किंवा पुरुषाला अशा मंदिरात प्रवेश करण्यास मनाई नाही. मानपानामुळे दोन निरनिराळ्या गटांमध्ये जे तंटे होतात ते त्या दोन गटांत असलेल्या वैमनस्यामुळे होत असतात आणि सामाजिक शिक्षणाशिवाय ते थांबवता येणार नाहीत.

**श्री. बी. एम. भारस्कर, समाजकल्याण मंत्री**

रूढींच्या संबंधात येथे सांगण्यात आलेल्या प्रसंगांपैकी काही प्रसंग मी स्वत:देखील अनुभवले आहेत. या अनिष्ट रूढी नष्ट करण्यासाठी जरी आपण कायदा केला तरी त्या [illegible]ष्ट होणार नाहीत. परंतु अशाही काही रूढी आहेत की, त्या आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये मोलाची भर [illegible]त आहेत आणि म्हणून त्यांचे संरक्षण होणे जरूर आहे. शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच अनिष्ट प्रथा आपोआपच [illegible] होत आहेत आणि त्याकरता कायदा करण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. या संदर्भात मी पुढीलप्रमाणे निवेदन करू इच्छितो :—

"प्रस्तावित विधेयकाच्या शेड्युलमध्ये नमूद केलेले हक्क यांचा संबंध खेड्यात अस्तित्वात असलेल्या धार्मिक स्वरूपाच्या रूढींशी आहे. त्यापैकी पुष्कळसे हक्क मोगल व मराठे राज्यकर्त्यांच्या काळापासून देण्यात आलेले आहेत व ते इंग्रज सरकारनेदेखील चालू ठेवलेत. हे सर्व आता वतन अॅबॉलिशन अॅक्ट-खाली नाहीसे करण्यात आलेत. तसेच देवस्थान इनाम सोडून आता कोणतेही इनाम अस्तित्वात नाही. घटनेच्या कलम १४ खाली या जुन्या रूढींना वाव राहिलेला नाही. सदर विधेयकात नमूद केलेले हक्क हे वंशपरंपरागत आहेत आणि कोणत्याही व्यक्तीला कोणताही हक्क मिळत नाही. एखाद्या विशिष्ट भागात अस्तित्वात असलेल्या एखाद्या विवक्षित वंशपरंपरागत रूढीला त्या भागातील लोकांचीच मंजुरी असते आणि असे हक्क एका विशिष्ट प्रसंगासाठीच असतात. ते नेहमीकरता अस्तित्वात राहात नाहीत. सध्या अस्तित्वात असलेल्या रूढी घटनेविरुद्ध नाहीत व या अधिकारात कोणताही भेदभाव होत नाही. खेड्यातील लोक हे सामान्यत: जुन्या विचारांचे असतात. त्यांच्यावर कोणतीही नैसर्गिक आपत्ती आली तर ती देवाची करणी आहे असा त्यांचा विश्वास असतो. अशा परिस्थितीत सरकारने यात हस्तक्षेप केला तर लोकांची मने दुखावतील आणि सणाच्या दिवशी ते कदाचित प्रक्षुब्धही होतील. अशा प्रकारे सरकारी हस्तक्षेपामुळे फायदा होण्याऐवजी नुकसानच होण्याचा संभव असून तसे करणे योग्य ठरणार नाही. सामाजिक सुधारणा या सामान्यत: कायद्याने घडवून आणण्यापेक्षा शिक्षणाचा प्रसार करून करावयाच्या असतात. खरे पाहिले असता त्यापैकी बहुतेक रूढी आता नाहीशा होत आहेत. म्हणून त्या जर संपूर्णपणे नाहीशा करावयाच्या असतील तर शिक्षणाचा जास्तीत जास्त प्रसार करणे हाच एक उपाय आहे. समाजसुधारक किंवा लोकप्रतिनिधी यांच्याकडून हे काम योग्य रीतीने होऊ शकेल. म्हणून माननीय सभासदांस मी विनंती करतो की, त्यांनी हा ठराव मागे घ्यावा. माननीय सभासदांस विधेयक मागे घेण्यास सांगत असतानाच मी त्यांना हेही सांगू इच्छितो की, या सन्माननीय सभागृहाचे नेते माननीय श्री. वसंतराव नाईक यांच्या कानावर मी ही गोष्ट घालीन."

## १९६९—चर्चा (मूळ मराठी)

**श्री. के. शं. धोंडगे**

सन्माननीय अध्यक्ष महाराज, या विधेयकाच्या निमित्ताने मी आपल्यापुढे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करीत आहे. या राज्याच्या निरनिराळ्या ग्रामीण भागात सध्या अस्तित्वात असलेल्या वंशपरंपरागत रूढींचा निर्देश या विधेयकात केला आहे. आजचे युग हे लोकशाहीचे युग असले आणि मानव चंद्रावर स्वारी करावयास जात असला आणि त्यात तो यशस्वी होऊन परतला असला तरी या महाराष्ट्रात एक माणूस दुसऱ्या माणसापेक्षा श्रेष्ठ समजला जातो. खेडोपाडी पाटील, वतनदार हे अद्यापही विद्यमान वंशपरंपरागत रूढींचे जतन करतात. खरे तर कायद्यापुढे सर्वजण समान आहेत, आणि वतने, जहागिऱ्या आणि सरंजामशाही यांना जरी मूठमाती देण्यात आली असली आणि त्यांचे खास हक्क काढून घेण्यात आलेले असले तरीही महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्या-मध्ये वंशपरंपरागत रूढींच्या नावाखाली काही 'मानपान' आजही अस्तित्वात आहेत आणि वरिष्ठ वर्ग त्यांचा उपभोग घेत आहे. कायदा हा सध्या मानकऱ्यांची बाजू घेतो. पोलीसदेखील मानकऱ्यांची बाजू घेतात. कधी कधी महाराष्ट्र हे एक पुरोगामी राज्य आहे असा आपण दावा करतो आणि असे असले तरीही ज्या रूढींना घटनेत स्थान नाही अशा काही रूढींचा उपभोग काही स्वत:ला इतरांपेक्षा श्रेष्ठ वर्गातील समजणारे वतनदार घेतात आणि त्यामुळे जे दु:खित आयुष्य कंठीत आहेत अशा इतर खेडुतांच्या मनात न्यूनगंडाची भावना निर्माण होते. कायदा श्रेष्ठता किंवा कनिष्ठता जाणत नाही. कायद्यापुढे सर्वजणच समान आहेत आणि या संदर्भात मानपानाची प्रथा ही अतिशय आक्षेपार्ह असून शासनाने त्याचा तपास करणे जरूर आहे. जर अशा रूढींविरुद्ध किंवा मानपानाविरुद्ध कोणी आक्षेप घेतला तर मानकरी न्यायालयाकडून मनाई हुकूम आणतात आणि त्यांचे मानपान शाबूत राहतात. म्हणून असे मानपान रद्द करणारा कायदा करण्याची शासनाला भीती का वाटावी असा माझा प्रश्न आहे. जर आम्ही स्वत:ला खरोखरीच पुरोगामी मानत असलो तर, हे अनिष्ट मानपान आपल्याला तातडीने बंद करता आले पाहिजेत. माणसा माणसामध्ये भेदभाव केला जाता कामा नये.

**श्री. पी. आर. सानप (माणगाव)**

आपल्या समाजामध्ये पिढयांनपिढया चालत आलेल्या अनेक रूढी सुधारण्याची, त्यांची फेरपाहणी करण्याची आणि प्रसंगी त्या रद्द करण्याचीदेखील आवश्यकता आहे. आपल्या समाजामध्ये, राज्यामधील बऱ्याचशा मानकऱ्यांची, आपले मानपान सुरक्षित रहावेत अशी इच्छा असते आणि विशेषत: देवळांच्या संदर्भात तर हे अधिकच खरे आहे. यामुळे अहंगंड किंवा न्यूनगंड निर्माण होतो आणि परिणामी असंतोष निर्माण होतो व शेवटी त्यामुळे भांडणे होतात. एखादा मानकरी कनिष्ठ जमातीमधील असला तरी, त्याचा विशिष्ट 'मान' (अधिकार) दुसऱ्या कुणाला वापरता येत नाही आणि एखाद्याने त्याचा अधिकार किंवा मानपान वापरण्याचा प्रयत्न केलाच तर लोक अशा व्यक्तीवर बहिष्कार टाकतात. जर एखाद्या मंत्र्याला विठोबाची पूजा करावी असे वाटले, तरी मी त्याला असे सांगेन की, विठोबाची पूजा करण्याचा त्याला अधिकार नाही, कारण, त्या विशिष्ट देवस्थानाच्या पुजाऱ्याचा तो अधिकार असतो. पूजा करायला आपण कितीही उत्सुक असलो तरी आपल्याला पूजा करता येत नाही. देवस्थानामध्येही दलाल असतात आणि या दलालांच्या मदतीशिवाय जणू काय आपली प्रार्थना देव/देवीपर्यंत पोचतच नाही, ही वस्तुस्थिती आहे. आपल्या शासनाने आणि प्रशासकांनी निधर्मीपणाचे धोरण स्वीकारले आहे आणि त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु अशा पुरोहित दलालांची दंडेली बंद करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. काही विशिष्ट कुटुंबात तेराव्याला लोकांना भोजनास बोलाविले जाते. फक्त त्या कुटुंबांच्या नातेवाईकांनीच अशा भोजनास उपस्थित राहावयाचे असते. इतरांनी नव्हे. हीच परिस्थिती इतर रुढींबाबतही आहे. जर वतनदारी, इनामदारी, जहागिरी नष्ट करण्यात आली, तर मग सर्व कायद्यापुढे माणसांना समान मानले पाहिजे. अशी विषमता किंवा मानपानाची प्रथा चालू राहणे हे समाजाला आव्हान आहे. म्हणून, या अनिष्ट प्रथा कायदा करून नष्ट कराव्या अशी मी विनंती करतो. सामाजिक परिवर्तनवाद्यांनी श्री. धोंडगे यांचे हे विधेयक स्वीकारावे व जर हे मान्य नसेल तर शासनाने स्वत: असे विधेयक सादर करावे आणि आम्ही त्याला पाठिंबा देऊ.

**श्री. के. एन. घाटगे (वडगाव)**

अध्यक्ष महाराज, आज आपण हे पाहतो की, आपली शिकलेली तरुण पिढी या मानपानांची पर्वा करीत नाही. परंतु, भारतीय संविधानाशी विसंगत असलेल्या आणि माणसामाणसात भेदभाव निर्माण करणाऱ्या वंशपरंपरागत रुढी शासनाने लक्षपूर्वक तपासल्या पाहिजेत आणि त्यांतील नको असलेल्या रूढी कायद्याची मदत घेऊन तावडतोब बंद करण्यात आल्या पाहिजेत. जेव्हा विद्यमान प्रथांचा लोक मोठ्या प्रमाणावर गैरफायदा उठवतात, तेव्हा या बेकायदेशीर प्रकारांना पायबंद घालण्यासाठी शासनाने कायदा केलाच पाहिजे. शासन ही गोष्ट मान्य करील अशी आशा आहे.

**श्री. शिवाजीराव भाऊराव पाटील (निलंगा)**

श्री. धोंडगे यांच्या प्रस्तुत विधेयकावर आतापर्यंत मांडलेल्या मतांशी मी सर्वसाधारणपणे सहमत आहे. अशा तऱ्हेच्या प्रथा फक्त मराठवाड्यातच पाळल्या जातात असे नव्हे तर पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातही त्या पाळल्या जातात. अशा रूढी, मानपान या समाजातील तंट्याचे कारण ठरतात आणि कित्येक वेळा त्यांतून कोर्ट-खटले उद्‌भवतात. यापूर्वी श्री. धोंडगे यांनी याच विषयावर दोन प्रस्ताव आणले होते. मीही या विषयावर पूर्वी एक प्रस्ताव मांडला होता पण त्यावर विचार झाला नाही. म्हणून या विधेयकावर परिपूर्ण विचार होणे आवश्यक आहे ; आपण लोकशाहीचे अनुयायी असल्यामुळे अशा खास अधिकारांचे आपण उच्चाटन केले पाहिजे.

## १९७१—चर्चा

**श्री. के. शं. धोंडगे**

सध्या वतनदार कायद्याचे संरक्षण मिळवून मानपानाच्या नावाखाली आपले वंशपरंपरागत अधिकार सक्तीने शाबूत ठेवण्याचा प्रयत्न करतात.

जे स्वत:ला सामान्यलोकांपेक्षा श्रेष्ठ समजतात व अशा अधिकारांवर हक्क सांगतात अशा लोकांचे हक्क केवळ शासनच मान्य करते असे नव्हे तर न्यायालयांकडूनदेखील त्यांना संरक्षण मिळते. समाजातील ही विषमता ग्रामीण भागात प्रकर्षाने जाणवते आणि या आधुनिक काळात ती आक्षेपार्ह आहे.

खरे पाहता, या गरीब, दलित लोकांवरील अन्याय दूर करून त्यांना मानाने जगता येईल असा प्रयत्न करण्यातच खरी प्रतिष्ठा आहे. अशा लोकांकरता मी स्वत:चे आयुष्य वेचण्यास तयार आहे.

ही असमानता किंवा विषमता हा ग्रामीण जीवनाला जडलेला कर्करोगच आहे. हा रोग समाजातील विषमता वाढवतो आणि मानवा-मानवाला परस्परापासून दूर लोटतो. जर या रोगालाच कायद्याची मान्यता असेल तर त्या गोष्टीस ताबडतोब आळा बसला पाहिजे.

नाडकर्णी आयोगाच्या प्रश्नावर दिलेल्या उत्तरात सन्माननीय वित्त मंत्र्यांनी असे म्हटले होते की, पंढरपूरच्या विठ्ठलाला मुक्ती मिळाली पाहिजे. परंतु नाडकर्णी आयोगाच्या अहवालाची अंमलबजावणी शासन कशा रीतीने करणार आहे? पंढरपूरच्या बडव्यांना (पुजाऱ्यांना) काही अधिकार व मानपान देण्यात आलेले आहेत, जर हे अधिकार नष्ट करावयाचे असतील आणि नाडकर्णी आयोगाचा अहवाल स्वीकारावयाचा असेल तर कायद्यात बदल किंवा सुधारणा करावी लागेल. कारण त्याशिवाय या पुजाऱ्यांचे वंशपरंपरागत अधिकार नाहीसे करता यावयाचे नाहीत. नाडकर्णी आयोगाच्या अहवालाची अंमलबजावणी करता येणार नाही आणि विठ्ठलदेवास कधीच मुक्ती मिळणार नाही. म्हणून मी अशी विनंती करीत आहे की, याचवेळी समाजातील हजारो लहान लहान विठ्ठल व पददलित लोक यांनाही मुक्ती द्यावी आणि मानपानाच्या गुलामगिरीतून त्यांची सुटका करावी.

**श्री. व्ही. जी. प्रभुगांवकर**

राजकीय बदल घडून आला परंतु सामाजिक बदल घडून येत नाही, हे भारताचे वैशिष्ट्यच आहे. माननीय रॉय यांनी असे म्हटले आहे की, राजकीय सुधारणा घडून येण्यापूर्वीच जर सामाजिक सुधारणा झाली नाही तर या दोन्ही सुधारणा निष्फळ ठरतील. कोणतीही सामाजिक सुधारणा घडून न आल्या कारणाने आपल्याला आपल्या अपेक्षेप्रमाणे सामाजिक विकासाची फळे मिळत नाहीत याचे कारण असे की, समाजाच्या सर्वसामान्य वर्गांमधून नेतृत्व उदयास येत नाही, तर फक्त वतनदार वर्गालाच नेतृत्वाचे श्रेय मिळते. घटनेने आम्हांला समानतेच्या अधिकाराची हमी दिलेली आहे. मी राजकीय किंवा आर्थिक समतेबद्दल बोलत नाही तर सामाजिक समतेबद्दल बोलतो आहे. आणि सामाजिक समता स्थापन झालेली आहे हे पाहणे आपले कर्तव्य आहे. श्री. धोंडगे यांनी विधानसभेपुढे मांडलेले विधेयक हे अत्यंत लहान व त्रोटक आहे. रशियन व फ्रेंच राज्यक्रांतीच्या अनुभवाच्या आधारे या प्रश्नाकडे पाहिले तर, हे अधिकार नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणालाही ते सहजासहजी नष्ट करता येणार नाहीत. जसजसा समाज सुशिक्षित होईल तसतसे हे परंपरागत अधिकार दीर्घ काळाने नष्ट होतील. परंतु, या कामासाठी शासनाला विवक्षित विभागाचा पाठिंबा मिळाल्यास हे काम सुलभ होईल. प्रस्तुत विधेयक अत्यंत संक्षिप्त असल्याकारणाने अपुरे आहे. विधेयकाच्या कलम ४ मधील अधिकार नष्ट करावे असे श्री. धोंडगे यांनी म्हटले आहे. परंतु प्रश्न असा आहे की, हे अधिकार सहजासहजी नष्ट करता येणार नाहीत. या प्रयोजनासाठी विधेयकात पुष्कळशा दुरुस्त्या केल्या पाहिजेत. तसेच सदर विधेयकातील प्रस्तावित तरतुदींनुसार हे अधिकार नष्ट करण्यामुळे निर्माण होणारी पोकळी कशी भरून काढायची याचासुद्धा आपणांस विचार करावा लागेल. हे केले नाही तर भावी काळात अनेक समस्या निर्माण होतील. म्हणून त्यांच्यासाठी काही अन्य पर्याय असले पाहिजेत. हे विधेयक उचित आहे हे निःसंशय. तथापि, या प्रश्नाचा काळजीपूर्वक आणि साकल्याने अभ्यास करून एखादे व्यापक विधेयक मांडले तर ते अधिक चांगले होईल.

**श्री. सी. एन. पाटील**

सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक कायदे आहेत. त्यांच्यासंबंधात काय परिस्थिती आहे ते आपण जाणताच. आपण एकपत्नीत्वाचा कायदा केला. शारदा अधिनियम इत्यादींसारखे कायदे केले. परंतु, त्यांचे काय झाले तेही आपणास माहीत आहे. म्हणूनच, माझे मत असे की, असे प्रश्न सामाजिक सुधारणांनीच सोडवले पाहिजेत, कायदे करून नव्हे, श्री. धोंडगे यांच्या विचारांशी मी सहमत आहे. या देशामध्ये केवळ असे अधिकार नष्ट करून भागणार नाही तर या प्रयोजनासाठी सामाजिक सुधारणा होणे आवश्यक आहे. सर्व जाती-जमातींच्या आणि धर्मांच्या लोकांसाठी जोवर आपण एकच नागरी कायदा लागू करू शकत नाही तोपर्यंत आपल्याला खरीखुरी समता निर्माण करता येणार नाही. आपल्या अधिकारांसाठी प्रत्येक जण थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊ शकतो. हा प्रश्नही सर्वोच्च न्यायालयाकडे नेला जाण्याची शक्यता आहे. या देशामधील अनेक मोठ्या व्यक्तींनी, संतांनी, समतेचा उद्घोष केला. परंतु हा प्रश्न सोडवण्यासाठी श्री. धोंडगे यांनी घाई करू नये असे मी त्यांना सुचवू इच्छितो. त्यासाठी सामाजिक सुधारणा झाली पाहिजे आणि ही सुधारणा चर्चासत्रे, सामाजिक संमेलने या माध्यमांनी लोकमत तयार करूनच घडवून आणता येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई